रयत शिक्षण संस्थेचे,

# कला व वाणिज्य महाविद्यालय,पुसेगाव

ता.खटाव, जि.सातारा. पिन ४१५५०२



# वेदावती

## २०२५ - २०२६





कला व वाणिज्य महाविद्यालय,पुसेगाव

वेदावती २०२५ - २०२६

## ॥ विविध उपक्रम ॥



मराठी विभागांतर्गत महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे शाखा-पुसेगाव सामंजस्य करार प्रसंगी मा.श्री.चंद्रकांत दळवी साहेब, चेअरमन रयत शिक्षण संस्था, सातारा, मा.सौ.सुनिताराजे पवार प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे, प्रा.डॉ.राजेंद्र भोसले व प्रा.डॉ.हनुमंत निमसे



महाविद्यालय विकास समिती मिटींग प्रसंगी मा.श्री.चंद्रकांत दळवी साहेब, चेअरमन,रयत शिक्षण संस्था,सातारा, श्री.के.के.घाटगे, डॉ.के.एम.नलवडे, प्राचार्य डॉ.सुनील हेळकर, प्रा.डॉ.संजय क्षीरसागर व श्री.शशिकांत पाटील




'पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान' या राष्ट्रीय परिषदेमध्ये बोलताना ज्येष्ठ पत्रकार श्री.विजय चोरमारे व्यासपीठावर प्रिं.डॉ.राजेंद्र मोरे सहसचिव (ऑडिट), रयत शिक्षण संस्था,सातारा, प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.अनिल जगताप, प्रो.डॉ.दत्ता काळेल




'पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान' या राष्ट्रीय परिषदेमध्ये बीजभाषण प्रसंगी प्राचार्य आनंद मेणसे, व्यासपीठावर कुलगुरु डॉ.ज्ञानदेव म्हस्के, प्राचार्य डॉ.सुनील हेळकर, श्री.के.के.घाटगे, डॉ.के.एम.नलवडे, प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.अनिल जगताप प्रा.डॉ.संजय क्षीरसागर, प्रो.डॉ.दत्ता काळेल



'पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान' या राष्ट्रीय परिषदेमध्ये बोलताना प्राचार्य डॉ.सुनील हेळकर, व्यासपीठावर कुलगुरु डॉ.ज्ञानदेव म्हस्के, प्राचार्य आनंद मेणसे, श्री.के.के.घाटगे, डॉ.के.एम.नलवडे, प्रा.डॉ.राजेंद्र भोसले व मान्यवर



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना उपकुलसचिव,संलग्नता विभाग,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर डॉ.प्रमोद पांडव, व्यासपीठावर प.पू.सुंदरगिरी महाराज, प्राचार्य डॉ.सुनील हेळकर, श्री.के.के.घाटगे, डॉ.के.एम.नलवडे व मान्यवर

## ॥ विविध उपक्रम ॥



‘हिंदी विषयातील रोजगाराच्या संधी’ या विषयावर बोलताना प्रा.डॉ.दिलीपकुमार कसबे सोबत व्यासपीठावर प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.संजय क्षीरसागर, प्रा.लालासाहेब पवार, प्रा.आर.के.मुल्ला




‘वाचन प्रेरणा दिन’ या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.संजय क्षीरसागर सोबत व्यासपीठावर प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.अनिल जगताप, प्रा.श्रीमती मनुजा सोनार, प्रा.डॉ.हनुमंत निमसे



‘छत्रपती शिवाजी महाराज जयंती समारंभ’ प्रसंगी बोलताना प्रा. कोंडीबा शिंदे सोबत व्यासपीठावर प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.अनिल जगताप, प्रा.डॉ.संजय क्षीरसागर, प्रा.डॉ.किरण कुंभार



लीड कॉलेज अंतर्गत ‘उद्योजकता विकास आणि CIII’ या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री.सचिन भोंडवे व्यासपीठावर प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.संजय क्षीरसागर, प्रो.डॉ.संग्राम शिंदे व मान्यवर



‘वेदावती’ वार्षिक अंक सन.२०२५-२६ संपादक मंडळ



प्राचार्य डॉ.सुनील हेळकर समवेत महाविद्यालय प्राध्यापक वृंद



प्राचार्य डॉ.सुनील हेळकर समवेत महाविद्यालय शिक्षकेत्तर सेवक

## ॥ विविध उपक्रम ॥



भाषा विभागांतर्गत 'एकदिवशीय लेखन कौशल्य' कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.ज्ञानदेव काळे




सांस्कृतिक विभाग आयोजित 'शिक्षक दिन' कार्यक्रमात मार्गदर्शन करताना माजी प्राचार्य शहाजी डोंगरे व्यासपीठावर डॉ.राजेंद्र भोसले, डॉ.अनिल जगताप, डॉ.संजय क्षीरसागर, प्रा.श्रीमती मनुजा सोनार व विद्यार्थी प्रथमेश दळवी



'मराठी भाषा गौरव दिन' कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.मीरा देठे व्यासपीठावर प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.संजय क्षीरसागर, प्रा.डॉ.अनिल जगताप, प्रा.डॉ.हनुमंत निमसे, प्रा.महेश आवळे




'महिला विषयक कायदे' या विषयावर मार्गदर्शन करताना ॲड.प्रवीण देवकर व्यासपीठावर प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.अनिल जगताप, प्रा.डॉ.संजय क्षीरसागर, प्रा.श्रीमती मनुजा सोनार, प्रा.लालासाहेब पवार, प्रा.सौ.उज्वला मदने



प्रशासकीय व शैक्षणिक तपासणी कमिटी भेट प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रिं.डॉ.अरुण आंधळे व्यासपीठावर प्रिं.डॉ.सुनील हेळकर, प्राचार्या डॉ.वैशाली जाधव, प्रा.डॉ.गणेश जाधव व प्रा.डॉ.दिपा पाटील



'रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी' उदघाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना श्री.के.के.घाटगे, जनरल बॉडी सदस्य,रयत शिक्षण संस्था,सातारा, सोबत व्यासपीठावर प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.संजय क्षीरसागर प्रा.डॉ.अनिल जगताप, प्रा.डॉ.नवनाथ लोखंडे, प्रा.सुधीर धोंगडे

## संस्थापक, रयत शिक्षण संस्था, सातारा



**पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील**

डी.लिट्.

" जो जो वस्तीला आला, त्याला ताटामधला घास दिला
पंखफुट्या पाखरांसाठी अण्णा तुम्ही वटवृक्ष लाविला "



दीनांची माऊली, अनाथांची सावली

॥ रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील ॥

# पदाधिकारी

अध्यक्ष,
रयत शिक्षण संस्था, सातारा



**पद्मविभूषण खा. शरदचंद्रजी पवार साहेब**

चेअरमन,
रयत शिक्षण संस्था, सातारा



**मा. चंद्रकांत दळवी**
IAS (Retd.)

# पदाधिकारी

**व्हा.चेअरमन**
रयत शिक्षण संस्था,सातारा



**मा. ॲड. भगीरथ शिंदे**

**संघटक**
रयत शिक्षण संस्था,सातारा



**मा. डॉ. अनिल पाटील**

**सचिव**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**



**मा. विकास देशमुख**
IAS (Retd.)

**सहसचिव (उच्च शिक्षण)**
रयत शिक्षण संस्था,
सातारा



**प्रिं.डॉ.शिवलिंग मेनकुदळे**

**सहसचिव (माध्य.)**
रयत शिक्षण संस्था,
सातारा



**मा.श्री.बंडू पवार**

**सहसचिव (ऑडिट)**
रयत शिक्षण संस्था,
सातारा



**प्रिं. डॉ. राजेंद्र मोरे**

# भावपूर्ण श्रद्धांजली

## स्व. अजितदादा पवार



## स्व. आशाताई भोसले



सन. 2025-2026  या शैक्षणिक वर्षात रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाले.  तसेच पद्मविभूषण स्व. आशाताई भोसले यांचे दुःखद निधन झाले. तसेच देशातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, वैज्ञानिक, उद्योग व वाणिज्य क्षेत्रातील तसेच देशाच्या रक्षणार्थ आपल्या प्राणाची आहुती देणारे वीर जवान व नैसर्गिक आपत्तीमुळे दिवंगत झालेले शेतकरी या सर्वांना महाविद्यालयाच्या  वतीने भावपूर्ण श्रद्धांजली!





प्राचार्य डॉ. सुनील हेळकर



मौजे वेटणे येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर उद्घाटन प्रसंगी बोलताना श्री.संदीप पोमण ए.पी.आय., श्री.के.के.घाटगे, प्रा.डॉ.राजेंद्र भोसले व व्यासपीठावरील मान्यवर




राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सोलापूर व मराठवाडा पूरग्रस्तांसाठी धान्य संकलन केल्याप्रसंगी प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.संजय क्षीरसागर, प्रा.डॉ.किरण कुंभार, प्रा.डॉ.हनुमंत निमसे, महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी




राष्ट्रीय सेवा योजना शिबिरांतर्गत मौजे वेटणे येथे ग्रामस्थांचे हिमोग्लोबीन व रक्त तपासणी करताना प्रा.आ.केंद्र, डिस्कळ येथील आरोग्य सेविका




मौजे वेटणे येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर समारोप प्रसंगी बोलताना पं.स.खटाव, गटविकास अधिकारी, श्री. योगेश कदम सोबत व्यासपीठावरील सर्व मान्यवर

## महाविद्यालयास देणगी देणारे थोर देणगीदार



ॲड.किसनराव खामकर
२५,५५५/-



श्री सेवागिरी महाराज देवस्थान ट्रस्ट
२०,०००/-

## महाविद्यालयातील यशवंत-गुणवंत प्राध्यापक व विद्यार्थिनी



**प्रा.डॉ.संजय क्षीरसागर**
समन्वय समिती सदस्य, मध्य विभाग,
रयत शिक्षण संस्था, सातारा



**प्रा.डॉ.हनुमंत निमसे**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
पीएच.डी. पदवी प्रदान, असो.प्रोफेसर पदी निवड



**प्रा.डॉ.किरण कुंभार**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पीएच.डी. पदवी प्रदान



**प्रा.डॉ.नवनाथ लोखंडे**
असो.प्रोफेसर पदी निवड



**प्रा.डॉ. मारुती वाघ**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पीएच.डी. पदवी प्रदान



**प्रा.डॉ.आश्विनी कांबळे**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पीएच.डी. पदवी प्रदान



**श्री. शशिकांत पाटील**
उच्च शिक्षण समिती सदस्य,
रयत शिक्षण संस्था, सातारा



**कु.शोभा मोहन मिराशी**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
नेतृत्व विकास शिबिरात सहभाग



**कु.नम्रता सतीश कांबळे**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर
विद्यापीठ,सोलापूर, राज्यस्तरीय
सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा उत्कर्ष मध्ये निवड



**कु.शिवाली हणमंत घाडगे**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
महिला कबड्डी संघात निवड




दि.२६/११/२०२५ रोजी संविधान दिनानिमित्त राज्यशास्त्र विभागांतर्गत भारतीय राज्यघटनेचे सामूहिक वाचन करताना प्राध्यापक व विद्यार्थी



प्रा.डॉ.मारुती वाघ यांच्या 'कर्मचक्र' या कादंबरीला परिमल उदय राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार पंढरपूर येथे प्रदान.

## ॥ विविध उपक्रम ॥



‘पीएच.डी.प्रवेश परीक्षेची तयारी’ या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.संदीप किर्दत व्यासपीठावर प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.संजय क्षीरसागर, प्रा.डॉ.सचिन निकम, प्रा.आर.के.मुल्ला



‘कर्मवीर जयंती’ सोहळा मिरवणूक सन. २०२५



मॅरेथॉन स्पर्धा प्रसंगी महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी




महाविद्यालयाच्या प्रांगणात रस्सीखेच क्रीडा स्पर्धेतील क्षण




श्री सेवागिरी देवस्थान ट्रस्ट, पुसेगाव आयोजित जिल्हास्तरीय श्री सेवागिरी खुला युवा महोत्सवात लोकनृत्य सादर करताना महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी




श्री सेवागिरी खुला युवा महोत्सव प्रमुख पाहुणे डॉ.अशोक भोईटे मार्गदर्शन करताना व्यासपीठावर प.पू.सुंदरगिरी महाराज, श्री.संतोष वाघ, श्री.बाळासाहेब जाधव, श्री.संदीप पोमण व सर्व मान्यवर

## ॥ विविध उपक्रम ॥




वाणिज्य विभाग आयोजित 'कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण AI'
या विषयावर मार्गदर्शन करताना श्रीमती दिपाली घाडगे




वाणिज्य विभाग आयोजित 'संशोधन पद्धती'
या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.सचिन निकम




महाविद्यालयात वाणिज्य विभागामार्फत
'ट्रेडफेअर दिनाचे' आयोजन




वाणिज्य विभाग आयोजित 'वस्तू व सेवा कर'
या विषयावर मार्गदर्शन करताना श्री. अमित निकम,
व्यासपीठावर प्रा.प्रदीप गायकवाड




वाणिज्य विभाग आयोजित पोस्टर प्रदर्शन प्रसंगी
प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.दिलीप कसबे, प्रा.डॉ.संजय क्षीरसागर,
प्रा.प्रदीप गायकवाड, प्रा.लालासाहेब पवार, प्रा.डॉ.मारुती वाघ,
प्रा.डॉ.आश्विनी कांबळे व विद्यार्थी-विद्यार्थिनी




अर्थशास्त्र विभाग आयोजित 'उद्योजकता विकास आणि
रोजगाराच्या संधी' या विषयावर माहिती देताना
श्री.राहुल कोळी, प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ.संजय क्षीरसागर,
प्रा.लालासाहेब पवार, प्रो.डॉ.संग्राम शिंदे, प्रा.उज्वला मदने

''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद'' - कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे,

## कला व वाणिज्य महाविद्यालय,पुसेगाव

ता. खटाव, जि. सातारा. पिन ४१५५०२

संलग्नित : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संलग्नता/टी-२/नवीन कॉलेज ६७४७

Reaccredited by NAAC with 'B++' Grade (CGPA . 2.98)

Email ID - accp_puse@yahoo.in

www.accp.ac.in

# वेदावती

## सन. २०२५-२०२६

### संपादक मंडळ

अध्यक्ष

**प्राचार्य डॉ.सुनील हेळकर**

संपादक

**प्रा.डॉ. हनुमंत निमसे**

सहसंपादक

प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा. डॉ.संजय क्षीरसागर, प्रा.डॉ.नवनाथ लोखंडे, प्रा. लालासाहेब पवार, प्रा.श्रीमती मनुजा सोनार, प्रा. प्रदीप गायकवाड, प्रा. शामराव वाघमारे, प्रा. महेश आवळे, श्री.शशिकांत पाटील

**मुद्रक व अक्षर रचना**
विजयालक्ष्मी ऑफसेट, पुसेगाव
ता.खटाव,जि.सातारा. मो.९४२३२६३९७५

या अंकात प्रसिध्द झालेल्या साहित्यातील विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# महाविद्यालय विकास समिती

| | |
|---|---|
| मा. चंद्रकांत नारायण दळवी IAS (Retd.) | चेअरमन |
| मा. विकास विश्वासराव देशमुख IAS (Retd.) | सदस्य |
| प्रा. डॉ.हनुमंत गणपत निमसे (प्राचार्य नियुक्त प्रतिनिधी) | सदस्य |
| प्रा. श्रीमती मनुजा भास्कर सोनार (प्राध्यापक प्रतिनिधी) | सदस्या |
| प्रा. लालासाहेब काळू पवार(प्राध्यापक प्रतिनिधी) | सदस्य |
| प्रा. डॉ. संजय रामचंद्र क्षीरसागर (प्राध्यापक प्रतिनिधी) | सदस्य |
| मा. श्री. शशिकांत पांडुरंग पाटील (शिक्षकेत्तर सेवक प्रतिनिधी) | सदस्य |
| मा. प्रिं. डॉ. कृष्णाजी महादेव नलवडे (शिक्षण) | सदस्य |
| मा. कृष्णराव कबाजी घाटगे (संशोधन) | सदस्य |
| मा. १०८ प.पू. श्रीमहंत सुंदरगिरीजी महाराज (समाजसेवा) | सदस्य |
| मा. ॲड. किसन साहेबराव खामकर (माजी विद्यार्थी, व्यवसाय) | सदस्य |
| मा. प्रा.डॉ. नवनाथ ज्ञानदेव लोखंडे (IQAC समन्वयक) | सदस्य |
| श्री. अध्यक्ष–विद्यार्थी परिषद | सदस्य |
| श्री. सचिव–विद्यार्थी परिषद | सदस्य |
| मा. प्राचार्य डॉ. सुनील हेळकर | सचिव |

# नियतकालिक वेदावती २०२५–२०२६

दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट – नियम ४ प्रमाणे प्रकटन

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव |
| प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| प्रकाशकाचे नाव | : | प्राचार्य, डॉ. सुनील धोंडीबा हेळकर |
| संपादकाचे नाव | : | प्रा. डॉ. हनुमंत गणपत निमसे |
| पत्ता | : | कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव |
| मुद्रकाचे नाव | : | श्री. संतोष महिपत शिंदे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | मु. पो. पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा |

मी प्राचार्य, डॉ. सुनील धोंडीबा हेळकर जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे सत्य आहे.
(या अंकात प्रसिध्द झालेल्या साहित्यातील विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

# प्राचार्यांचे मनोगत



भारतीय समाजव्यवस्थेमध्ये शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. समाजातील दुर्बल, वंचित आणि ग्रामीण घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य काही महान व्यक्तींनी आपल्या आयुष्याचे ध्येय मानून केले.अशा महान समाजसुधारकांमध्ये पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था आज ग्रामीण भागातील एक प्रेरणादायी शैक्षणिक चळवळ म्हणून ओळखली जाते. ''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद ''हा विचार केंद्रस्थानी ठेवून त्यांनी ग्रामीण जनतेमध्ये शिक्षणाची ज्योत प्रज्वलित केली आणि सामाजिक परिवर्तनाची भक्कम पायाभरणी केली. पुसेगाव पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी म्हणून दि. ५ सप्टेंबर १९९४ रोजी कला व वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. आज आपल्या महाविद्यालयाचा ''वेदावती'' हा वार्षिक अंक प्रकाशित होत असताना या ज्ञानपरंपरेचा अभिमानाने उल्लेख करणे आवश्यक वाटते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबत सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि साहित्यिक जाणीवा विकसित करणे ही काळाची गरज आहे. याच विचारातून महाविद्यालयात विविध शैक्षणिक आणि व्यक्तिमत्त्व विकासात्मक उपक्रम सातत्याने राबविले जातात. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, नैतिक मूल्ये, राष्ट्रप्रेम आणि मानवतावादी विचार रुजविण्याचे महान कार्य महाविद्यालयाच माध्यमातून होत आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि क्रीडा उपक्रम आयोजित केले जातात. वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन, संशोधनपर प्रकल्प, सांस्कृतिक महोत्सव, राष्ट्रीय सेवा योजना, रयत स्पर्धा परीक्षा अॅकॅडमी, पर्यावरण संवर्धन अभियान, रक्तदान शिबिरे, महिला सक्षमीकरण कार्यक्रम, युवा महोत्सव, ट्रेड फेयर डे आणि ग्रामीण विकास उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवी दिशा दिली जाते. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, सामाजिक बांधिलकी आणि संघटन कौशल्य विकसित करण्यासाठी शिक्षक सातत्याने प्रयत्नशील आहेत.

आजच्या आधुनिक युगात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी भौतिक सुविधा अत्यंत आवश्यक ठरतात. विद्यार्थ्यांना चांगले शैक्षणिक वातावरण मिळावे यासाठी महाविद्यालयामध्ये सुसज्ज ग्रंथालय, संगणक प्रयोगशाळा, इंटरनेट, इंटरॅक्टिव्ह पॅनल, ई-लर्निंग सुविधा प्रत्येक वर्गात उपलब्ध केलेली आहे. प्रशस्त वर्गखोल्या, क्रीडांगण आणि अभ्यासपूरक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना जागतिक ज्ञानसंपदेपर्यंत पोहोचण्याची संधी मिळत आहे. शिक्षणासोबत संशोधन वृत्ती चिकित्सक दृष्टिकोनातून विकसित व्हावी यासाठी विविध कार्यशाळा आणि परिसंवादांचे आयोजन केले जाते. दि. २५ मार्च २०२६ रोजी ''पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान'' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. ''वेदावती'' हा वार्षिक अंक विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला अभिव्यक्त करणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. साहित्य लेखनामुळे विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना मिळते आणि समाजातील विविध प्रश्नांविषयी संवेदनशीलता निर्माण होते. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय विषयांवरील विद्यार्थ्यांचे लेखन हे त्यांच्या चिकित्सक विचारक्षमतेचे प्रतिक आहे. ग्रामीण जीवन, शेतकरी समस्या, पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण, युवकांचे प्रश्न, विज्ञान-तंत्रज्ञान, भारतीय संस्कृती, लोकपरंपरा आणि आधुनिक बदल यांसारख्या विषयांवर विद्यार्थी अभ्यासपूर्ण लेखन करत आहेत, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.

सामाजिक क्षेत्रामध्ये आज अनेक परिवर्तनशील घडामोडी घडताना दिसतात. विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे जग

झपाट्याने बदलत आहे. माहिती तंत्रज्ञान, डिजिटल अर्थव्यवस्था, सामाज माध्यमे आणि जागतिकीकरणामुळे समाजव्यवस्थेमध्ये नवे बदल निर्माण झाले आहेत. या बदलांचा सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम युवकांवर होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विवेकपूर्ण विचार करणे, सामाजिक जबाबदारी ओळखणे आणि मानवी मूल्यांची जपणूक करणे अत्यंत आवश्यक आहे. सांस्कृतिक क्षेत्रामध्ये भारतीय संस्कृतीची परंपरा, लोककला, लोकसाहित्य आणि ग्रामीण जीवनपद्धती यांचे जतन करणे ही काळाची गरज आहे. आधुनिकतेच्या प्रभावामध्ये अनेक पारंपरिक मूल्ये आणि संस्कार कमी होत चालले आहेत. अशा परिस्थितीत युवकांनी आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगून परंपरा आणि आधुनिकता यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. महाविद्यालयामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम, लोककला आणि पारंपरिक दिन साजरे करून विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक जाणीवा निर्माण केल्या जातात. आर्थिक क्षेत्रामध्ये ग्रामीण भागातील युवकांसमोर रोजगार आणि स्वावलंबनाचे मोठे आव्हान उभे आहे. कृषी क्षेत्रातील बदल, उद्योग व्यवसायातील स्पर्धा आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे रोजगाराचे स्वरूप बदलत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्याधारित शिक्षण, उद्योजकता आणि स्वयंरोजगार यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. महाविद्यालयामध्ये करिअर मार्गदर्शन, उद्योजकता विकास कार्यक्रम आणि कौशल्य विकास कार्यशाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भविष्यकालीन संधींसाठी तयार केले जाते.

राजकीय क्षेत्रामध्ये लोकशाही मूल्यांचे जतन करणे आणि संविधानिक तत्त्वांची जाणीव ठेवणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे कर्तव्य आहे. भारतासारख्या लोकशाही राष्ट्रामध्ये सुशिक्षित आणि जागरूक युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी मतदानाचे महत्त्व, सामाजिक समता, राष्ट्रीय एकात्मता आणि संविधानिक अधिकार यांची जाणीव ठेवून जबाबदार नागरिक बनावे, ही अपेक्षा आहे.

आजच्या युवकांनी ज्ञान, संस्कार, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल राखून स्वतःचे व्यक्तिमत्त्व विकसित करणे आवश्यक आहे. महाविद्यालय हे केवळ शिक्षण देणारे केंद्र नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारे संस्कार मंदिर आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांना सक्षम नागरिक बनविण्याचे कार्य महाविद्यालय सातत्याने करत आहे.

''वेदावती'' या वार्षिक अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला अभिव्यक्ती मिळत आहे. ही अत्यंत आनंदाची बाब आहे. या अंकामध्ये विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेले विचार, संशोधनपर लेख, वैचारिक लेख व्यक्तिचित्रणात्मक लेख, प्रवास वर्णनपर लेख, माहितीपर लेख, पुस्तक परीक्षण, कविता, ललित लेख आणि सामाजिक विषयांवरील लेखन हे निश्चितच समाजाला नवी दिशा देणारे ठरेल असा मला विश्वास आहे. सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षाचा ''वेदावती'' नियतकालिक अंक आपल्या हाती देत असताना मला विशेष आनंद होत आहे. या शैक्षणिक वर्षात रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. चंद्रकांत दळवी साहेब, सचिव मा.विकास देशमुख, सहसचिव (उच्च शिक्षण) प्रिं.डॉ. शिवलिंग मेनकुदळे, सहसचिव (ऑडिट) प्रिं.डॉ.राजेंद्र मोरे, रयत शिक्षण संस्था मॅनेजिंग कौन्सिलचे सर्व सदस्य, तसेच महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा .चंद्रकांत दळवी साहेब, सदस्य के. के. घाटगे, १०८ प.पू. श्रीमहंत सुंदरगिरीजी महाराज, माजी प्राचार्य डॉ. के. एम. नलवडे, ॲड. किसनराव खामकर यांच्यासह अनेक मान्यवरांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले आहे.

या वार्षिक ''वेदावती'' अंकाच्या निर्मितीसाठी परिश्रम घेणारे प्रमुख संपादक प्रा.डॉ.हनुमंत निमसे, सहसंपादक, प्राध्यापक, विद्यार्थी लेखकांचे व सर्व सहकार्यकर्त्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. विद्यार्थ्यांनी ज्ञान, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांचा वारसा जपत प्रगतीच्या दिशेने वाटचाल करावी, हीच शुभेच्छा.!!!

*जय कर्मवीर !*

*प्राचार्य*
*डॉ.सुनील हेळकर*



# संपादकीय

*महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कला, प्रतिभा अविष्कारांचा आणि महाविद्यालयाचा आरसा म्हणून ''वेदावती'' अंक सातत्याने चांगल्या प्रकारे कामगिरी करत आहे. ललित, वैचारिक या साहित्य प्रकारांबरोबर समीक्षात्मक, संशोधनपर , प्रवास वर्णनपर लेखन प्रकाराच्या रूपाने महाविद्यालयीन युवकांचे कल्पना व विचारविश्व दर्जेदारपणे 'वेदावती' अंकाच्या रूपाने प्रतिबिंबित होत आहेत. शिवाजी विद्यापीठ महाविद्यालय नियतकालिक स्पर्धेत बिगर व्यावसायिक महाविद्यालयीन गटात वैयक्तिक प्रकारची बक्षीसे ''वेदावती'' अंकास प्राप्त झालेली आहेत. हा आपल्या विद्यार्थी लेखकांचा सन्मान आहे असे मी मानतो. मराठी, हिंदी, इंग्रजी या प्रमुख विभागासह महाविद्यालयातील विविध विभाग व समिती अहवालाच्या रूपाने या अंकाचे अंतरंग साकारलेले आहे. विविध प्रकारच्या लेखन साहित्यातून तरुणाईची वाङ्मय प्रतिभा उत्तमपणे अविष्कृत झालेली आहे. आज सर्वच क्षेत्रात विविध घडामोडी घडत आहेत. मानवी जीवनातील परिणाम व आव्हाने या सर्व जागतिक स्तरावरील समस्यांचा थेट परिणाम सामान्य माणसाच्या जगण्यावर होत आहे. याशिवाय विद्यार्थी, युवक, महिला या मानवी घटकांच्या पार्श्वभूमीवर आजच्या युवा पिढीचे आकलन जाणून घेणे महत्त्वाचे आहे. तसेच नवीन शैक्षणिक धोरण, बेरोजगारी, महागाई, भारतीय संविधान, भारतीय लोकांचे योगदान, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या परिणामाचा प्रभाव इतर विज्ञान शाखेतील विविध प्रकारची स्थित्यंतरे, पर्यावरणीय, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय घडामोडीच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयीन तरुणांचे विचार जाणून घेणे आवश्यक आहेत. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना विविध लेखांच्या माध्यमातून आवाहन केलेले आहे. वरील सर्व घटकांचे प्रतिबिंब प्रांजळपणे या अंकात प्रभावीपणे उमटलेले आहे हे आपणास सांगताना मला मनस्वी आनंद होत आहे. या अंकाच्या निर्मितीसाठी सतत पाठपुरावा करणारे व  मार्गदर्शन करणारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील हेळकर व सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांचे या कामासाठी मोलाचे सहकार्य लाभले. महाविद्यालयातील या सर्वच घटकांचे संपादक मंडळाच्या वतीने मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. या अंकाच्या परिपूर्तीसाठी  सहसंपादक यांनी खूपच परिश्रम घेतले आहेत. या अंकांची अत्यंत सुबक, आकर्षक व दर्जेदार छपाई आणि बांधणी करून अंक वेळेत उपलब्ध करून देणारे विजयालक्ष्मी ऑफसेटचे श्री. संतोष शिंदे यांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो व या अंकाचे महाविद्यालयातील  सर्व विद्यार्थी, वाचक, रसिक स्वागत करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो*

*धन्यवाद!!!*

**! ।।जय कर्मवीर।।**

**प्रा.डॉ.हनुमंत निमसे**
संपादक- वेदावती

# मुखपृष्ठाविषयी...

बहुजनांच्या शिक्षणासाठी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून सामाजिक परिवर्तनाची क्रांती घडवली. त्याच विचारांचा वारसा जपणारे 'वेदावती' वार्षिक अंकाचे मुखपृष्ठ महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण, समता, संदेशाला वंदन करते. शिखर शिंगणापूर श्रद्धेचे शिखर तर माई सिंधुताई सपकाळ करूणेचे प्रतिक, बैलगाडा, कांदा व आलं पीकांनी डोलणारे शेत हे आपल्या कष्टकरी बापाच्या घामाची आठवण आहे. धबधबा युवा शक्तीच्या अविरत ऊर्जेचे द्योतक आहे. केसरी, पांढरा, हिरवा रंगसंगती त्याग, शांती आणि समृद्धी या मूल्यांची जाणीव करून राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेची शिकवण देते. एका बाजूला बैलगाडा, दुसऱ्या बाजूला कृत्रिम बुद्धिमत्ता ए.आय. हा विरोधाभास नसून काळानुरुप बदलाची नांदी आहे. रयतचा विद्यार्थी नांगराबरोबर कॉम्प्युटर चालवेल हेच कर्मवीरांचे स्वप्न होते. याचे दृश्यात्मक प्रतिक मुखपृष्ठावर घेतलं आहे. 'वेदावती' वार्षिक अंकाचे मुखपृष्ठ म्हणजे परंपरा ते प्रगतीचा प्रवास आहे.

**संपादक**

# मराठी विभाग

'' आमुच्या मनामनात दंगते मराठी
आमुच्या रगारगात रंगते मराठी
आमुच्या उराउरात स्पंदते मराठी
आमुच्या नसानसात नाचते मराठी''

– सुरेश भट

## विभागीय संपादक

प्रा.डॉ.राजेंद्र भोसले
प्रा.डॉ.नवनाथ लोखंडे
प्रा.श्रीमती मनुजा सोनार
प्रा. शामराव वाघमारे
श्री. शशिकांत पाटील
प्रा.डॉ.संजय क्षीरसागर
प्रा. लालासाहेब पवार
प्रा. प्रदीप गायकवाड
प्रा. महेश आवळे

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग



| अ.क्र. | लेखाचे नाव | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग |
|---|---|---|---|
| १. | कर्मवीर भाऊराव पाटील : शिक्षण प्रसारातील महायज्ञ | तुषार कैलास साठे | बी.ए.भाग–३ |
| २. | महाराष्ट्रातील सण, उत्सव आणि परंपरा | कु. गौरी शंकर भोसले | बी.ए.भाग–३ |
| ३. | बाबा आढाव असंघटित कामगारांचे नेते | कु. संध्या दादा मदने | बी.ए.भाग–३ |
| ४. | औंधची लोकशाही | कु. भारती रविंद्र लोंढे | बी.ए.भाग–१ |
| ५. | महाराष्ट्राचे नंदनवन महाबळेश्वर | तुषार कैलास साठे | बी.ए.भाग–३ |
| ६. | लोकगीतातील आईबापांचे प्रेम | कु. ऋतुजा दत्तात्रय सावंत | बी.ए.भाग–३ |
| ७. | हसविणारे मराठी विनोद | कु. अनुराधा पोपट दळवी | बी.ए.भाग–१ |
| ८. | स्वामी विवेकानंदांचे अनमोल विचार | सार्थक आनंदराव बनसोडे | बी.ए.भाग–१ |
| ९. | आयुष्य आहे तुझ्यासाठी | प्रथमेश रणजीत दळवी | बी.ए.भाग–२ |
| १०. | मायेची सावली सिंधुताई सपकाळ | कु. पुजा तुकाराम जाधव | बी.ए.भाग–३ |
| ११. | अधिक व क्षय मास आणि पुसेगाव येथील अतिरुद्र स्वाहःकार जप अनुष्ठान महायज्ञ | कु. अनुराधा पोपट दळवी | बी.ए.भाग–१ |
| १२. | पंढरपूर आषाढी वारी | कु. दिक्षा ज्ञानेश्वर सुतार | बी.कॉम.भाग–३ |
| १३. | महात्मा फुले यांचे स्त्री उध्दाराचे कार्य | सार्थक आनंदराव बनसोडे | बी.ए.भाग–१ |
| १४. | अल्बर्ट आइनस्टाइन | कु. ज्ञानेश्वरी प्रशांत बोराटे | बी.कॉम.भाग–१ |
| १५. | आधुनिक जग आणि कृत्रिम बुध्दीमत्ता | प्रथमेश रणजीत दळवी | बी.ए.भाग–२ |
| १६. | ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ | कु. निशा विनोद गुंजवटे | बी.कॉम.भाग–२ |
| १७. | पर्यावरण म्हणजे काय | कु. नम्रता सतिश कांबळे | बी.ए.भाग–१ |
| १८. | निसर्ग निरिक्षण : एक शास्त्र व कला | कु. कोमल चनाप्पा कागर | बी.कॉम.भाग–२ |
| १९. | महाराष्ट्रातील समाजसुधारक व अंधश्रद्धा निर्मूलन | कु. गौरी जयवंत जाधव | बी.कॉम.भाग–२ |
| २०. | भारतीय राज्यघटनेची ओळख | कु. प्रणाली विठ्ठल शिंदे | बी.कॉम.भाग–३ |

| | | | |
|---|---|---|---|
| २१. | जागतिक महिला दिन | कु. साक्षी संजय गिरीगोसावी | बी.ए.भाग–२ |
| २२. | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर | कु. भारती रविंद्र लोंढे | बी.ए.भाग–१ |
| २३. | पुसेगाव परिसरातील कृषी उत्पादने आणि शेतकरी एक सखोल अभ्यास | कु. सानिका आनंदराव शिंदे | एम.कॉम.भाग–२ |
| २४. | कर्मचक्र | कु. गौरी मनोहर पोतेकर | एम.कॉम.भाग–२ |
| २५. | प्रसारमाध्यमे आणि लोकशाही | कु. पूनम गजेंद्र इंदलकर | बी.ए.भाग–२ |
| २६. | जागतिक वारसा स्थळे – युनेस्को | कु. सिध्दी रामदास फडतरे | बी.ए.भाग–१ |
| २७ | शिखर शिंगणापूरचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व | कु. प्रणाली विठ्ठल शिंदे | बी.कॉम.भाग–३ |
| २८. | खटाव तालुक्याचे ऐतिहासिक महत्त्व | कु. समृध्दी सुभाष शिंदे | बी.कॉम.भाग–३ |
| २९. | पश्चिम महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यत | प्रतिक राजेंद्र जगताप | बी.ए.भाग–३ |
| ३०. | नेर ता. खटाव येथील काशी विश्वेश्वर मंदिरातील शिलालेखांचा चिकित्सक अभ्यास | तेजस श्रीकांत घाडगे | बी.ए.भाग–३ |
| ३१. | इतिहासाचे पुनर्लेखन: एक वैचारिक आणि सामाजिक आव्हान | कु. सरिता नानासो शिंदे | बी.ए.भाग–२ |
| ३२. | ऑलवेज ऑनलाईन राहण्याचे व्यसन | कु. समृध्दी सुभाष शिंदे | बी.कॉम.भाग–३ |

## पद्य विभाग

| अ.क्र. | कवितेचे नाव | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग |
|---|---|---|---|
| १. | रोजगारी | तुषार कैलास साठे | बी.ए.भाग–३ |
| २. | बेरोजगारी | कु. हर्षदा रामचंद्र रेणुसे | बी.ए.भाग–२ |
| ३. | भ्रष्टाचार | कु. ऋतुजा दत्तात्रय सावंत | बी.ए.भाग–३ |
| ४. | सरी पावसांच्या | कु. सानिया मंगेश खवळे | बी.ए.भाग–२ |
| ५. | संत विचार | कु. सुतार प्रणाली प्रमोद | बी.ए.भाग–२ |
| ६. | संसार | कु. शिवाजी सुनील बिरलिंगे | बी.ए.भाग–१ |
| ७. | शिक्षक | कु. प्राजक्ता जालिंदर पवार | बी.कॉम.भाग–१ |
| ८. | पाहिले मी देवा तुला | कु. सिध्दी रामदास फडतरे | बी.ए.भाग–१ |
| ९. | वसुंधरा | कु. ज्ञानेश्वरी प्रशांत बोराटे | बी.कॉम.भाग–१ |

# कर्मवीर भाऊराव पाटील : शिक्षण प्रसारातील महायज्ञ

**(वैचारिक लेख)**



''नको लक्ष्मीचे वैभव आम्हा नको तृषा ती भयंकरू,
'कर्मवीरांचे नाव घेऊनी भवसागर हा पार करू''

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' या तत्वावर आधारलेली रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यांनी संस्थेसाठी त्याग केला. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्था स्थापन करून हरिजन, गिरजनांसाठी ज्ञानाची दालने उघडी करून दिली. अशा कर्मवीरांचे मूळ घराणे कर्नाटक राज्यातील होते. नशीब आजमाविण्यासाठी महाराष्ट्रात आले व ऐतवडे बुद्रक, जि.सांगली येथे स्थायिक झाले. पुढे त्यांच्या घराण्यात पाटीलकी आली. त्यामुळे त्यांचे पाटील आडनाव रूढ झाले.

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात बाहुबलीचा प्रसिध्द डोंगर आहे. या डोंगराच्या कुशीत 'कुंभोज' नावाचे एक छोटे गाव आहे. या गावी दि. २२ सप्टेंबर १८८७ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म झाला. लहानपणा पासून भाऊराव बंडखोर वृत्तीचे होते. कर्मवीरांचे शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूल येथे झाले. कर्मवीर भाऊराव पाटील राजर्षी शाहू महाराजांच्या सहवासात असल्यामुळे राजाच्या कार्याचा, समाजसुधारणेचा ठसा कर्मवीरांच्यावर उमठला होता. कर्मवीरांनी आपल्या आयुष्यात शैक्षणिक कार्याचा जो प्रचंड वटवृक्ष उभा केला. त्यांचे स्फूर्तीस्थान राजर्षी शाहू महाराज हे आहेत.

''कर्मवीर भाऊराव पाटील म्हणतात,

''अन्यायाची चीड आणि न्यायाची चाड हे माझे ब्रीद आहे. ते मी शाहू महाराजांपासून शिकलो आहे.''

कर्मवीरांनी उदारनिर्वाहासाठी अर्थार्जन करावे म्हणून त्यांनी ओगलेवाडी व किर्लोस्करवाडी येथील कारखान्यातील उत्पादित मालाचे फिरते विक्रेते म्हणून कार्य केले. तसेच सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समतेचा, तत्वज्ञानाचा प्रचार करत असताना महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर प्रवास करण्याचा योग आला. त्यातूनच समाजातील भिन्न घटकांशी त्यांचा संबध आला. त्यावेळी त्यांना काही घटकांमध्ये शिक्षणाअभावी असणाऱ्या अज्ञान व दारिद्र्याची कल्पना आली. सत्य, सामाजिक समता, धार्मिक व आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे 'शिक्षण ' होय. याद्वारे नवसमाजनिर्मिती होऊन देशाची उन्नती साधली जाईल. याची त्यांना खात्री पटली. त्यामुळे त्यांनी सांगली जिल्हयात 'दुधगाव' या गावी सन. १९१० साली रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली व आपल्या शैक्षणिक कार्याचा शुभांरभ केला. त्यांनी आरंभलेले शैक्षणिक क्षेत्रातील एकूणच कार्य सिध्दीस जाण्यासाठी त्यांना महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी अशा महामानवांकडून प्रेरणा मिळाली.

कर्मवीरांनी सन १९१९ मध्ये कराड तालुक्यातील 'काले' येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षण प्रसाराच्या कामाची सुरुवात केली. या संस्थेमध्ये भाऊराव पाटील यांना बहुजन समाजाला शिक्षण द्यावयाचे होते. अठरापगड जातीच्या महाराष्ट्रातील गोरगरीबांच्या झोपडपट्टी पर्यंत शिक्षण द्यावयाचे होते. स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय आणि स्वातंत्र्य ही त्यांच्या शैक्षणिक प्रयोगाची गुरूकिल्ली होती. म्हणूनच ते नेहमी घोषणा करीत.

'मला ओसाड जमीन द्या, मी त्याचे नंदनवन करून दाखवितो ' भाऊरावांच्या या घोषणेतूनच खऱ्या अर्थाने त्यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा उदय पहावयास मिळतो.

कर्मवीरांचे आयुष्य म्हणजे, ध्येय साधनेचा एक प्रचंड महायज्ञ होता. समाजाचा संसार करणाऱ्या योग्याचे वैराग्य त्यांच्या व्यक्तिमत्वात प्रकाशित झालेले दिसत होते. याच तपस्यैच्या सामर्थ्यावर पद्मभूषण किंवा डी. लिट यासारखा अत्युच्च सन्मान आपोआप मिळाला. या मानवतेच्या महान पुजाऱ्यांचे कार्य अखिल मानव जातीला सत्कार्याची प्रेरणा देणारे आहे. अज्ञानाच्या तिमिराचा नाश करून ज्ञानज्योतीची प्रतिष्ठापना करणारा तपस्वी नित्य संस्मरणीय आहे.

''ज्ञानरंभी प्रथम स्मरावा, ज्ञानऋषी स्थिरमती, धन्य हा रयतेचा कुलपती''

माणसातले माणूसपण जागे करून मानवतेची जोपासना करणारा हा कर्मयोगी आपल्या कर्मफुलांनी ईश्वराची पूजा बांधत होता. तो त्यांना दीन दुबळयांच्या झोपडीत दिसत होता. गंगा वरून खाली येते. परंतू ज्ञानाची गंगा खालून वर जात होती. खेडयापाड्यात ज्ञानाची गंगा जिथे गेलीच नव्हती, तिथे-तिथे जात होती. जिथे जिथे ही ज्ञानगंगा गेली तिथे तिथे सरस्वतीची केंद्रे उभी राहिलेली आहेत.

''मायबाप हा पददलितांचा, अतिरत साधक कैवल्याचा, स्वावलंबी शिक्षण उदगाता''

कर्मवीरांच्या याच भूमीवर शाळा, महाविद्यालयाची स्थापना झाली. त्यांच केंद्रातून माणसातील रत्ने घडलेली आहेत व त्यांनी स्वत:ला राष्ट्रकार्याला वाहून घेतले आहे. माणसांना घडविणारा हा देवमाणूस होता. म्हणूनच आज त्यांच्या रयत शिक्षण संस्थेचे चौघडे प्रत्येक खेडयापाडयात वाजत आहेत.

महात्मा फुले यांना कर्मवीर अण्णा आपले गुरू मानीत. या सबंधी ते म्हणतात, ''हे महात्म्या, तुम्ही प्रज्वलित केलेल्या ज्ञानज्योतीचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची मी प्रतिज्ञा करतो. मी तुम्हाला साक्षी ठेवून सहयाद्रीची दरीखोरी धुंडाळीत आहे. धुळीत पडलेली रत्ने जमा करत आहे. माझ्या मानसपटलावर केवळ तुमचीच मूर्ती कोरलेली आहे. मला मान सन्मानाची आशा नाही, सत्ता संपत्तीची मी कधीच अपेक्षा केली नाही.''

कर्मवीरांनी मानवी जीवनाची गीता सांगितली. त्यागातून व सेवेतून वाटचाल करून ध्येयाचा ध्रुव तारा गाठण्यासाठी अविरत प्रयत्न केले. त्यांनी अन्यायाविरूध्द नेहमी दंड थोपटून बंड केलेले आहे. त्यांच्या ठायी स्वाभिमान व प्रचंड इच्छाशक्ती होती. या शक्तीतून असंख्य मित्र त्यांना लाभले. भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा बहुमानाचा किताब बहाल केला. भारतीय विव्दानांनी त्यांना शिक्षण भगीरथ म्हणून संबोधिले. जनता जनार्दनाने 'कर्मवीर' ही पदवी दिली. दि. ९ मे १९५९ रोजी ज्ञानचा यज्ञ मांडणारा एक महान ऋषी अनंतात विलिन झाला.

''वीर कर्मवीर कार्य धुरंदर ज्ञानाचे साधक
तुम्ही पद्मभूषण, समाजभूषण विदयार्थ्यांना प्रेरक''
''तुम्ही महान तेजस्वी जणू सूर्य गगणात
हे कर्मवीर अमर तुम्ही जहाला जगतात''

❑ ❑ ❑ ❑ ❑

**तुषार कैलास साठे**
बी.ए. भाग-३ (मराठी)





# महाराष्ट्रातील सण, उत्सव आणि परंपरा

**(माहितीपर लेख)**

महाराष्ट्र सांस्कृतिक दृष्ट्या समृध्द राज्य आहे. येथे विविध जाती, धर्म, भाषा आणि परंपरा यांचा संगम आढळतो. या राज्यातील सण–उत्सव लोकजीवनाचा अविभाज्य भाग आहेत. येथे धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि निसर्गावर आधारीत विविध उत्सव साजरे केले जातात.

**धार्मिक सण**

**गुढीपाढवा** चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा हा मराठी नववर्षाचा पहिला दिवस असतो. हा सण महाराष्ट्रात अत्यंत उत्साहाने साजरा केला जातो. बांबूच्या एका काठीला स्वच्छ रेशमी वस्त्र, त्यावर साखरेची गाठी (माळ), कडुलिंबाची पाने, आंब्याची डहाळी, फुलांचा हार व त्यावर कलश ठेऊन गुढी उभारली जाते. गुढीला हळद–कुंकू, अक्षता वाहून तिची पूजा केली जाते आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला

जातो. गुढीपाडवा साडेतीन मुहूर्तांपैकी एक पूर्ण मुहूर्त असल्याने अत्यंत शुभ मानला जातो. प्रभू श्रीराम १४ वर्षांचा वनवास संपवून आणि रावणाचा वध करून याच दिवशी अयोध्येत परतले असा पौराणिक संदर्भ सांगीतला जातो.

## गणेश चतुर्थी

महाराष्ट्रातील सर्वात मोठा आणि लोकप्रिय सण म्हणजे गणेश चतुर्थी. हा सण ६४ विद्यांची देवता असलेल्या श्री गणेशाच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. हा सण घरगुती व सार्वजनिक अशा पध्दतीने साजरा करतात. गणेश जयंतीला श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली जाते. यावेळी श्री गणेशाचे विधीवत पूजन केले जाते तसेच मोदक, लाडू आणि फळांचा नैवेद्य अर्पण केला जातो. या सणाचा शेवट श्री गणेश विसर्जन मिरवणुकीने होतो. विसर्जन सोहळा मिरवणूका ढोल-ताशांच्या गजरात व गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या अशा जयघोषात संपन्न होतात. मिरवणूकीनंतर लाडक्या बाप्पाचे पूजन करुन जलाशयात किंवा कृत्रिम तळ्यात विसर्जन करुन निरोप दिला जातो.

## नवरात्रोत्सव

नवरात्रोत्सव हा हिंदू धर्मातील अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र सण आहे. नवरात्र म्हणजे नऊ रात्रींचा समूह. हा सण मुख्यत्वे आदिशक्ती दुर्गामाता आणि तिच्या विविध रूपांच्या उपासनेसाठी समर्पित असतो. पौराणिक कथेनुसार महिषासुर नावाच्या राक्षसाचा वध करण्यासाठी देवी दुर्गा आणि महिषासुर यांच्यात नऊ दिवस भयंकर युद्ध झाले. नवव्या दिवशी देवीने महिषासुर नावाच्या राक्षसाचा वध केला म्हणून हा सण वाईटावर चांगल्याचा विजय म्हणूनही साजरा केला जातो.

## दसरा/विजयादशमी

दसरा हा सण वाईट शक्तीवर चांगली शक्ती विजयी होते असा संदेश देतो. दसऱ्याच्या दिवशी दहा डोक्याच्या दृष्ट रावणाचा भगवान रामाने वध केला. वाईटावर चांगल्याचा विजय झाला म्हणून या दिवसाला विजयादशमी (दसरा) म्हणतात. नवरात्रीच्या नवव्या माळीनंतर दहावा दिवस म्हणजे दसरा येतो. म्हणून हिंदू पौराणिक कथेनुसार या दिवशी देवी दुर्गेने महिषासुर नावाच्या राक्षसाचा वध केला त्या प्रित्यर्थ आपण दसरा साजरा करतो. अशा प्रकारे अंधारावर प्रकाशाचा, असत्यावर सत्याचा आणि वाईटावर चांगल्याचा विजय म्हणजेच दसरा होय.

## दिवाळी

दिवाळी हा प्रकाशाचा सण आहे. तसेच तो आनंद, एकता आणि नात्यांचा देखील उत्सव आहे. महाराष्ट्रात दिवाळी हा सण फक्त धार्मिक नव्हे तर सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा आहे.

दिवाळीचे मुख्य दिवस : वसुबारसः दिवाळीची सुरुवात गाई-वासरांच्या पूजेने होते. धनत्रयोदशीः या दिवशी लक्ष्मी देवी आणि कुबेराची पूजा केली जाते. सोने-चांदी खरेदी करणे शुभ मानले जाते. नरक चतुर्दशीः पहाटे अभ्यंगस्नान (उटणे लावून आंघोळ) करून नवीन कपडे घालतात. लक्ष्मीपूजनः दिवाळीतील सर्वात महत्त्वाचा दिवस. व्यापारी दप्तरांचे पूजन केले जाते आणि लक्ष्मी देवीचे स्वागत केले जाते. बलीप्रतिपदा (पाडवा): पती-पत्नीच्या प्रेमाचा आणि साडेतीन मुहूर्तांपैकी एक दिवस. भाऊबीजः भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण

## मकरसंक्रांती

मकर संक्रांत हा हिंदू धर्मातील एक प्रमुख सण असून तो दरवर्षी दि. १४ जानेवारीला (कधीकधी १५ जानेवारी) सूर्य मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा साजरा केला जातो. हा सण उत्तरायण, नवीन पीक आणि निसर्ग बदलाचा उत्सव असतो. संक्रांतीच्या दिवशी महाराष्ट्रात तिळगुळ वाटून ''तिळगुळ घ्या आणि गोड बोला'' असे म्हणत नातेसंबंधातील गोडवा जपला जातो. महाराष्ट्रात

या दिवशी अनेक ठिकाणी पतंग उडविणे ही परंपरा आहे.

## निसर्ग व कृषी आधारित सण

### बेंदूर

बेंदूर किंवा बैलपोळा हा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा अत्यंत महत्त्वाचा सण असून तो शेतीकामात वर्षभर मदत करणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा केला जातो. पश्चिम महाराष्ट्रात हा सण सहसा आषाढ पौर्णिमेला किंवा श्रावण अमावस्येला साजरा होतो. या दिवशी बैलांना सजवून, पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून त्यांची पूजा केली जाते. या दिवशी मातीचे बैल तयार करून त्यांची पूजा केली जाते.

नागपंचमी, नवरात्र, आषाढी एकादशी यासारखे सण निसर्गाशी निगडीत आहेत. विशेषतः नंदनवन, नदी, विहिरी यांना पूजले जाते.

## सामाजिक व लोकोत्सव

### होळी

होळी म्हणजे रंगांचा व एकतेचा सण आहे. जात, धर्म, पंथ असा भेदभाव न करता हा सण सर्वजन एकोप्याने साजरा करतात. होळी म्हणजे वसंत ऋतूचे आगमन आणि हिवाळ्याचा शेवट असल्याचे संकेत मानले जातात. वाईटावर चांगल्याचा विजय याचे प्रतिक म्हणूनही होळी हा सण साजरा केला जातो. होळीच्या दिवशी म्हणजे फाल्गुन पौर्णिमेला ''होलिका दहन'' केले जाते त्यानंतर दुसऱ्या दिवशी धुलिवंदन हा सण गुलालासह विविध रंग वापरून व रंगांची उधळण करुन साजरा केला जातो.

### शिवजयंती

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने शिवजंयती साजरी केली जाते. या दिवशी किल्ले, शाळा आणि सार्वजनिक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमांचे पूजन केले जाते. पारंपरिक वेशभूषा, पोवाडे आणि ढोल-ताशांच्या गजरात महाराष्ट्रासह जगभरातील विविध ठिकाणी भव्य मिरवणुका काढल्या जातात.

## विशेष परंपरा

### पंढरपूर पायी वारी

पंढरपूरची वारी ही महाराष्ट्रातील एक प्राचीन, भव्य आणि सांस्कृतिक परंपरा आहे. दरवर्षी लाखो वारकरी पायी चालत पंढरपूरला विठुरायाच्या दर्शनासाठी जातात. ही परंपरा ७०० ते ८०० वर्षांपेक्षाही जुनी मानली जाते. वारी प्रामुख्याने आषाढी आणि कार्तिकी एकादशीला आयोजित केली जाते. वारीमध्ये आळंदी ते पंढरपूर श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि देहू ते पंढरपूर श्री संत तुकाराम महाराज या पालख्यांसह अनेक संतांच्या पालख्या रथातून पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. या पालख्यांसोबत हजारो दिंड्या असतात. पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांना वारकरी म्हणतात. वारकरी टाळ-मृदंगाचा गजर आणि ज्ञानोबा-तुकाराम नामाचा जयघोष करीत शेकडो किलोमीटरचा प्रवास करतात. वारीच्या मार्गावर वारकरी रिंगण (भक्तांचे वर्तुळ) करतात. रिंगणामध्ये घोडे धावणे, फुगडी, हमामा यांसह विविध पारंपरिक खेळ खेळतात. वारीत जात, पात, धर्म, लिंग, गरीब, श्रीमंत असा कोणताही भेद नसतो.



❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. गौरी शंकर भोसले**
बी.ए. भाग-३ (मराठी)

# बाबा आढाव

## असंघटित कामगारांचे नेते

**(व्यक्तिचित्रणपर लेख)**



महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींच्या इतिहासात काही व्यक्तीमत्त्वे अशी चमकून गेली आहेत की, त्यांनी अनेक पिढ्यांना सामाजिक न्यायासाठी प्रेरीत केले आहे. त्यापैकीच एक म्हणजे बाबासाहेब पांडुरंग आढाव. त्यांना संपूर्ण महाराष्ट्र प्रेमाने ''बाबा आढाव'' म्हणून ओळखतो. हमाल-माथाडी कामगारांचे संघटन, असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न, सामाजिक न्याय, समता आणि मानवी हक्कांसाठी त्यांनी दिलेला लढा अतुलनीय आहे. त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण हा संघर्ष, संवेदना आणि परिवर्तनासाठीच्या कटिबध्दतेने उजळलेला आहे

बाबा आढाव यांचा जन्म दि. १ जून १९३० रोजी पुणे येथे एका सर्वसामान्य कुटुंबात झाला. घरची बेताची आर्थिक परिस्थिती असूनही शिक्षणक्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय प्रगती केली. परंतू लहानपणापासूनच त्यांच्या मनात समाजातील असमानतेविरुध्दची अस्वस्थता घर करून राहिली होती. घरातील संस्कार, गरीबीशी झुंजणाऱ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचे आयुष्य, ग्रामीण भागातील कष्टकऱ्यांची दयनीय अवस्था या सर्व दृश्य अनुभवांनी त्यांच्या मनात सामाजिक परिवर्तनाची ठिणगी पेटली. तरुण वयातच ते युवकांच्या विविध चळवळींमध्ये सहभागी झाले. समाजवादी विचारसरणीने त्यांना आकर्षित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आणि राममोहन लोहिया यांच्या विचारांनी त्यांना सामाजिक समतेचा व्यापक दृष्टिकोन दिला. अनेक दशके त्यांचे संपूर्ण आयुष्य हे या विचारसरणींच्या तत्त्वावर उभे राहून घडले.

महाराष्ट्रातील हमाल आणि माथाडी कामगारांचे जीवन अतिशय कष्टप्रद आणि असुरक्षित होते. कामाचे निश्चित तास नव्हते. मोबदला अस्थिर होता. कुठलेही सामाजिक किंवा वैद्यकीय संरक्षण उपलब्ध नव्हते. कामगारांना कोणत्याही क्षणी, विनाकारण कामावरुन काढून टाकले जात असे. या कामगारांचे कष्टमय जीवन पाहून बाबा आढवांचे मन विदीर्ण झाले. त्यांनी ठरविले की, या शोषणग्रस्त कामगारांना संघटित करणे हाच त्यांच्या आयुष्याचा उद्देश असेल.

पुणे येथून सुरुवात करून त्यांनी हमाल-माथाडी कामगारांचे संघटन उभारले. या प्रक्रियेत त्यांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागला. मालकांचा दबाव, धमक्या, हिंसाचार, पोलीसांच्या कारवाया याला धीराने बाबा सामोरे गेले. व्यवस्थेच्या विरोधात जिद्दीने उभे राहिले. त्यांचा विश्वास होता की ''संघटनेशिवाय कामगारांचे जीवन बदलणार नाही.'' त्यांनी केलेल्या आंदोलनांचा परिणाम म्हणूनच महाराष्ट्र शासनाने सन.

१९६९ मध्ये ऐतिहासिक असा ''महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि हातगाडी कामगार कायदा'' अंमलात केला. या कायद्यामुळे कामगारांना अधिकृत ओळखपत्र, नियोजित व सुरक्षित काम, सामाजिक सुरक्षा, वैद्यकीय सुविधा, पेन्शन व विमा लाभ असे महत्त्वाचे हक्क मिळाले. हा कायदा भारतातील असंघटित कामगारांच्या हितासाठी झालेला पहिलाच कार्यक्षम आणि प्रभावी कायदा होता. यामागे बाबा आढाव यांच्या लढ्याची, असंघटित क्षेत्रातील व्यापक चळवळीची मुख्य भूमिका होती.

बाबा आढावांचे कार्य केवळ हमाल माथाडी कामगारांपुरते मर्यादित नव्हते. समाजातील असंघटित क्षेत्रातील असंख्य कष्टकरी, रिक्षाचालक, फेरीवाले, घरकाम करणाऱ्या महिला भगिनी, बांधकाम मजूर हे सर्वजन अत्यंत असुरक्षित परिस्थितीत जगत असल्याचे त्यांनी पाहिले. त्यामुळे बाबांनी या सर्व घटकांसाठी स्वतंत्र संघटना उभ्या केल्या. त्यांच्या चळवळीचा महत्त्वाचा पैलू म्हणजे प्रत्येकाला स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार असला पाहिजे हा होता. ते नेहमी म्हणायचे. ''कामगाराला दान नको, हक्क हवा'' त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या अनेक आंदोलनांनी सरकारला असंघटित कामगारांसाठी नियम, कल्याणकारी योजना आणि सुरक्षा उपाययोजना लागू करायला भाग पाडले. समता, जातविहीनता आणि सामाजिक न्यायासाठी कामगार लढा चळवळींबरोबरच बाबा आढाव यांनी समाजातील जातीय विषमता आणि सामाजिक भेदभावाविरोधातही ठाम भूमिका घेतली. त्यांनी ''एक गाव एक पाणवठा'' ही मोहीम चालविली, ही मोहिम ग्रामीण महाराष्ट्रात क्रांतिकारी ठरली. या मोहिमेमुळे ग्रामीण भागातील दलितांना सार्वजनिक विहिरी, तळे आणि पाणवठ्यावर निर्बंध न ठेवता पाणी घेण्याचा प्रत्यक्षात हक्क मिळाला. त्यांची विचारसरणी अत्यंत प्रभावी व समाजहिताची होती. समाजातील कोणताही घटक वंचित राहू नये यासाठी त्यांनी मुस्लिम, दलित, आदिवासी, महिलांचे हक्क तसेच सामाजिक सलोख्याचे प्रश्न यांवरही सक्रियपणे कार्य केले.

बाबा आढाव यांचे सर्वात मोठे सामर्थ्य म्हणजे त्यांचे नेतृत्व. ते कामगारांमध्ये, कष्टकऱ्यांमध्ये मिसळून काम करीत. बाबा आढाव हे हमालांप्रमाणेच ओझे उचलून कामगारांशी एकरूप होत. त्यांचा संघर्ष फक्त भाषणांचा नव्हता, तो लोकांच्या दु:खाशी संपूर्णपणे एकरूप झालेला होता. त्यांनी पुणे येथे 'हमाल पंचायत' आणि 'असंघटित कामगार कर्मचारी महासंघ' यांसारख्या संस्था स्थापन केल्या. त्यांनी दलित वस्त्यांच्या सुधारणेसाठीही काम केले. बाबा आढाव यांनी सामाजिक विषयांवर आणि आपल्या चळवळींवर आधारित अनेक पुस्तके आणि लेख लिहिले आहेत.

बाबा आढाव यांनी सामाजिक चळवळी आणि कष्टकरी वर्गाचे जीवन दर्शविणारे महत्त्वपूर्ण लेखन केले आहे. त्यांच्या प्रमुख पुस्तकांमध्ये 'एक गाव एक पाणवठा', त्यांचे आत्मचरित्रात्मक लेखन 'मीच तो माणूस' आणि 'एक साधा माणूस', 'जगरहाटी', 'रक्ताचं नातं', 'असंघटित कामगार : काल, आज आणि उद्या', 'जातपंचायत : दाहक वास्तव', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतन' ही काही महत्त्वाची पुस्तके लिहिली आहेत. या पुस्तकांनी वाचकांच्या मनावर खोल प्रभाव पाडला. बाबा आढाव यांच्या समाज कार्यात या पुस्तकांनी महत्त्वाची भूमिका बजाविली होती.

तळागाळातील लोकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करणे. सातत्यपूर्ण संघटन बांधणी, प्रशासन किंवा मालकांशी संवाद, न्याय आणि हक्कासाठी अत्यंत संयमी व शांत लढा त्यामुळेच त्यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनांमध्ये हिंसा क्वचितच आढळते. त्याऐवजी विचार, संयम आणि तडफ ही तीन शस्त्रे नेहमी दिसतात.

बाबा आढाव यांची एक सत्यशोधक विचारवंत म्हणून असलेली कारकीर्द जवळपास ७० वर्षांची होती. महिला, समता, कष्टकरी, जातीचा मुद्दा आणि इतर अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर त्यांनी आयुष्यभर लढा

दिला. महाराष्ट्राच्या वाटचालीत त्यांच्या कामाचं योगदान मोठं होतं.

बाबा आढाव यांच्या कार्याची दखल घेत त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचे विविध सन्मान, कामगार संघटनांचे विशेष गौरवपत्र, सामाजिक न्यायासाठी मिळालेले अनेक राष्ट्रीय राज्यस्तरीय पुरस्कारांचा यात समावेश आहे. ''कामगारांच्या चेहऱ्यावर दिसणारं समाधानाचे हसू'' हाच खरा पुरस्कार असे ते नेहमी म्हणत.

आज महाराष्ट्रातील हजारो हमाल–माथाडी कामगार सन्मानाने जगत आहेत. अनेकांना नियमित उत्पन्न, सामाजिक सुरक्षा आणि निवृत्ती वेतन मिळत आहे. हा संपूर्ण बदल घडविण्यात बाबा आढाव यांची भूमिका केंद्रस्थानी आहे. त्यांच्या चळवळींचा परिणाम फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिला नाही. भारतातील इतर राज्यांनीही माथाडी कामगार कायदा आणि संघटना मॉडेलचा अभ्यास करून विविध योजना तयार केल्या. त्यांचा वारसा केवळ कायदे किंवा योजना नव्हे; तर जन आंदोलन कसे असावे, संघटन कसे उभे करावे, समाज बदलण्यासाठी आधी स्वत:ला कसे बदलावे हा एक संपूर्ण जीवनमूल्यांचा धडा त्यांच्या कामातून मिळतो. बाबा आढाव यांचे जीवन हे संघर्ष, सेवा, समता आणि मानवी हक्कांच्या विचारांनी भारलेले होते. त्यांनी न्यायाची आणि माणसाच्या आत्मसन्मानाची पायवाट निवडली. त्यामुळेच ते आजही असंघटित कामगार चळवळींचे पितामह, सामाजिक समतेचे दिशादर्शक आणि न्यायासाठी आयुष्यभर झटणाऱ्या अथक योद्ध्यांपैकी एक म्हणून ओळखले जातात. व्यक्ती लहान असली तरी तिचा संघर्ष मोठा असू शकतो आणि सत्यासाठी लढणाऱ्याला काळ कधीच हरवू शकत नाही असा संदेश आपल्याला बाबा आढाव यांच्या जीवकार्यातून मिळतो.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. संध्या दादा मदने**
बी.ए. भाग–३ (मराठी)

# औंधची लोकशाही

**(माहितीपर लेख)**

ही गोष्ट आहे भारतातील एका संस्थानाची. राजेपण कधीच न मिरवलेल्या संस्थानाच्या खऱ्या गांधीवादी राजाची. राजा असला तरी तो प्रजेमध्ये मिसळून गेलेला असा माणूस महाराष्ट्रात होऊन गेला हे आता कदाचित पटणार नाही.

कला, साहित्य, कीर्तन, व्यायाम, उद्योग या सर्वांना एकाचवेळी आश्रय देणारे औंध हे संस्थान होते. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी ८ वर्षं आधीच या संस्थानचा कारभार जनतेच्या हातात आला होता. या सगळ्या गोष्टी महाराष्ट्रातच झाल्या आहेत. हे संस्थान होतं औंध आणि त्याचे राजे होते भवानराव पंडित पंतप्रतिनिधी. तसं पाहायला गेलं आणि इतर संस्थानांची तुलना केली तर औंध हे एकदम चिमुकलं संस्थान होतं. फक्त ७२ खेड्यांच्या या संस्थानानं इतिहासाच्या पानांवर वेगळा ठसा निर्माण केलाच पण त्याहून एक प्रयोगशील संस्थान म्हणून ते अजरामर झालं. या सर्व प्रगतीमागे एका व्यक्तीची प्रेरणा

होती ती म्हणजे भवानरावांची.

औंध संस्थान सन. १६९० साली स्थापन झालं आणि सन. १९४८ साली भारतात पूर्ण विलिन होईपर्यंत ते सुरू राहिलं. श्रीमंत पंडित प्रतिनिधींची मुळ गादी पूर्वी कराड इथं होती. पण कराड इंग्रजांकडे गेल्यावर सन. १८५४ साली प्रतिनिधींची गादी औंधला आली. पण औंध संस्थानाची रचना काहीशी वेगळी होती. सलग असं हे संस्थान नव्हतं. राजधानी औंधला असली तरी बाकीची गावं आजच्या सांगली, सातारा, सोलापूर आणि विजापूर जिल्ह्यात विभागलेली होती.

औंध, कुंडल, आटपाडी, गुणदाळ असे त्याचे चार विभाग होते. त्यातला आटपाडी हा सर्वांत मोठा तालुका होता.

**लोकांची सत्ता** सन. १९३८ साली औंधचे शेवटचे राजे भवानराव पंतप्रतिनिधी यांनी आपल्या संस्थानचा कारभार लोकांच्या हातून चालविला पाहिजे असं मत मांडलं आणि अशी घोषणाही केली. सन. १९३४ पासूनच महाराज गांधीजींच्या स्वराज्य आणि ग्रामराज्य संकल्पनेने भारावून गेले होते. त्यामुळे त्यांनी गांधीवादी राज्यघटना तयार करावी असं मत मांडलं. पंतप्रतिनिधींचे पुत्र आप्पासाहेब पंत यांचे मॉरिस फ्रिडमन नावाचे एक पोलिश गृहस्थ सहकारी होते. मॉरिस फ्रिडमन यांना भारतानंद असंही म्हटलं जाई. राजसत्तेच्या ऐवजी लोकांची सत्ता आणायची तर आपण महात्मा गांधींचा सल्ला घेतला पाहिजे असं फ्रिडमन यांनी राजांना सुचविलं.

**गांधीजींची भेट** फ्रिडमन यांच्या सल्ल्यानुसार पंडित सातवळेकर, अप्पा पंत, मॉरिस फ्रिडमन आणि आणखी काही सहकारी वर्ध्याला म.गांधीजींना सेवाग्राम आश्रमात भेटायला गेले. म.गांधीजींनी त्यांना स्वराज्याचं महत्त्व पटवून दिलं. काही दिवसांनी स्वतः राजे भवानराव पंतप्रतिनिधी गांधीजींना भेटायला गेले. या भेटीमध्ये गांधीजींनी खेडी स्वयंपूर्ण होणं, स्वतंत्र होणं का गरजेचं आहे हे सांगितलं ''लोकाच्या सद्सत्विवेकबुध्दीचा विश्वस्त आणि त्यांचा आद्य सेवक म्हणून राजाला तनखा जरूर मिळाला पाहिजे पण त्याबद्दल आग्रह किंवा तो हक्क आहे असे मानू नये,'' असं गांधीजींनी राजेसाहेबांना सांगितलं.



## गांधीजींची कल्पना आणि औंध एक्सपेरिमेंट

गांधीजींनी प्रत्येक गावात पाच पंचांचं मंडळ स्थापन करावं. गावातले शिक्षण, सुरक्षा, रस्ते, बाजार, यात्रा, शेती याचे सर्वाधिकार त्यांना द्यावेत आणि संस्थानच्या महसुलातला अर्धा वाटा गावांसाठी द्यावा असं सुचविलं. गावातले तंटेबखेडे गावातच मिटवावेत. काही गावांची मिळून एक तालुका पंचायत तयार करावी. तालुक्याची सर्व प्रगती या पंचायतीतून झाली पाहिजे. प्रत्येक तालुका पंचायत समितीने आपल्यातून तीन सदस्य औंधच्या मध्यवर्ती काउन्सिलवर पाठवावेत. या काउन्सिलवर बाहेरच्या तज्ज्ञ मंडळींना नेमण्याचा अधिकार राजाला असेल आणि वर्षातून किमान दोनवेळा काउन्सिलचं सत्र व्हावं असं त्यांनी सुचविलं.

यानुसार राजे भवानराव पंतप्रतिनिधी यांच्यासाठी मॉरिस फ्रिडमन यांनी राज्यघटनेचा मसुदा तयार केला. त्यानुसार जो लोकशाहीचा प्रयोग औंध संस्थानात राबविला गेला त्यालाच औंध एक्सपेरिमेंट असं म्हटलं गेलं. याच नावाने हा प्रयोग देशभरात प्रसिद्ध झाला. मसुद्यात काही सुधारणा महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांनी सुचविल्या आणि त्या औंधच्या जुन्या कौन्सिलकडे मंजुरीसाठी पाठवल्या. कालांतराने या घटनेच्या कायद्यात दुरुस्त्याही झाल्या.

दि. २१ जानेवारी १९३९ रोजी औंधच्या राजानं आपली सत्ता लोकांच्या हाती सोपविण्याचं ठरविलं आहे. दि. २१ जानेवारी १९३९ रोजी ही राज्यघटना लागू करण्याचं निश्चित झालं आहे असं सांगून महात्मा गांधीजींनी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर आणि दादासाहेब मावळणकरांना या दिवशी औंधला भेट देण्यास सांगितलं. लोकांचं राज्य घोषित करण्याच्या कार्यक्रमात राजे लोकांना उद्देशून म्हणाले, ''आता राज्य तुमचं, अधिकार, पैसा, सुधारणा तुम्हीच तुमच्या हाताने करणार.'' नवी राज्यघटना स्वीकारल्यावर नव्या काउन्सिलसाठी निवडणुका घेणं आवश्यक होतं. त्यासाठी तीन महिन्यात साक्षरता वाढविण्यासाठी संस्थानात प्रयत्न झाले. ७० टक्के लोकांना अक्षरओळख होईल इतपत शिकविण्यात आलं. त्यानंतर जून महिन्यात निवडणुका झाल्या आणि नवे काउन्सिल निवडले गेले. आप्पा पंत त्याचे पंतप्रधान झाले. सन. १९४३-४४ या काळात रामाप्पा बिद्री हे पंतप्रधान होते.

सन. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात आणि सन. १९४२ ते सन. १९४७ या काळात क्रांतीकाऱ्यांचं एक महत्त्वाचं केंद्र म्हणून या संस्थानानं भूमिका बजाविली होती. महात्मा गांधीजींच्या 'चले जाव' आंदोलनात आणि प्रतीसरकारच्या कार्यात संस्थानातील लोकांचा मोठा वाटा होता. लोकशाहीचा हा प्रयोग पाहाण्यासाठी जवाहरलाल नेहरू यांनीही औंधला भेट दिली होती.

आपल्या संस्थानातील मुलं शिकून मोठी व्हावीत यासाठी भवानरावांनी भरपूर प्रयत्न केले होते. सन. १९१६ पासून औंध संस्थानात सक्तीच्या शाळा सुरू करण्यात आल्या. संस्थानात फार पूर्वीपासून मुलींची शाळा, रात्रशाळा, गुन्हेगारांची शाळा, प्रौढांची शाळा, कामगार, तेव्हा अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या समाजासाठी शिक्षणाचे प्रयत्न केले होते. मुलांमधील गुणांची पारख करून ते सल्लाही देत. लक्ष्मणराव किर्लोस्कर, नागुराव ओगले अशा थोर लोकांचा संस्थानाशी संबंध आहे.

एके दिवशी आटपाडी भेटीवर गेले असताना एका गजानन नावाच्या शाळकरी मुलाने वेगवेगळ्या नकला करून राजाला भरपूर हसविलं होतं. त्यावर खुश होऊन राजांनी त्याला जवळ बोलावून शाबासकी दिली आणि काय करतोस असं विचारलं.

तेव्हा त्याच्या शिक्षकांनी हा मुलगा सतत टवाळी करतो, गावात भटकतो अशी तक्रार केली. ''गजानन तू मास्तरांच्या नादाला लागू नको. तुला अभ्यास जमणार नाही, तू सिनेमात जा. जगदंबा तुझं कल्याण करेल....'' असं महाराजांनी त्याला सांगितले,

हा मुलगा पुढे जाऊन आपल्या सर्वांचे लाडके गदिमा झाले. सिनेमा, गीतलेखन, गीतरामायण सर्वच क्षेत्रांमध्ये त्यांनी उत्तुंग यश मिळविलं. पटकथालेखक मधुकर पाठकही औंध संस्थानचेच होते.

कलावस्तूंचे, चित्रांचे संग्राहक म्हणूनही भवानराव ओळखले जातात. ते स्वतः सुंदर चित्रं काढत. नामवंत चित्रकारांना त्यांनी आश्रय दिला आणि त्यांच्याकडून उत्तमोत्तम चित्रं काढून घेतली होती. आजही औंधचं संग्रहालय कलावस्तूंनी संपन्न मानलं जातं.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. भारती रविंद्र लोंढे**
बी.ए.भाग-१



# महाराष्ट्राचे नंदनवन महाबळेश्वर

**(प्रवासवर्णनपर लेख)**

निमित्त होतं वडीलांबरोबर मामाकडे जाण्याचं आणि दिवस होता सुट्टीचा... कॉलेजमधील चार-पाच जणांना विचारलं गाडी आहे येणार का? दोघे तयार झाले. सकाळी लवकर निघायचं ठरलं. आमचा प्रवास पुसेगाव ते महाबळेश्वर असा होता. माझ्या सोबतीला कॉलेजचे मित्र अजय मोरे, उत्कर्ष जाधव आणि मी असे आम्ही तिघेजण होतो. सुरवात झाली ती पुसेगावमधून. पुसेगाव, कोरेगाव, सातारा ते मेढा-केळघर मार्गे सुंदर अशा निसर्गरम्य वातावरणात आमचा हा प्रवास महाबळेश्वरला निघाला होता. केळघरच्या घाटातून म्हणजेच सह्याद्रीच्या कुशीतून वेडीवाकडी वळणे घेत आमचा प्रवास सुरु झाला. त्या निसर्गरम्य वातावरणात आम्ही विलोभनीय निसर्गाचा आनंद घेत होतो. या वातावरणात आम्हाला भेटत होती डोंगरामधील छोटी घरं, हॉटेलं, रेस्टॉरंट, काही बंगले आणि उंचच उंच दऱ्या.

आमचा प्रवास सुरु असताना केळघर घाटात आम्ही सर्वजण एका ठिकाणी थांबलो. अवघड असलेल्या त्या घाटात थांबलेल्या ठिकाणी थोडी प्रशस्त जागा होती. आम्ही सर्वजण समोर दिसत असलेल्या लिंगमळ्याचे विहंगम दृश्य पाहात होतो. डोंगर चढणीवर असलेली ग्रीन हाऊसेस, स्ट्रॉबेरीची शेती व दूरवर पसरलेलं हिरवंगार डोंगरलेणं पाहून मन मोहून जात होतं. आम्ही कठड्याजवळ उभे राहून पाहत असताना माझ्या वडीलांनी हाक मारली. आम्हाला तिघांना पण तिथं असणाऱ्या एका चहाच्या टपरीवर चहा पिण्यासाठी या असं त्यांनी सांगितलं. सकाळी लवकर निघाल्यामुळे आम्हालाही चहाची खूपच आठवण झाली होती. आम्ही चहा पिण्यासाठी आलो आणि माझ्या वडीलांनी सांगितलं सकाळी तुम्ही नाष्टा केला नाही काही खायचं असेल तर

खाऊन घ्या. घरून आईने करंज्या दिल्या होत्या त्यासोबतच आम्ही सर्वांनी मिळून चहाबरोबर थोडा नाष्टा केला. आता आम्हांला महाबळेश्वर येथे एस.टी.स्टँडच्या जवळच असलेल्या माझ्या मामाच्या दुकानात जायचं होतं. आमची गाडी मामाच्या दुकानाजवळ गेली. मामाने गाडी पार्कींग करण्याची योग्य जागा वडीलांना दाखविली व वडील म्हणाले, 'तुम्ही इथचं थांबा मी गाडी पार्किंग करुन येतो.' वडील आल्यानंतर ते मामांबरोबर बोलतं बसले. आम्ही तिघे मित्र बाहेरच थांबलो होतो. नवीनच पाहुणे आल्याचे पाहून तिथल्या टॅक्सीवाल्यांनी आमच्या भोवती पिंगा घालायला सुरुवात केली. काहींनी माहिती सांगितली. महाबळेश्वर कसं फिरायचं, कोणते पॉईंट आहेत, किती वेळ लागेल, किती पैसे लागतील याची इत्यंभूत माहिती आम्हांला टॅक्सीवाल्यांकडून मिळाली. वडीलांना विचारुन आम्ही तिघांनी ठरविलं एक टॅक्सी करावी व वडीलांचे काम उरकेपर्यंत महाबळेश्वर फिरुन घ्यावं. मग एक टॅक्सी केली व प्रथम आम्ही आर्थर सीट पॉईंटकडे निघालो. हा पॉईंट महाबळेश्वरमधील पर्यटकांचा लोकप्रिय पॉईंट आहे. या पॉइंटच्या एका  बाजूला खोल दरीतून कोकणात जाणारी सावित्री नदी आहे. तर दुसऱ्या बाजूला घनदाट जंगल आहे. या पॉईंटवरून महाबळेश्वरचा निसर्गरम्य परिसर आणि तेथील मनमोहक दृश्यं पर्यटकांना आकर्षित करतात. याच पॉईंटवरून दुर्बीनीतून रायगड किल्ला आणि तोरणा किल्ला पाहताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची आठवण येते. त्यानंतर टॅक्सीवाल्याने आम्हाला ईको पॉईंटकडे नेहलं. खरं तर आर्थर पॉईंट कडे जाताना मार्गावरच इको पॉईंट आहे पण आम्ही प्रथम आर्थर पॉईंट पाहिला व नंतर इको पॉईंटकडे गेलो. इको पॉईंट म्हणजे निसर्गरम्य परिसर, उंच पर्वत रांगा, खोल दऱ्या आणि आरोग्यदायी वातावरण यामुळे हा पॉईंट खूपच मनमोहक वाटतो परंतू मला असं वाटू लागलं की त्या ठिकाणी सकाळी जाणं केव्हाही चांगलं.

माझ्या मित्राने सदरच्या टॅक्सीवाल्या काकांना विचारलं कोयना नदी कुठून दिसते. मला या ठिकाणी आवर्जून सांगावे लागेल आमच्या सोबत जे टॅक्सीवाले काका आले होते त्यांना महाबळेश्वरची खूपच बारीक–सारीक माहिती होती. त्यांचं पर्यटकांबरोबर बोलंणंही खूपच मनाला भावणारं होतं. कदाचित त्यामुळेच आम्ही खूपच सुखावून गेलो आणि त्यानंतर आम्ही फॉकलंड पॉईंटकडे निघालो. फॉकलँड पॉइटवरून प्रतापगड, जावळीखोरे व कोयना नदीचे दर्शन होते. मावळत्या सूर्याचे दर्शन घेण्यासाठी पर्यटक या ठिकाणी येतात. मावळणाऱ्या सूर्याचे अतिशय विहंगम आणि मनमोहक असे दृश्य पर्यटकांना आकर्षित करते असे आम्हांला टॅक्सीवाल्या काकांनी सांगितलं. मला खूप वाईट वाटलं कारण आम्ही या ठिकाणी सायंकाळी न येता साधारणपणे दुपारी बारा वाजता आलो होतो. आम्ही त्या ठिकाणी फिरत असताना तिथं अचानक माझ्या मामाचा मुलगा भेटला. विचारपूस केल्यावर त्यांने सांगितलं त्याचे पुण्याचे चार मित्र महाबळेश्वर फिरायला आले आहेत. मग आमचा ग्रुप मोठा झाला व आम्ही तिथून पुढे सनसेट पॉईंट पाहण्यासाठी निघालो. या पॉईंटला बॉम्बे पॉईंट असेही म्हणतात. येथे सुध्दा पर्यटक मावळत्या सूर्याचे दर्शन घेण्यासाठी येतात. बॉम्बे पॉईंट पाहिल्यानंतर आम्ही थोडा वेळ थांबून एका हॉटेलमध्ये जेवणाचा विचार केला. टॅक्सीवाले काका म्हणाले 'येथे जेवण्यापेक्षा वेण्णा लेकच्या अलीकडे खास महाराष्ट्रीय जेवण मिळणारे चांगले हॉटेल आहे.' मग आम्ही त्या हॉटेलमध्ये गेलो. तेथील जेवणाचा आस्वाद घेतला. अप्रतिम चवीचं जेवण मिळणाऱ्या त्या हॉटेलची चौकशी केली तर त्या हॉटेलचे मालक माझ्याच तालुक्यातील औंधचे असल्याचे मला समजले. मला याचा खूप अभिमान वाटला. आम्ही तेथून वेण्णालेकला पोहोचलो. महाबळेश्वर येथील वेण्णा लेक सरोवराची निर्मिती सातारचे राजे श्रीमंत छत्रपती आप्पासाहेब महाराज यांनी एकोणिसाव्या शतकात केली आहे. हे सरोवर सुमारे २८ एकर क्षेत्रात पसरलेले आहे. बारमाही वाहणारे झरे यामुळे सरोवराचा परिसर

फुलझाडांनी फुलला होता. पावसाळ्यात वेण्णा सरोवरात पाण्याचा भरपूर साठा होतो. पाचगणी कडे जाणाऱ्या रस्त्यावर वेण्णा सरोवराजवळ लिंगमळा (लिंगमळा वॉटरफॉल) आणि चिंतामण हे धबधबे पावसाळ्यात अतिशय सुंदर दिसतात. परंतू आम्ही दिवाळीनंतर गेलो असल्यामुळे फेसाळणारे धबधबे आम्हाला पाहता आले नाहीत. घड्याळात पाहिले तर चार वाजायला आले होते. वडीलांचा दोनदा फोन झाला होता तरी पण टॅक्सीवाल्या काकांच्या मार्गदर्शनुसार केटस् पॉईंट पाहूनच मामाकडे जावे असे सर्वांनुमते ठरलं व आम्ही केटस् पॉईंटला गेलो. केटस् पॉईंटवरुन पाहिले तर धोम धरणाचे निळशार पाणी, वर असलेलं बलकवडी धरण, समोर दिसणारा उंचच उंच कमळगड व एका बाजूला घनदाट जंगलात असलेलं जोर खोरं दिसतं. निसर्गाने महाबळेश्वरला खूप भरभरुन दिलं आहे. आम्ही तो निसर्ग पहात असताना टॅक्सीवाल्या काकांनी सांगितलं खाली दिसतात ती गावं वाई तालुक्यातील नांदगणे, वयगाव, दह्याट, बोरगाव आहेत. लांब दिसणाऱ्या चिखलीजवळील तायघाटातूनच अफजलखान प्रतापगडाकडे गेला होता. टॅक्सीवाल्या काकांची माहिती अतिशय अभ्यासपूर्ण होती. हळूहळू अंधार पडायला आला होता. धोम धरणाच्या बांधांऱ्यावरील एका रांगेत असणाऱ्या लाईटी दिसू लागल्या व आम्ही सर्वजन मामाच्या घराकडे परत आलो. ❑ ❑ ❑ ❑ ❑

**तुषार कैलास साठे**
बी.ए.भाग-३ (मराठी)

# लोकगीतातील आईबापांचे प्रेम

**(समिक्षापर लेख)**




मानवी समाज जीवनाचे अस्सल रूप आढळत असेल तर ते लोकगीतांमध्येच. समाजजीवनाचे प्रतिबिंब लोकसाहित्यात उमटलेले दिसून येते. आधुनिक काळातही लोक साहित्यात समाजनीती, रूढी नाते, प्रेम, प्रसंग, घटना, ऋतू या साऱ्या घटना शब्दचित्रात बांधून असतात. स्त्री ही जग निर्माता आहे. तसेच साहित्यात गाणी, गोष्टी, नृत्य, संगीत, भाव-भावनांचा सुंदर गजरा बांधुन सौंदर्य वाढविणारी शिल्पी आहे. प्राचीन कळात स्त्रियांना परावलंबी समजले जायचे. त्यांच्या जगण्या-मरण्याचे सर्व अधिकार पिता, पती,

पुत्र, भाऊ यांच्या हातात असायचे. लहानवयात लग्नं व्हायची. वडील निर्णय घ्यायचे. सासुरवास, पतीचा छळ, दु:ख, अपमान, शोषण या असाह्य यातना फक्त स्त्रियांच्याच वाट्याला येत असायच्या.

आई-वडिलांचं प्रेम त्यांची आठवण ते रक्ताचे नाते, आकाशाएवढी माया, ते प्रेम, वात्सल्य महानदीसारखे ते विशाल हृदय, गगनाला गवसणी घालणारे ते दोन डोळे, सूर्य-चंद्र-तारे, ते दोन जीव, मायेची सावली देणारे अमृतवृक्ष, म्हणूनच आईबापाचे वर्णन करताना मी म्हणते की,

'' बाप माझा पिता माय माझी निंबोनी

कशी जाऊ मी निघोणी दोन झाडाच्या मधोनी'

या दोन झाडांच्या सावलीपासून मी कधीच दूर जाणार नाही

'' बाप माझा पिता माय माझी चिंचपानं

वाढली मी तिच्या सावलीनं ''

'आई' आईच असते, तिची जागा कोणीही भरून काढू शकत नाही. म्हणून मावशी व आईतील अंतर पुढील ओळीतून स्पष्ट होते.

'' आई म्हणता म्हणता व्हटाले व्हटं मिळे

मावशी म्हणल्यानं अंतर किती पडे ''

जणू देहातून निघालेली हाक देहाच्या कणाकणांत भिजते आईच्या अस्तित्त्वाचा, प्राणत्त्वाचा गंध जाणवतो. म्हणजे ' माय ' म्हणताना एकमेकांना ओठ चिकटतात परंतु 'मावशी' म्हणताना ओठांत अंतर पडते. आई शेवंती, चमेली, बकुळीची सुगंध सावली, तर पिता वड, आधार महावृक्षासारखा. महाआधारवड म्हणजे पिता होय.

अंगावरच्या चामडयाचे जोडे करून घालून दिले तरी आईच्या उपकाराची, प्रेमाची परतफेड करता यायची नाही. प्रत्येक माणूस हा आपल्या आईच्या ऋणातून कधीच मुक्त होत नाही. सौंदर्याने परिपूर्ण भावनांचा सुगंधित फुलोरा लोक साहित्यातील स्त्रिगीतांच्या दालनांत लपलेलं बावनकशी सोनं आहे. शिंपल्यातील मोती आहे.

या अमूल्य गीतांचा नजराणा आज आपल्याला पाहायला मिळत नाही, काळाच्या ओघात गडप होत असल्याचे जाणवते.

'बाई जातीचा जलम, कुणी घातला येडयाने, बैल राबतो भाडयाने',

भाडयाच्या बैलाप्रमाणे तिला काम करावे लागते. मनातल्या भावना तिला व्यक्त करता येत नाहीत. दळण दळताना तिला फार कष्ट पडते. तिला बालपणाचं आई बाबाचं सुख आठवतं ते गीतातून सांगते ती मन रीते करून घेते.

'' लय झाल्या लेकी, नको म्हणूस येडया बापा
उडूनीया गेल्या चिमण्या-भोरडयांचा ताफा
कसा मोकळा दिसे सोफा ''

लग्न होऊन लेक सासरी जाते तेव्हा आईबापाला घर सुनंसुनं वाटतं. आई बापाच्या माघारी लेकीचा आधार तुटतो. आपल्या संसारातच तिला समर्थपणे उभे रहावे लागते.



❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. ऋतुजा दत्तात्रय सावंत**
बी.ए.भाग-३ (मराठी)

# हसविणारे मराठी विनोद

गणिताचे शिक्षक स्टाफरूम मध्ये रिकाम्या डब्यात चपाती बुडवून खात होते...

मराठीचे शिक्षक म्हणाले सर डब्यात तर काहीच नाही...

गणिताचे शिक्षक : आम्ही भाजीला एक्स मानल आहे..!

---

गुरूजी : एक बाई एका तासांत ५० पोळ्या बनवत असेल, तर तीन बायका एका तासांत किती पोळ्या बनवतील ?

बंड्या : एकही नाही.

कारण, ती एकटी आहे म्हणूनच तर काम करते.
तिघीजणी मिळून फक्त गप्पा मारतील.

---

जोशी : मी इथले टॉयलेट वापरू का ?''

नेने : हो, पण पैसे पडतील....!''

जोशी : नाही पडणार.... बसताना काळजी घेईन....!!''

---

पप्पूचं लग्न झालं आणि त्याचा संसार सुरू झाला.

एकदा पप्पू त्याच्या बायकोला विचारतो.

तू माझ्यात असं काय पाहिलंस की मला डायरेक्ट लग्नाला हो म्हणालीस ?

पप्पूची बायको : मी तुम्हाला एकदोन वेळेस भांडी घासताना पाहिलं.

बायको: माझी एकअट आहे!
नवरा : काय?
बायको: तुम्ही या दिवाळीत सोडायला आले तरच मी माहेरी जाणार.
नवरा: माझी पण एक अट आहे?
बायको: काय?
नवरा: मी घ्यायला आलो तरच परत यायचे?

---

चिंगी : मस्त मोबाईल आहे कुठून घेतलास.

झंप्या : विकत नाही घेतला, मला धावण्याच्या शर्यतीत बक्षीस मिळाला आहे.

चिंगी : कितीजण होते धावायला. ?

झंप्या : मोबाईल दुकानाचा मालक, पोलिस आणि मी....!!!

---

बंड्या: बाबा, मला गाडी घेऊन द्या.
वडील : देवानं दोन पाय कशाला दिलेत..!

बंड्या : एक किक् मारायला, न् एक गिअर बदलायला. ...... लय हानला...!

---

मुलगी रडत असते
मुलगा : काय झाल ? का रडतेस ?
मुलगी : मला परीक्षेत कमी मार्क्स मिळाले
मुलगा : हात्तीच्या एवढंच न! होत अस कधी कधी. किती मार्क्स मिळाले तुला?
मुलगी : ८८
मुलगा : आयला.... या मार्कात दोन पोर पास झाली असती.

कु. अनुराधा पोपट दळवी
बी.ए.भाग–१

# स्वामी विवेकानंदांचे अनमोल विचार

**आत्मविश्वास** स्वामी विवेकानंदांचा असा विश्वास होता की आत्मविश्वास माणसाला यशाकडे घेऊन जातो. त्यांचा असा विश्वास होता की, प्रत्येक मानवामध्ये प्रचंड शक्ती आणि क्षमता असते, ज्या ओळखल्या पाहिजेत आणि योग्य दिशेने वापरल्या पाहिजेत.

**योग** स्वामी विवेकानंदांनी योगाला केवळ शारीरिक व्यायामाचा एक प्रकार म्हणून नव्हे तर मानसिक आणि आध्यात्मिक विकासाचा एक प्रकार म्हणून सादर केले. त्यांचा असा विश्वास होता की, योग हा संतुलित आणि शांत जीवन निर्माण करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे.

**धार्मिक समानता** स्वामी विवेकानंद धर्माला एकता आणि समानतेचे प्रतिक मानत होते. त्यांचा असा विश्वास होता की, सर्व धर्मांचे मूळ एकच आहे, जे मानवता आणि बंधुत्वावर आधारित आहे. ते म्हणायचे, तुमचा धर्म फक्त तुमच्या आत आहे आणि तो जगाच्या वर आहे.

**शिक्षण** स्वामी विवेकानंदांचा असा विश्वास होता की शिक्षण केवळ पुस्तकांपुरते मर्यादित नसावे, तर ते जीवनाच्या प्रत्येक पैलूशी संबंधित असले पाहिजे. शिक्षणाद्वारे व्यक्तीने त्याच्या आध्यात्मिक आणि सामाजिक जबाबदाऱ्या योग्यरित्या समजून घेतल्या पाहिजेत आणि पूर्ण केल्या पाहिजेत यावर ते नेहमीच भर देत असत.

**स्वतःला कमकुवत समजणे** स्वामी विवेकानंद म्हणायचे, स्वतःला कमकुवत समजणे हे सर्वात मोठे पाप आहे.

**विश्वाची शक्ती** ''विश्वाच्या सर्व शक्ती आधीच आपल्या आहेत; आपणच आपले डोळे झाकतो आणि नंतर ते किती अंधार आहे याबद्दल रडतो.''



**कामाच्या वेळेचे व्यवस्थापन:** ''एका वेळी एक काम करा आणि तुमचा संपूर्ण आत्मा त्यात ओतला.''

**जगप्रसिद्ध उद्धरण** ''उठा, जागे व्हा आणि ध्येय गाठेपर्यंत थांबू नका'' हे त्यांचे प्रसिद्ध उद्धरण अजूनही लाखो लोकांना त्यांच्या ध्येयाकडे वाटचाल करण्यास प्रेरित करते.

**हृदयातून कृती** ते नेहमीच म्हणायचे, ''तुम्ही जे काही कराल ते मनापासून करा, आणि यश तुमच्या मागे येईल.''

**आत्मविश्वास आणि आत्मधारणा**

''तुम्ही जे काही विचार करता ते तुम्ही व्हाल. जर तुम्ही स्वतःला कमकुवत समजलात तर तुम्ही कमकुवत व्हाल; जर तुम्ही स्वतःला बलवान समजलात तर तुम्ही व्हाल.''

आजही स्वामी विवेकानंदांचे हे प्रेरणादायी विचार राष्ट्र आणि जगाला आध्यात्मिक जागृती आणि बलवान भारतासाठी प्रेरित करतात.

**सार्थक आनंदराव बनसोडे**
बी.ए.भाग-१

# आयुष्य आहे तुझ्यासाठी

**(ललित लेख)**

'आयुष्य आहे तुझ्यासाठी, तू नाहीस आयुष्यासाठी, जाणून घे अर्थ यातला, सुंदर ते जगण्यासाठी.' श्री कृष्ण हा प्रत्येक गोष्टीत शीग ओलांडणारा झाला. याच कृष्णाने प्रत्येक गोष्टीत अमर्याद सौंदर्य व चैतन्य आणले. वाऱ्याच्या झोताप्रमाणे सोसाट्याचे जीवन जगला. अगदी चोरीलाही त्याने रमणीयत्व आणले. विनोदाचे अंग मनमुराद जोपासले. 'पावा' हे तर गुराख्याचे साधे–सुधे वाद्य पण कृष्णाने त्याला किती जिवंतपणा आणला.

इथे श्रीकृष्णाची आठवण करून देण्याचा हेतु म्हणजे प्रत्येक गोष्टीत किती रमणीयता व आनंद आहे, तो फक्त आपल्याला ओळखता येत नाही व आनंदाचे क्षण ही आपल्याला नीट पकडता येत नाहीत त्यामुळे आपण दु:खी होतो.

थोडक्यात ''जीवन हे शोध आहे, सुखदु:खाचा शोध हेच तर आपणाला कळत नाही. हाच तर मोठा खेद आहे.''

कंटाळा आला या जगण्याचा, देवा सोडव रे बाबा ।। या जगण्यातून असे परमेश्वराला आळविणारे पुष्कळ जन असतात. क्षुल्लक अपयशाने खचून जावून काहीजन आत्महत्या सुध्दा करतात व आपले मौल्यवान जीवन संपवून टाकतात. या लोकांना मी सांगेन, ''या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे.'' खरे पाहता या जगात अशा पुष्कळ गोष्टी आहेत की, त्या मानवाला जगण्याची प्रेरणा देतात. नवी उमेद देतात.

माणसाने नेहमी आशावादी व सकारात्मक रहायला हवे. कारण माणसाच्या दु:खाचे कारणच निराळे आहे. माणसाला न मिळू शकणाऱ्या गोष्टी नेहमीच हव्या असतात. त्या मिळाल्या नाही तर तो निराश होतो व आत्महत्येचा विचार करतो. माणसानं नेहमी ताठ मानेन जगाव. अगदी वादळासारखं आणि वादळासारखचं पटकण विलीन व्हावं. माणसानं वादळ होवून जगलं तर संकटाच्या वादळाशी सामना करायला किती वेळ लागेल बरं !

''म्हणून मला सांगावेसे वाटते की,

सारं सारं विसरायचं असतं, जे आपल्याला दु:ख देत.''

कारण या दु:खापेक्षा तरी आयुष्य नक्कीच मोठं असतं. प्रेम, संयम, आदर, प्रशंसा, क्षमाशिलता, प्रामाणिकपणा, एकात्मता, करूणा व शांतता या नऊ गोष्टी जपल्याबद्दलचा महान पुरस्कार म्हणजे जीवनात मिळालेले सुख अपार आनंद होय. यापेक्षा आणखी कायं हवयं.

मग तुम्हीच म्हणालं, 'या जगण्यावर शतदा प्रेम करावे''

काही माणसे असतात काठावरती बसणारी, बुडणाऱ्यांना पाहून खुदकन हसणारी.

ही मानवी भावना बदलायला हवी. मग कळेल इतरांसाठी जगण्याचे समाधान इतरत्र कुठेच मिळणार नाही. काही लोक मनात कितीही दु:ख असले तरी ते नेहमी हसतमुख असतात. मी तर म्हणेन तेच खरे जगातले सुखी.

कितीतरी चेहरे नेहमी खुप दु:खी असतात. पण तरीही ते हस्याच्या उंबरठ्याखाली आपले दु:ख लपवितात.

निराशेच्या गर्तेत हरवलेल्या जीवन प्रवाशांना माझे सांगणे आहे की, त्या सध्यस्थितीत समाधानी, तृप्त राहायला शिका, नाहीतर जवळचे सुख हरवून बसालं.

आळवावरचं पाणी बघा, जागेवरच राहतं, कारण मोती दिसण्याच्या नादातं ते वाहायच विसरतं. असं स्वतःच अस्तित्व विसरून जावू नका, तर ते निर्माण करा. आयुष्य जगण्याची उत्तुंग कला ज्याने मिळविली तोच खरा यशस्वी व श्रीमंत असे म्हणावे लागेल. यावरून एक प्रसंग आठवला, एका व्यक्तिला सतत आनंदी व हसत राहण्यची सवय होती. तेव्हा सर्वजन त्याच्यावर चिडतं, त्यांना या माणसाचे नवल वाटे. एकदा माणसांनी ठरवले, याची खोड मोडूया, मग बघू कसा हसत राहतो ते. म्हणून त्यांनी त्याला एका खड्ड्यात ढकलूनही दिले. ती व्यक्ती हसून म्हणते आता यापेक्षा तरी खाली तुम्ही कोणीही ढकलू शकणार नाही ना? पहा एवढया कठीण परिस्थितीत ही मनाचा तोल ढासळू न देता जगणारी माणसं खरचं धन्य.

संकटाची मालिका तर बघू या.

आपण एकदा वाट चुकावं, वाट शोधायचा प्रयत्न करावा, ठेचकाळत पडत–झडत निघावं, तर त्यात समोर साप दिसावा, साप मारण्यास दगड उचलावा, पण त्याखालून विंचू निघावा, या दोघांशी सामना करत पुढं निघावं, तर पळताना विहिरीत पडावं, वेलीला धरून वर येण्याचा प्रयत्न करावा, तर वर भुकेलेला वाघ दिसावा, त्यात वेल हातातून तुटावा, अन वेलींवरील मधमाश्यांच्या पोळयाला धक्का लागावा. मधमाश्यांनी जोरात चावा घ्यावा, एवढया परिस्थितीतही त्या पोळयातून थेंबथेंब गळणाऱ्या मधाचा आस्वाद घेण्याचा प्रयत्न करावा.

कारण : ''जीना इसिका नाम है।''

कितीही संकट आली तरी त्यावर मात करण्याची ताकद मनगटात हवी. नेपोलियन बोनापार्ट म्हणतात. जगामध्ये कोणतीच गोष्ट अशक्य नाही. किरण बेदी म्हणतात, "Everythig is possible, Nothing is impossible."

जीथं–तिथं न थांबता चालायचे असते. वनव्यासारखी दुःख पसरत जात असतात. ती नमवण्याची शक्ती आपल्यात असली पाहीजे.

शेवटी मी एवढेच सांगू इच्छिते. जीवनातला प्रत्येक मोहक क्षण मनाच्या कप्प्यात साठवून ठेवा. तो तुमच्या सुखी व हसऱ्या जीवनाचा आसरा ठरेल. तीच तिजोरी असेल.

हे भगवान सबको सुखशांती देना ! हे भगवान सबको सुखशांती देना !

लेकिन ....... इसकी शुरूवात मेरे से करना ! हसलात ना .........

या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे ............ शतदा प्रेम करावे.

आयुष्य हे खूप सुंदर आहे. काळजाच्याही काळजात जपून ठेवावं इतकं ते सुंदर आहे.

**प्रथमेश रणजीत दळवी**
बी.ए.भाग–२

हातावरील रेषेत दडलेले भविष्य
बघू नका; त्याच हाताने कष्ठ करा
व स्वतःचे भविष्य घडवा.

स्वप्नं ती नव्हेत जी झोपल्यावर पडतात,
स्वप्नं ती जी तुम्हाला झोपूच देत नाहीत

स्वतःवर असलेला विश्वास
जेव्हा अधिकाधिक घट्ट होतो,
तेव्हा तोच विश्वास आपल्या
आयुष्यातही परावर्तित होतो.

सूर्य सर्व प्रकारच्या चांगल्या-वाईट
वस्तूंवर प्रकाश टाकतो,
परंतु स्वतः मात्र पूर्णपणे शुध्द राहातो,
अशा सूर्यप्रकाशाप्रमाणे आपण
आपले चारित्र्य घडविले पाहिजे



# मायेची सावली सिंधुताई सपकाळ

**(व्यक्तिचित्रणपर लेख)**

भारतीय समाज जीवनात काही व्यक्तीमत्त्वे अशी असतात की, ती केवळ स्वत:चे आयुष्य घडवित नाहीत; तर हजारो अनाथ, उपेक्षित आणि दुर्लक्षित जीवनांना दिशा देतात. अशाच थोर व्यक्तीमत्वांपैकी एक म्हणजे सिंधुताई सपकाळ. ''अनाथांची आई'' म्हणून संपूर्ण भारतात ओळखल्या जाणाऱ्या सिंधुताई यांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजासाठी अर्पण केला. त्यांचे जीवन म्हणजे संघर्ष, त्याग, करुणा आणि मातृत्व यांचे प्रतिक होय.

## बालपण आणि शिक्षण

सिंधुताई सपकाळ यांचा जन्म दि. १४ नोव्हेंबर १९४८ रोजी महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील 'पिंप्री मेघे' या गावात झाला. त्यांचे मूळ नाव सिंधू असे होते. अत्यंत गरीब शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. बालपणापासूनच गरिबी, उपेक्षा आणि संघर्ष हेच त्यांच्या वाट्याला आले. मुलींनी शिकू नये, हा तत्कालीन समाजाचा दृष्टिकोन असल्याने त्यांचे शिक्षण अर्धवट राहिले. मात्र शिक्षणाची ओढ आणि जीवन समजून घेण्याची तीव्र जिद्द त्यांच्या मनात कायम होती.

## अल्पवयीन विवाह आणि दु:खद आयुष्य

नऊ वर्ष वय असताना त्यांचा विवाह करण्यात आला. सासरी त्यांना अपमान, अवहेलना आणि मानसिक छळ सहन करावा लागला. गर्भवती असतानाच त्यांच्यावर चारित्र्याचा खोटा आरोप लावण्यात आला आणि त्यांना घराबाहेर काढण्यात आले. समाजाने नाकारलेल्या, पोटात बाळ असलेल्या या स्त्रीने रस्त्यावरच आपले जीवन सुरू केले. हा काळ त्यांच्या आयुष्यातील सर्वात वेदनादायक होता.

## मातृत्वाची वेदना आणि त्याग

सिंधुताईंनी रेल्वे स्थानकावरच आपल्या कन्येला जन्म दिला. परंतु परिस्थितीमुळे त्यांनी त्या बाळाला एका आश्रमात सोपविले. स्वतःच्या मुलीपासून दूर राहून त्यांनी अनाथ मुलांनाच आपली मुले मानण्याचा निर्णय घेतला. हाच क्षण त्यांच्या जीवनातील निर्णायक ठरला. वैयक्तीक दुःख बाजूला ठेवून समाजातील दुर्बल घटकांसाठी जगण्याची प्रेरणा त्यांना मिळाली.

## समाजकार्याची सुरुवात

भीक मागून, भाषणं करून मिळालेल्या पैशातून सिंधुताईंनी अनाथ मुलांसाठी काम सुरू केले. त्यांनी अनेक आश्रम उभारले.

## त्यांनी स्थापन केलेले प्रमुख प्रकल्प

बाल निकेतन हडपसर ,पुणे

सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, चिखलदरा

अभिमान बाल भवन, वर्धा

गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा ( गोपालन)

ममता बाल सदन, सासवड

सप्तसिंधु महिला आधार बालसंगोपन व शिक्षणसंस्था, पुणे

आज त्यांच्या कार्यामुळे १५०० पेक्षा अधिक मुले शिक्षण, संस्कार आणि सुरक्षित जीवन जगत आहेत.

अनंत महादेवनचा २०१० मधील मराठी चित्रपट ''मी सिंधुताई सपकाळ'' हा सिंधुताई सपकाळ यांच्या खऱ्या कथेने प्रेरित एक बायोपिक आहे. ५४ व्या लंडन चित्रपट महोत्सवात या चित्रपटाची वर्ल्ड प्रीमियरसाठी निवड करण्यात आली होती.

## विचारधारा आणि कार्यपध्दती

सिंधुताईंचे समाजकार्य हे केवळ मदतीपुरते मर्यादित नव्हते; तर स्वाभिमानाने जगायला शिकविणारे होते. त्या नेहमी म्हणत, ''भीक ही माझी मजबुरी नव्हे, ती माझी शिदोरी आहे''. त्या समाजातील श्रीमंत वर्गाला भावनिक आवाहन करून अनाथांसाठी मदत मिळवित. त्यांच्या भाषणांत विद्रोह, विनोद, करुणा आणि वास्तव यांचे सुदंर मिश्रण असायचे. त्यामुळे त्यांच्या भाषणांचा प्रचंड प्रभाव पडत असे.

## पुरस्कार आणि सन्मान

सिंधुताईंच्या व्यापक समाजकार्याला ९०० हून अधिक पुरस्कारांच्या माध्यमातून गौरविण्यात आले आहे. त्यांना सन. २०१३ मध्ये सामाजिक न्यायासाठी दिला जाणारा प्रतिष्ठित राष्ट्रीय आयकॉनिक मदर आणि मदर तेरेसा पुरस्कार मिळाला. सन. २०१६ मध्ये पुणे येथील डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्चतर्फे सिंधुताईंना साहित्य विषयात डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.

सन. २०१० मध्ये त्यांना 'द माइंड ऑफ स्टील' नावाचा पुरस्कारही मिळाला. पुरस्काराच्या नावाप्रमाणेच, सिंधुताईंचे मन खरोखरच पोलादासारखे कणखर होते. समाजातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी, महाराष्ट्र सरकारने सन. २००२ मध्ये त्यांना प्रतिष्ठित 'अहिल्याबाई होळकर पुरस्कार' प्रदान केला. सन. २०१४ मध्ये लंडन येथे झालेल्या राष्ट्रीय शांतता परिषदेत सिंधुताईंना अहमदिया शांतता पुरस्कारही मिळाला. सन. २०१८ च्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त, राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी कर्तृत्ववान महिलांना नारी शक्ती पुरस्कार देऊन सन्मानित केले. हा प्रतिष्ठित पुरस्कार मिळालेल्या एकोणतीस कर्तृत्ववान महिलांपैकी सिंधुताई एक होत्या. अलीकडेच सन. २०२१ मध्ये त्यांना समाजकार्य श्रेणीमध्ये 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

२०२१ – समाजकार्य श्रेणीतील पद्मश्री

२०१७ – भारताच्या राष्ट्रपतींकडून नारी शक्ती पुरस्कार.

२०१६ डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्याकडून मानद डॉक्टरेट.

२०१६ वॉकहार्ट फाउंडेशनतर्फे वर्षातील सर्वोत्कृष्ट

समाजसेवक पुरस्कार

२०१४ अहमदिया मुस्लिम शांतता पुरस्कार

२०१४ बसव सेवा संघ, पुणे कडून बसव भूषण पुरस्कार–२०१४ प्रदान.

२०१३ मदर तेरेसा सामाजिक न्याय पुरस्कार.

२०१३ 'आयकॉनिक मदर' साठीचा राष्ट्रीय पुरस्कार

२०१२ सीएनएन–आयबीएन आणि रिलायन्स फाउंडेशनतर्फे देण्यात येणारे रिअल हीरोज अवॉर्ड्स.

२०१२ – सीओईपी गौरव पुरस्कार, कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, पुणे यांनी दिला.

२०१० महाराष्ट्र शासनातर्फे दिला जाणारा अहिल्याबाई होळकर पुरस्कार

२००८ लोकसत्ता या मराठी दैनिकातर्फे देण्यात येणारा वर्षातील सर्वोत्कृष्ट महिला पुरस्कार.

१९९६ – दत्तक माता पुरस्कार, ना–नफा संस्था सुनीता कलानिकेतन ट्रस्टने दिला.

१९९२ अग्रगण्य सामाजिक योगदानकर्ता पुरस्कार.

सह्याद्री हिरकणी पुरस्कार

(मराठी: सह्याद्री हिरकणी पुरस्कार)

राजाई पुरस्कार (मराठी: राजाई पुरस्कार)

शिवलीला महिला गौरव पुरस्कार (मराठी: शिवलीला महिला गौरव पुरस्कार)

## स्त्रीशक्तीचे प्रतिक

सिंधुताई सपकाळ या केवळ समाजसेविका नव्हत्या; त्या स्त्रीशक्तीचे मूर्तिमंत रूप होत्या. अन्याय, अपमान, गरिबी यांना न जुमानता त्यांनी स्वत:चे दु:ख समाजाच्या सेवेत रूपांतरीत केले. स्त्री ही केवळ सहनशील नसून परिवर्तन घडविणारी शक्ती आहे हे त्यांनी आपल्या आयुष्यातून सिध्द केले.

## निधन

दि. ४ जानेवारी २०२२ रोजी सिंधुताई सपकाळ यांचे पुण्यात निधन झाले. मात्र विचार, कार्य आणि माया आजही हजारो मुलांच्या आयुष्यात जिवंत आहे. त्यांनी उभारलेले आश्रम, घडविलेली माणसे आणि दिलेला संस्कारांचा वारसा कधीही न संपणारा आहे.

सिंधुताई सपकाळ यांचे जीवन म्हणजे संघर्षातून सेवेकडे जाणारी प्रेरणादायी वाटचाल होय. स्वत:च्या वेदनांना समाजाच्या कल्याणासाठी वाहून घेणारी ही माऊली खऱ्या अर्थाने ''अनाथांची आई'' ठरली. आजच्या तरुण पिढीने त्यांच्या जीवनातून करुणा, जिद्द, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकी या मूल्यांची शिकवण घ्यायला हवी.

सिंधुताईंचे जीवन आपल्याला सांगते– 'माणूस मोठा होतो तो पदामुळे नाही, तर त्याच्या मायेने.''

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. पुजा तुकाराम जाधव**
बी.ए.भाग–३



# अधिक व क्षय मास आणि पुसेगाव येथील अतिरुद्र स्वाहःकार जप अनुष्ठान महायज्ञ

**(माहितीपर लेख)**

भारतीय सण-उत्सव हे चांद्रगतीवर आधारित आहेत, तर ऋतुचक्र सूर्याच्या गतीवर अवलंबून आहे. या दोन्ही कालगणनांचा अद्भूत मेळ भारतीय ज्योतिषशास्त्राने साधला आहे. चांद्रवर्ष आणि सौरवर्ष यांतील सुक्ष्म फरक भरून काढण्यासाठी जो अतिरिक्त महिना येतो, त्याला अधिकमास म्हणतात. तर एखादा महिना लुप्त झाला तर त्याला क्षयमास म्हणतात.

दोन अधिकमासांमध्ये साधारणतः २७ ते ३४ महिन्यांचे अंतर असते. चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन, कार्तिक आणि फाल्गुन हे महिने अधिकमास म्हणून येऊ शकतात. मार्गशीर्ष आणि पौष हे क्षयमास होऊ शकतात; परंतू माघ मास कधीच अधिक किंवा क्षय होत नाही, हे विशेष!

कधी कधी एका चांद्रमासात सूर्य दोन राशींमध्ये प्रवेश करतो. अशा वेळी त्या महिन्याला क्षयमास म्हणतात. विशेष म्हणजे, एखाद्या वर्षी क्षयमास आला तर त्या वर्षी दोन अधिकमास येतात. अधिकमासाला पुरुषोत्तम मास किंवा मलमास अशीही नावे आहेत. हजारो वर्षांपूर्वी निर्माण झालेले हे भारतीय कालगणनेचे विज्ञान आजही अचूक आहे. ही आपल्या पूर्वजांच्या प्रज्ञेची तेजस्वी साक्ष आहे.

जगातील सर्वांत प्राचीन, समृद्ध आणि जीवनमूल्यांनी परिपूर्ण संस्कृतीचा वारसा लाभलेली ही भूमी केवळ कृषिप्रधान नाही, तर विज्ञाननिष्ठ, अध्यात्मप्रधान आणि निसर्गपूजक आहे. येथील ऋषी-मुनींनी जीवनाकडे केवळ भौतिक नजरेने पाहिले नाही तर मानव, निसर्ग आणि विश्व यांच्यातील सुक्ष्म नाते अनुभवले. ऋतुचक्राच्या लयीत, सूर्य-चंद्रांच्या गतीत आणि निसर्गाच्या स्पंदनांत त्यांनी जीवनाचे शाश्वत तत्त्व शोधले. भारतीय संस्कृतीने प्रत्येक ऋतूला अर्थ दिला, प्रत्येक तिथीला पावित्र्य दिले आणि प्रत्येक दिवसाला उत्सवाचे रूप दिले. मानवाचे आरोग्य, मानसिक संतुलन, सामाजिक ऐक्य आणि आत्मिक उन्नती जपण्यासाठी व्रत-वैकल्ये, उत्सव, पर्व आणि संस्कारांची निर्मिती झाली. यातूनच जन्माला आला भक्तीरसाने ओथंबलेला, रंगांनी नटलेला आणि अध्यात्माच्या तेजाने उजळलेला अधिकमास!

अधिकमास हा केवळ गणिती समतोल नाही; तो आत्मशुद्धी, संयम आणि साधनेचा पवित्र कालखंड आहे. या महिन्यात अनेक जण विविध व्रते आणि संकल्प करतात त्यामध्ये विशेषकरुन एकभुक्त, नक्तभोजन, मौनभोजन, अखंड नंदादीप, तांबूलदान, गंगास्नान, मंत्रजप, विष्णुसहस्रनाम पारायण केले जाते. या काळात भगवान शंकराच्या उपासनेला विशेष महत्त्व असते. मनातील विकार धुऊन टाकून अंतःकरण अधिक निर्मळ करण्याचा हा आध्यात्मिक उत्सव आहे.

प.पू.श्री सेवागिरी महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेल्या पुसेगाव येथे आधिक (पुरुषोत्तम) मासाचे औचित्य साधून श्री सेवागिरी मंदिर पुसेगाव येथे श्री सिद्धेश्वर देवतेस अतिरुद्र स्वाहःकार जप अनुष्ठान या महायज्ञाचे आयोजन होत असते.

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ।।

सनातन धर्मामध्ये वेद आपल्याला सर्व देवतांना संतुष्ट करण्यासाठी यज्ञ करण्याचा आदेश देतात. जेणेकरुन ते पुरेशा प्रमाणात अन्नधान्य निर्मिती करण्यास, पुरेशा प्रमाणात हवा, प्रकाश आणि पाणीपुरवठा करण्यास




प्रसन्न होतील.

वरील गीता श्लोकाप्रमाणे सर्व भूतमात्रांचा प्राण अन्नमय असून अन्नाची निर्मिती पर्जन्यावर अवलंबून आहे व पर्जन्य यज्ञसंस्थेवर अवलंबून आहे. यासाठीच हिंदु धर्मशास्त्रामध्ये देवदेवतांना संतुष्ट करण्याकरीता जगाच्या कल्याणार्थ व दुष्ट शक्तींचा नाश करण्यासाठी यज्ञ संकल्पना सांगितली आहे. पृथ्वीतलावरील प्रत्यक्ष देवता स्वरुप अग्निनारायण हा यज्ञ कर्त्याने दिलेल्या आहुती त्या देवतेपर्यंत पोहचवतात व त्या देवता प्रसन्न होऊन कृपाशीर्वाद देतात.

मानवाचा जन्म झाल्यानंतर त्याला विशिष्ट प्रकारच्या संस्काराने मनुष्यत्व प्राप्त होते. धार्मिक नित्य कर्मे आणि संस्कार केल्याने माणसाला विशेष प्रकारची योग्यता प्राप्त होते आणि तो खराखुरा पुरुष होतो. माणसाच्या मनावर, इंद्रियावर आणि शरीरावर संस्कार करुन त्यांना योग्य प्रकारचे उत्कृष्ट कार्य करण्यास समर्थ ठेवणे यासाठी महायज्ञ करतात. हा उद्देश सिध्दीस जावा म्हणून आपल्या धर्मात अनेक नित्यकर्मे आणि संस्कार सांगितले आहेत. हा सत्उद्देश असून परमेश्वराचा कृपाशीर्वाद प्राप्त व्हावा व समाजातील विषमता, दूराचार, व्याभिचार, दु:ख, दारिद्य या सर्वांचा नाश व्हावा तसेच सामाजिक स्थैर्य, धनधान्याची समृध्दी, मानसिक आनंद, चैतन्य व उत्साह निर्माण झाला पाहिजे हा यामागील उद्देश असतो. मठाधिपती १०८ प.पू. श्रीमहंत सुंदरगिरीजी महाराज यांच्या इच्छेनुसार पुसेगाव पंचक्रोशीतील सामाजिक हिताचे जतन व्हावे म्हणून आधिक मासात या यज्ञ सोहळ्याचे आयोजन होत असते.

यज्ञ काळात दररोज अन्नदान, भजन, कीर्तन, भारुड अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. हे पुण्यकर्म सर्वांच्या सहकार्यातून व्हावे, पंचक्रोशीतील भक्तांचा सहभाग असावा या हेतूने मठाधिपती श्री सुंदरगिरी महाराज परिसरातील ६० ते ७० गावांना प्रत्यक्ष भेट देतात. प्रत्येक गावातील नागरिकांनी या यज्ञ सोहळ्यात सहभागी होऊन सेवा करावी असे आवाहनही महाराज करतात. यज्ञ काळात येणाऱ्या प्रत्येक भाविकास चहा, नाष्टा व भोजनाची चांगली व्यवस्था श्री सेवागिरी महाराज देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून करण्यात येते.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. अनुराधा पोपट दळवी**
बी.ए.भाग–१

# पंढरपूर आषाढी वारी

**(संशोधनपर लेख)**



पंढरीची वारी आहे माझे घरी।
आणिक न करी तीर्थव्रत।।
व्रत एकादशी करीन उपवासी।
गाईन अहर्निशी मुखी नाम।।
नाम विठोबाचे घेईन मी वाचे।
बीज कण्यांतीचे तुका म्हणे।।

संत तुकाराम

पंढरीची वारी म्हणजे महाराष्ट्रात साजरा होणारा एक मोठा सणच. हा सण म्हणजे फक्त हरिनामाचा गजर आणि निस्सीम भक्ती. आषाढाची चाहूल लागताच मनाला ओढ लागते ती पंढरीच्या वारीची. हरिमय झालेले असंख्य वारकरी कित्येक किलोमीटरचा रस्ता तुडवित पांडुरंग परमात्म्याला पाहण्यासाठी जातात, आणि हा अनुपम सोहळा उभा महाराष्ट्र तल्लीन होऊन पाहत असतो. प्रस्थान सोहळे पार पाडत ग्यानबा तुकाराम गजर करत पालख्या पंढरपूरच्या दिशेने जातात. हा पंढरीचा पांडुरंग म्हणजे अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत. ही पंढरीची वारी हजारो वर्ष अविरत सुरू आहे

पंढरीच्या वारीसाठी लाखो विठ्ठल भक्त वारकरी पंढरपूरला भेट देतात. वारी म्हणजे वारकरी विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरला पायी चालत जातात आणि जो वारकऱ्यांचा समूह मिळून वारीला जातो त्याला ''दिंडी'' या नावाने ओळखले जाते. या वारीमध्ये लोक पंढरपूर पर्यंत चालत जात असताना विठ्ठलाची भक्ती

गीते, नृत्य आणि टाळ नाद यासारख्या गोष्टी केल्या जातात आणि वारीचा आनंद घेतला जातो. वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध गावांपासून सुरू होऊन पंढरपूर येथे संपणारी सामुदायिक एक पदयात्रा होय. वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. ही वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळा होते. एका सिद्धांतानुसार, वारकरी संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांनी आषाढ आणि कार्तिक या हिंदू महिन्यांत पंढरपूरला जाण्यासाठी वारी सुरू केली. वारी करण्याची परंपरा साधारणतः ८०० वर्षांहून अधिक काळापासून अस्तित्वात असल्याचे मानले जाते.

संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांची दिंडी हजारो दिंड्यांसह पंढरपूरला येतात आणि संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व दिंड्या 'वाखरी' गावातील संतनगरी या ठिकाणी एकत्र येतात. या सर्व दिंड्या आषाढ शुध्द दशमीच्या दिवशी एकमेकांना भेटतात, त्याच दिवशी संध्याकाळी सर्व भक्त आणि आपापल्या दिंड्या हळूहळू पंढरपूरकडे निघतात. तेथे पोहोचल्यानंतर ते चंद्रभागा नदीत पवित्र स्नान करतात आणि प्रदक्षिणा पूर्ण करतात. पुंडलिका वरदा हरिविठ्ठल आणि जय जय रामकृष्ण हरी चा जयघोष संपूर्ण पंढरपूरमध्ये घुमतो.

वर्षातील सर्वात मोठी आणि पंढरपूरमध्ये मोठ्या प्रमाणात जमणारे विठ्ठल भक्त आषाढी यात्रेमध्ये पाहायला मिळतात. या तीर्थयात्रेला आषाढी (देवशयनी) एकादशी म्हणून ओळखली जाते. भाविकांसाठी या तीर्थक्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यावेळी पंढरपुर येथे वारकरी मोठ्या संख्येने जमतात.

कार्तिक महिन्यातील शुध्द एकादशीला कार्तिक यात्रा साजरी केली जाते. या दिवशी भगवान विठ्ठल झोपेतून उठतात अशी श्रद्धा आहे. याचे औचित्य साधून लाखो विठ्ठल भक्त, वारकरी पंढरपूर येथे विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी जातात. यामध्ये उत्सवाचा एक भाग म्हणून चंद्रभागा नदीच्या काठावर सर्व भाविक एका ठिकाणी येवून कीर्तन आणि भजन साजरे करतात.

वारी हा केवळ धार्मिक प्रवास नसून समता, सामाजिक बंधुता व संस्कारांचे प्रतिक आहे. वारीमध्ये मोठ्या प्रमाणावर विविध सामाजिक स्तरातील लोक एकत्र येतात. भक्तीची भाषा आणि सामाजिक सहयोग यातून जाती, धर्म, आर्थिक व्यवहार यातील मर्यादा कमी होतात. हा प्रवास प्रत्यक्ष पायी चालण्याचा असल्याने, शरीर-स्वास्थ्य आणि सहवास यांचा अनुभव वाढतो, त्यामुळे जीवनातील साधारण सुख, चिंता विरहितता यांना स्थान मिळते.

आजच्या काळात, ''डिजिटल वारी'' अशी संकल्पना दिसू लागली आहे. मोबाईल ॲप्स, सोशल मीडिया याच्या माध्यमातून दिंडींची माहिती, ट्रॅकिंग, आरोग्य सुविधा यांचा समावेश झाला आहे. प्रशासनाच्या माध्यमातून दिंडीमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध सुविधा पुरविल्या जातात.

वारीत जात, पात, धर्म, किंवा आर्थिक स्तर असा कोणताही भेद नसतो येथे सर्वजण वारकरी या एकाच नावाने ओळखले जातात आणि विठ्ठलाच्या नामात लीन होतात. पालखी सोहळ्यांमधून कीर्तनाद्वारे लोकांना सदाचार, प्रेम, आणि मानवतेचे धडे दिले जातात. या परंपरेत महिला वारकरी खांद्याला खांदा लावून पुरुषांच्या बरोबरीने चालतात, जे महिला सक्षमीकरणाचे उत्तम उदाहरण आहे. वारीच्या माध्यमातून आरोग्य, वृक्षारोपण, बेटी बचाओ, पाणी बचत आणि व्यसनुक्ती यांसारख्या सामाजिक विषयांवर मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली जाते. वारीमध्ये लाखो वारकरी एकत्र चालत असले तरी कुठेही गोंधळ नसतो शिस्त, आपुलकी आणि सहकार्याची भावना वारीच्या रिंगण व षट्कोनी रचनेतून दिसून येते।

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. दिक्षा ज्ञानेश्वर सुतार**
बी.कॉम.भाग-३

# महात्मा फुले यांचे स्त्री उध्दाराचे कार्य

## (माहितीपर लेख)

महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे आणि पद्दलीत जनतेचे उध्दारकर्ते म्हणून महात्मा जोतिबा फुले यांचे नेहमीच स्मरण केले जाईल. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रातील बहुजन समाज अज्ञान अंध:कारात चाचपडत होता. त्याची चोहो बाजूंनी कोंडी झाली होती. इंग्रजी सत्तेच्या स्थापनेनंतर याचा फायदा प्रामुख्याने समाजातील वरिष्ठ वर्गालाच झाला होता. येथील बहुजन समाजाची स्थिती पूर्वीप्रमाणेच दयनीय होती. अशा वेळी बहुजन समाजाला जागृत करून त्यांना आपल्या न्याय हक्कांसाठी संघर्ष करण्याची शिकवण महात्मा फुले यांनी दिली. त्यांच्या या कार्यामुळेच महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीला व्यापक अधिष्ठान प्राप्त होऊ शकले.

महात्मा फुले यांचा जन्म इ.स. १८२७ मध्ये झाला. त्यांच्या पूर्वजांचे मूळ गाव सातारा जिल्हयातील 'कटगुण' हे होते. फुले यांचे पणजोबा त्या गावचे चौगुले होते व ते जातीने क्षत्रिय माळी होते. पण काही कारणामुळे त्यांना आपले गाव सोडावे लागले. पुढे ते पुणे जिल्हयाच्या पुरंदर तालुक्यातील 'खानवडी' या गावी येऊन राहिले. जोतिबांचे आजोबा उधळया स्वभावाचे निघाल्याने त्यांना आपली सर्व मालमत्ता गमवावी लागली. त्यामुळे त्यांना स्थलांतर करावे लागले व ते पुणे येथे येऊन राहिले. पुणे येथे गेल्यावर ते फुले विकण्याच्या व्यवसायात शिरले. त्यावरूनच त्यांना त्यांच्या पूर्वीच्या गोरे या आडनावाऐवजी फुले असे आडनाव प्राप्त झाले. याच दापंत्याच्या पोटी ज्योतिबांचा जन्म झाला.

जोतिबा एक वर्षाचे असतानांच त्यांच्या मातेचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्यांचे वडील गोविंदराव यांच्यावर येऊन पडली. जोतिबांच्या वयाच्या सातव्या वर्षी त्यांचे नाव शाळेत दाखल केले. परंतु त्या काळात बहुजन समाजातील लोकांचा शिक्षणाकडे मुळीच कल नव्हता. परिणामी दोन तीन वर्षातच त्यांचे शिक्षण बंद पडले. त्यानंतर जोतिबा आपल्या वडीलांना शेती व्यवसायात मदत करू लागले. तथापी गोविंदरावांच्या शेजारी राहणारे गफार बेग मुनशी व धर्मोपदेशक लिजिट यांनी त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले आणि जोतिबांना परत शाळेत घालण्याविषयी त्यांचे मन वळविले. याचा परिणाम होऊन गोविंदरावांनी जोतिबांना पुन्हा एकदा स्कॉटिश मिशनच्या इंग्रजी शाळेत घातले. अशा रितीने जोतिबांचे शिक्षण पुन्हा सुरू झाले. दरम्यानच्या काळात त्यांचा सावित्रीबाई हिच्याशी विवाह झाला. जोतिबा लहानपणापासूनच बंडखोर वृत्तीचे होते. विद्यार्थीदशेत असतानाच त्यांच्या मनात आपल्या मागासलेपणाचे तसेच देशातील परकीय इंग्रजी सत्ता उलथवून टाकण्याचे विचार घोळू लागले होते.

महात्मा फुले कृतिशील विचारवंत होते. एकदा विचारांची दिशा निश्चित झाल्यावर त्यांनी लगेच आपल्या कार्याला आरंभ केला. त्यापुढील काळात त्यांनी आपले संपूर्ण आयुष्यच स्त्रिया व शुद्रातिंशुद्र यांच्या उध्दारासाठी वाहिले. त्यापुढील काळात नेहमीच व प्रतिकुल परीस्थितीशी संघर्ष करावा लागला. त्यांच्यावर अनेक प्रकारची संकटे कोसळली.

महात्मा फुले यांचे स्त्री उध्दाराचे कार्य

महात्मा फुल्यांच्या काळात भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती अतिशय वाईट होती. आपल्या समाजाने स्त्रियांना सर्व प्रकारच्या बंधनात जखडून ठेवले होते. सर्व प्रकारचे हक्क नाकारले होते. म्हणून जोतिबांनी प्रथम स्त्री उध्दाराच्या कार्याकडे

आपले लक्ष्य वळविले.

भारतीय स्त्रीच्या उध्दारातील सर्वात महत्वाचा अडथळा म्हणजे शिक्षणाचा अभाव ही गोष्ट महात्मा फुलेंनी अचुक ओळखली होती. त्यांच्या काळात स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. तत्कालीन समाजाचा स्त्री शिक्षणासंबंधीचा दृष्टीकोन अतिशय नकारात्मक होता. स्त्रिया शिक्षण घेऊन शहाण्या झाल्या तर या बिघडतील असा सार्वत्रिक समज होता. हे कार्य धर्मबाह्य आहे अशी चुकीची समजूत होती.

इ.स. १८४८ मध्ये महात्मा फुलेंनी पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. ही शाळा बुधवार पेठेतील भिडयांच्या वाडयात भरत असे. या शाळेत स्वत: जोतिबा शिक्षक म्हणून काम करीत असत. पण त्या काळाच्या परीस्थितीत मुलींच्या शाळेत काम करण्यासाठी दुसरा शिक्षक मिळविणे त्यांना दुरापास्त झाले होते. तेव्हा जोतिबांनी आपली अशिक्षित पत्नी सावित्रीबाई यांना प्रथम घरीच लिहिण्या वाचण्यास शिकविले आणि त्यांचीच शिक्षिका म्हणून नेमणूक केली. ही गोष्ट अर्थातच पुण्यातील सनातन्यांना रूचली नाही. त्यांनी सावित्रीबाईंचा नाना प्रकारांनी छळ केला . सावित्रीबाईंच्या अंगावर शेण, चिखल फेकण्यापर्यंतही काही नराधमांनी मजल मारली. पण त्या माऊलीने आपल्या पतीप्रमाणेच स्वत:चे कार्य निष्ठेने चालू ठेवले.

महात्मा फुलेंनी सुरू केलेली शाळा लवकरच बंद पडली. परंतु त्यामुळे नाऊमेद न होता त्यांनी इ.स. १८५१ मध्ये बुधवार पेठेतील चिपळूणकरांच्या वाडयात मुलींची दुसरी शाळा उघडली. त्यानंतर रास्ता पेठ व वेताळ पेठ येथे आणखी दोन मुलींच्या शाळा त्यांनी सुरू केल्या. अशा प्रकारे अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत महात्मा फुलेंनी स्त्री – शिक्षणाचे जे कार्य केले त्याबद्दल सरकारने इ.स. १८५२ मध्ये विश्रामबागवाडयात त्यांचा जाहीर सत्कार केला.

भारतीय समाजात त्या काळात बालविवाहाची प्रथा रूढ होती. जरठ कुमारी विवाहदेखील बरेच होत असत. साहजिकच समाजात विधवांची संख्या मोठी असे. त्यांची स्थिती तर अतिशय शोचनीय होती.




विधवा महिलांना आणखी एक प्रकारच्या आपत्तीला तोंड देण्याचा प्रसंग काही वेळा ओढावत असे. एखाद्या विधवा स्त्रीचे तारूण्य सुलभ भावणांच्या आहारी गेल्याने चूकून वाकडे पाऊल पडले आणि त्यातून तिला दिवस गेले तर अशा वेळी तिच्यापुढे भृणहत्येखेरीज अन्य पर्याय उरत नसे. अशा दुर्दैवी स्त्रियांवरील वाईट प्रसंग टळावा म्हणून महात्मा फुलेंनी स्वत:च्या घरीच बालहत्या प्रतिबंध गृह सुरू केले. या ठिकाणी बाळंतपणासाठी येणाऱ्या विधवा स्त्रीयांच्या मुलांच्या पालन पोषणाची संपूर्ण जबाबदारीही त्यांनी स्वीकराली. इतकेच नव्हे तर अशा एका काशीबाई नावाच्या ब्राम्हण विधवेच्या पोटी जन्मास आलेल्या मुलास त्यांनी स्वत: दत्तक घेतले.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**सार्थक आनंदराव बनसोडे**
बी.ए.भाग–१

# अल्बर्ट आइनस्टाइन

**(व्यक्तिचित्रणपर लेख)**

जर्मनीत जन्मलेले अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ अल्बर्ट आइनस्टाइन ह्यांना २० व्या शतकातील सर्वोत्तम शास्त्रज्ञ व 'सापेक्षता सिद्धांताचे जनक' म्हणून जग ओळखते. 'प्रकाश-विद्युत परिणाम सिद्धांत' (Theory of Photoelectric Effect) आणि 'सापेक्षता सिद्धांत' (Theory of Relativity) हे त्यांचे महत्त्वाचे शोध. यातील प्रकाश-विद्युत परिणामाच्या सिद्धांतासाठी सन.१९२१ सालचे भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक आइनस्टाइन ह्यांना देण्यात आले.

अल्बर्ट आइनस्टाइन ह्यांचा जन्म जर्मनीतील उल्म येथे झाला. जर्मनी आणि स्वित्झर्लंड येथे त्यांचे शिक्षण झाले. सन.१९०१ साली स्विस फेडरल पॉलिटेक्निक स्कूलमधून त्यांनी गणित व भौतिकशास्त्राच्या अध्यापनाची पदविका संपादन केली. परंतू अध्यापक म्हणून नोकरी न मिळाल्याने त्यांना स्विस पेटंट कार्यालयात नोकरी करावी लागली. विद्युतचुंबकीय उपकरणांच्या पेटंटसाठी आलेल्या अर्जांचे मुल्यमापन करण्याचे काम त्यांचेकडे होते. त्यांचे हे काम विद्युतसंदेशांचे संप्रेषण व काळाचे विद्युतयांत्रिकी संकलन ह्यांच्याशी संबंधित होते. ह्या कामामुळे प्रकाशाचे स्वरूप आणि काळ व अवकाश ह्यांतील मूलभूत संबंध ह्यांच्या निष्कर्षाप्रत आइनस्टाइन येऊ शकले.

आइनस्टाइन यांना सन.१९०५ मध्ये 'ए न्यू डिटरमिनेशन ऑफ मॉलेक्युलर डायमेन्शन्स' ह्या प्रबंधासाठी झुरिक विद्यापीठाने पीएच.डी. ही पदवी प्रदान केली. ह्याच वर्षी त्यांनी आपले प्रकाश-विद्युत परिणाम, ब्राउनीय गती, सापेक्षतावाद सिद्धांत, वस्तुमान व उर्जा यातील समतुल्यता असे चार क्रांतिकारी शोधनिबंध प्रसिद्ध केले. हे संशोधन मूलगामी आणि भौतिकशास्त्रीय सिद्धांतांना नवीन आयाम देणारे होते.

आइनस्टाइन सन.१९०८ साली बर्न विद्यापीठात रुजू झाले आणि त्यानंतर त्यांनी झुरिक विद्यापीठात भौतिकशास्त्र अध्यापनाला सुरुवात केली. सन.१९११ साली आइनस्टाइन ह्यांनी प्राग मधील कार्ल फर्डिनेंड विद्यापीठात पुर्ण वेळ प्राध्यापकपदाचा पदभार स्वीकारला. सन.१९१६ साली जर्मन फिजिकल सोसायटीच्या अध्यक्षपदी त्यांची नेमणूक झाली. ह्याच दरम्यान प्रशियन अॅकॅडेमी ऑफ सायन्सेसचे सदस्यत्वही त्यांना लाभले.

## प्रकाश-विद्युत परिणाम सिद्धांत

हेन्रिच हर्ट्झ यांनी सन.१८८७ मध्ये प्रकाश-विद्युत परिणाम सिद्ध केला. मात्र त्यांना या परिणामाचे स्पष्टीकरण देता आले नाही. आइनस्टाइन यांनी या परिणामाचे स्पष्टीकरण देणारा सिद्धांत मांडला. त्यासाठी त्यांनी प्रकाशकिरणामध्ये असलेल्या 'फोटॉन' या कणांची संकल्पना मांडली.

आइनस्टाइन यांनी दिलेल्या स्पष्टीकरणानुसार एखाद्या धातूच्या पृष्ठभागावर पुरेशा कमी तरंग लांबीचा प्रकाश आपातित झाला असता त्यातील फोटॉन्सच्या ऊर्जेइतकी ऊर्जा धातूतील इलेक्ट्रॉनकडे संक्रमित होते आणि धातूच्या पृष्ठभागावरून इलेक्ट्रॉन उत्सर्जित होतात. उत्सर्जित झालेल्या इलेक्ट्रॉनची ऊर्जा प्रकाशाची तरंगलांबी आणि धातूचे गुणधर्म यांवर अवलंबून असते. धातूच्या पृष्ठभागावरून मुक्त झालेल्या या इलेक्ट्रॉनमुळे विद्युतप्रवाह निर्माण होतो.

प्रकाश विद्युत परिणामाच्या ह्या सिद्धांतासाठी सन.१९२१ सालचे भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक आइनस्टाइन यांना प्रदान करण्यात आले. या सिद्धांताद्वारे आइनस्टाइन यांनी प्रकाश केवळ तरंगाच्या स्वरूपातच नाही; तर फोटॉन ह्या ऊर्जाकणांच्या

स्वरूपातही अस्तित्वात असतो, हे सिद्ध केले. प्रकाशाचे तरंग व कण स्वरूपातील दुहेरी अस्तित्व ह्यामुळे सिद्ध झाले. आइनस्टाइन यांच्या सिद्धांतामुळे पुंजभौतिकी सिद्धांताचा पाया बळकट झाला. त्याचप्रमाणे या संशोधनामुळे इलेक्ट्रॉन सुक्ष्मदर्शक आणि सौरविद्युत घट यांच्या निर्मितीला चालना मिळाली.

विशिष्ट सापेक्षतावादावरच्या आपल्या शोधनिबंधांत तर विश्वाकडे बघण्याचा एक नवा दृष्टीकोन आइनस्टाइन यांनी वैज्ञानिक जगताला दिला. निर्वात पोकळीमध्ये प्रकाशाची गती (3 X 108 m/s) निरपेक्ष (Absolute) असते; व कोणत्याही संदर्भ चौकटीत (Reference Frame) ती तेवढीच असते. अवकाश, वस्तुमान आणि काल ह्या तीनही गोष्टी न्यूटनच्या गृहितकाप्रमाणे स्वतंत्र नसून त्या परस्परावलंबी असतात, असे आइनस्टाइन ह्यांनी प्रतिपादन केले.

आइनस्टाइन यांच्या सापेक्षता सिद्धांतानुसार परस्परांच्या संदर्भात समान गती असणाऱ्या संदर्भ चौकटींमध्ये भौतिकशास्त्राचे नियम सारखे असतात, परंतू गतिमान संदर्भ चौकटींच्या बाबतीत हे नियम बदलू शकतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर जडत्वीय आणि अजडत्वीय संदर्भ चौकटींमधे भौतिकशास्त्राचे नियम वेगवेगळे असतात. जर संदर्भ चौकटीचा वेग प्रकाशाच्या वेगाशी समतुल्य असेल तर अवकाश, वस्तुमान आणि काल हे तीनही ह्या गतिने प्रभावित होतात. प्रकाशाच्या वेगाच्या समतुल्य वेगाने जाणाऱ्या वस्तूची लांबी कमी होते तर काल मंदावतो (Length Contraction and Time Dilation).. काल, वस्तुमान आणि लांबीमध्ये पडणारा हा फरक त्या वस्तूचा वेग आणि प्रकाशाचा वेग ह्यांच्या गुणोत्तरावर अवलंबून असतो. जर एखादी वस्तू प्रकाशाच्या वेगाने गतिमान झाली तर तिचे वस्तुमान अनंत होईल आणि म्हणूनच कोणतीही वस्तू प्रकाशाच्या वेगाने किंवा त्याच्यापेक्षा जास्त वेगाने गतिमान होऊ शकत नाही, असे त्यांनी दाखवून दिले.

यातूनच E=mc2 हे ऊर्जा आणि वस्तूमान यांच्यातील समतुल्यता दर्शविणारे समीकरण आइनस्टाइन यांनी मांडले. वस्तूमानाचे परिवर्तन ऊर्जेत होऊ शकते आणि वस्तूमानाला प्रकाशाच्या वेगाच्या वर्गाने गुणले असता त्याची समतुल्य ऊर्जा मिळते, असे आइनस्टाइन यांनी प्रतिपादन केले.

सामान्य सापेक्षता सिद्धांतात आइनस्टाइन यांनी असा विचार मांडला की, वस्तुमानाच्या गुरुत्वाकर्षणामुळे अवकाश पोकळी गोलाकार होते. एव्हढंच नव्हे तर प्रकाश सरळ रेषेत प्रवास न करता गुरुत्वाकर्षण रेषेने आखून दिलेल्या मार्गाने प्रवास करतो. गुरुत्वाकर्षण जास्त असताना कालप्रवाहही मंदावतो.

आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध आइनस्टाइन यांनी पुंज भौतिकी आणि सामान्य सापेक्षतावादाचा एकीकृत सिद्धांत मांडण्याच्या प्रयत्नांत व्यतीत केला. मार्च सन.१९५३ मध्ये अवकाश–काल भूमितीच्या साहाय्याने गुरुत्वाकर्षण, विद्युतचुंबकत्व आणि सापेक्षता यासंबंधीचे नियम एकाच गणिती सूत्रात गोवण्याचा आइनस्टाइन यांचा प्रयत्न यशस्वी झाला.

आपल्या संशोधन कार्यामुळे प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या आइनस्टाइन ह्यांनी सन.१९२२ आणि सन.१९२३ साली अमेरिका आणि आशियाई देशांचा दौरा केला. या दौऱ्यामध्ये त्यांनी अनेक व्याख्याने दिली. ह्या दौऱ्यादरम्यान अनेक मान्यवर शास्त्रज्ञ, राजकारणी ह्यांच्याशी त्यांची भेट झाली.

आइनस्टाइन ह्यांनी ब्राऊनीय गतीवरील आपल्या शोधनिबंधात ह्या प्रकारच्या गतीचे विश्लेषण करून ही गती म्हणजे रेणूंच्या अस्तित्वाचा सबळ पुरावा असल्याचे दाखवून दिले आणि रेणूंच्या सरासरी आकारमानाचे मूल्य काढले.

सत्येंद्रनाथ बोस यांच्याबरोबर आइनस्टाइन यांनी पुंज–सांख्यिकीला दिलेले योगदान म्हणजे बोस–आइनस्टाइन स्टॅटिस्टिक्स होय. ज्या मुलकणांच्या वर्तनाचे, ऊर्जापातळी धारण करण्याचे नियम ह्या

संख्याशास्त्रानुसार आहेत त्या मूलकणांना 'बोसॉन' असे संबोधले जाते.

जर्मनीत सन.१९३३ साली नाझी राजवट सुरू झाल्यावर ते अमेरिकेस आले. 'प्रिंस्टन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स स्टडी' येथे ते रुजू झाले. आयुष्याच्या अखेरपर्यंत ते या संस्थेत कार्यरत होते.

आईनस्टाइन यांनी सन.१९३९ साली अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रूझव्हेल्ट यांना एका पत्राद्वारे जर्मनी अण्वस्त्र बनविण्याची शक्यता असून त्यामुळे बाकीच्या जगाला असलेल्या धोक्याची जाणीव करून दिली. परिणामी कुप्रसिद्ध मॅनहॅटन प्रकल्प तातडीने हाती घेण्यात आला. केंद्रकीय शृंखला अभिक्रिया आणि युरेनियम यावर मोठ्या प्रमाणात संशोधन झाले आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अणुबॉम्ब बनविणारा अमेरिका हा पहिला देश ठरला.

आईनस्टाइन यांना सन.१९४० साली अमेरिकेचे कायम स्वरूपी नागरिकत्व मिळाले. अमेरिकेत होणारा गुणांचा सन्मान, कामासाठी मिळणारे स्वातंत्र्य, मत स्वातंत्र्य इत्यादी गोष्टींमुळे अमेरिकेची संस्कृती आइनस्टाइन यांना भावली. नंतरच्या काळात इस्त्रायलने त्यांना राष्ट्राध्यक्षपद देऊ केले; परंतु त्यांनी ते नाकारले.

नोबेल पुरस्काराव्यतिरिक्त वैज्ञानिक जगतातील अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार आइनस्टाइन यांना मिळाले. रॉयल सोसायटी ऑफ लंडनचे कोपले पदक, मॅक्स प्लँक पदक, फ्रँकलिन पदक, फ्रेंच ॲस्ट्रॉना–मिकल सोसायटीचा ज्युल्स जसिन पुरस्कार असे अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार आइनस्टाइन यांना मिळाले. अनेक विद्यापीठांनी त्यांना मानद डॉक्टरेटच्या पदव्या दिल्या. त्यांचे नाव ठिकठिकाणचे मनोरे, विज्ञान संग्रहालये, वैज्ञानिक संस्था यांना देण्यात आले. त्याचप्रमाणे सन.१९५२ साली करण्यात आलेल्या पहिल्या हायड्रोजन बॉम्बच्या स्फोटामुळे तयार झालेल्या रासायनिक अवशेषांतून शोधल्या गेलेल्या ९९ अणुक्रमांक असलेल्या रासायनिक मुलद्रव्याला आइनस्टाइन यांच्या नावावरून 'आइनस्टाइनिअम' असे नाव देण्यात आले. चंद्रावरील एका विवराला आणि अलास्कामधील एका पर्वत शिखरालादेखील त्यांचे नाव दिले गेले आहे.



आईनस्टाइन यांचे ३०० पेक्षा अधिक शास्त्रीय शोधनिबंध आणि १५० पेक्षा अधिक इतर विषयावरील पुस्तके प्रसिद्ध आहेत. द वर्ल्ड ॲज आय सी इट, मिनींग ऑफ रिलेटीव्हीटी, बिल्डर्स ऑफ युन्हिवर्स, द इव्होल्यूशन ऑफ फिजिक्स हे त्यापैकी काही उल्लेखनीय ग्रंथ होत.

विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ शास्त्रज्ञ म्हणून गणल्या गेलेल्या आइनस्टाइन यांचा वयाच्या ७६ व्या वर्षी प्रिन्स्टन येथे मृत्यू झाला.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. ज्ञानेश्वरी प्रशांत बोराटे**
बी.कॉम.भाग–२

# आधुनिक जग आणि कृत्रिम बुध्दीमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स)

**(माहितीपर लेख)**

आजचे युग हे विज्ञान–तंत्रज्ञानाच्या क्रांतीचे युग आहे. इंटरनेट, स्मार्टफोन, रोबोटिक्स यानंतर आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही संकल्पना मानवाच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. मानवी बुध्दिमत्तेसारखी विचारशक्ती, निर्णयक्षमता व शिकण्याची क्षमता असलेली यंत्रणा म्हणजेच कृत्रिम बुध्दिमत्ता. AI मुळे केवळ कामे सोपी झाली नाहीत, तर मानवाला अधिक सर्जनशील, उत्पादकशील व विचारशील बनण्याची संधी मिळाली आहे.

**आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे काय ?**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे संगणक किंवा यंत्रांने मानवी मेंदूप्रमाणे विचार करणे, अनुभवातून शिकणे, समस्या सोडविणे आणि निर्णय घेणे यासाठी सक्षम बनविणारे तंत्रज्ञान. AI मध्ये प्रामुख्याने मशीन लर्निंग, डीप लर्निंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग, डेटा ॲनालिसिस हे घटक मिळून AI ला अधिक प्रभावी बनवतात.

**आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा ऐतिहासिक प्रवास**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही संकल्पना सन. १९५० च्या सुमारास ॲलन ट्युरिंग यांनी मांडली. ''यंत्र विचार करू शकते का?'' हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सुरुवातीला AI केवळ संशोधनापुरते मर्यादित होते; मात्र संगणकशक्ती, इंटरनेट व बिग डेटा यांच्या विकासामुळे AI प्रत्यक्ष जीवनात नित्याच्या वापरात आले. आज AI हा आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे.

**शिक्षण क्षेत्रातील AI चे सकारात्मक योगदान**

शिक्षण क्षेत्रात AI मुळे क्रांती घडत आहे. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार वैयक्तिक शिक्षण (Personalized Learning) शक्य झाले आहे. ऑनलाईन शिक्षण प्लॅटफॉर्म अधिक प्रभावी झाले असून शिक्षकांना मूल्यांकन, निकाल, विश्लेषण व मार्गदर्शनासाठी मदत होत आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत आहे. AI मुळे शिक्षण अधिक सर्वसमावेशक आणि परिणामकारक बनले आहे.

**आरोग्य क्षेत्रात AI ची भूमिका** आरोग्यसेवेमध्ये AI हे वरदान ठरत आहे. AI मुळे आजाराचे निदान लवकर शक्य झाले असून कॅन्सर, हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांवर अचूक उपचार करण्यासाठी मोठी मदत होत आहे. तसेच रुग्णांचा डेटा सुरक्षितपणे व्यवस्थापित करणे अतिशय सुलभ होत आहे. टेलिमेडिसिनमुळे दूरवरच्या रुग्णांपर्यंत सेवा देणे शक्य झाले आहे. AI मुळे डॉक्टरांचे काम सुलभ झाले असून रुग्णांचे प्राण वाचविण्यास मदत होत आहे.

**शेती क्षेत्रातील AI** भारतासारख्या कृषीप्रधान देशासाठी AI अत्यंत उपयुक्त आहे. या तंत्रज्ञानामुळे हवामानाचा अचूक अंदाज बांधणे शक्य झाले आहे. पीकांवरील रोग, पीकांची परिस्थिती वेळेत ओळखण्यासाठी या तंत्रज्ञानाची मोठी मदत होत आहे. यामुळे पीकांसाठी खत व पाण्याचा योग्य वापर करता येतो. AI उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळू लागले आहे. AI मुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे.

**उद्योग आणि रोजगार निर्मिती** AI मुळे रोजगार नष्ट होतील अशी भिती असली तरी वास्तवात नवीन संधी निर्माण होत आहेत. डेटा सायंटिस्ट, AI इंजिनियर, रोबोटिक्स तज्ञ, सायबर सुरक्षा तज्ज्ञ, AI




मुळे कौशल्याधारित रोजगार वाढत असून युवकांसाठी नवे दालन खुले झाले आहे.

**प्रशासन व सुशासनात** AI शासनाच्या कामकाजात AI मुळे पारदर्शकता आली आहे. डिजिटल सेवा जलद झाल्या. भ्रष्टाचार कमी होण्यास मदत झाली. नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण शक्य झाले आहे. AI मुळे ''डिजिटल इंडिया'' संकल्पना अधिक सक्षम होत आहे.

**पर्यावरण संरक्षणात** AI पर्यावरण रक्षणासाठी AI महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जंगलतोड रोखण्यासाठी निरिक्षण, प्रदूषण पातळीचे विश्लेषण, वन्यजीव संरक्षण, हवामान बदलाचे भाकीत AI मुळे निसर्ग व मानव यांच्यात संतुलन राखणे शक्य होत आहे.

**सामाजिक क्षेत्रातील सकारात्मक परिणाम**

AI चा उपयोग सामाजिक कार्यासाठीही होत आहे. आपत्ती व्यवस्थापन, गरिबांसाठी योजना, महिलांच्या सुरक्षेसाठी तंत्रज्ञान, दिव्यांगांसाठी सहाय्यक साधने यामध्ये मोठी प्रगती होत आहे. AI मुळे समाज अधिक सुरक्षित व सक्षम बनत आहे.

**नैतिकता आणि जबाबदारी**

आपला देश AI क्षेत्रात झपाट्याने प्रगती करत आहे. AI चा वापर करताना नैतिक मूल्ये जपणे अत्यंत गरजेचे आहे. डेटा गोपनीयता, मानवी नियंत्रण, तंत्रज्ञानाचा योग्य वापर, मानव केंद्रित AI विकसित करणे ही काळाची गरज आहे.

**सरकारी धोरणे** "AI for All" ही संकल्पना भारताला जागतिक पातळीवर अग्रस्थानी नेऊ शकते. भविष्यकाळातील AI भविष्यात अधिक सक्षम, सुरक्षित आणि मानवपूरक होईल. स्मार्ट शहरे, स्वयंचलित वाहने, प्रगत आरोग्य सेवा, गुणवत्तापूर्ण शिक्षण AI मुळे शक्य होत आहे. भविष्यात AI मुळे मानवाचे जीवन अधिक सुलभ आणि आनंदी होईल.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही मानवतेसाठी धोका नसून संधी आहे. योग्य नियोजन, नैतिकता व सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर AI मानवाच्या प्रगतीचा मजबूत आधार बनेल. AI मुळे मानवाची बुध्दिमत्ता अधिक विस्तारेल आणि समाज अधिक प्रगत, सक्षम व समृध्द बनेल. AI म्हणजे मानवाची जागा घेणारी बुध्दिमत्ता नव्हे, तर मानवाला अधिक सक्षम करणारी शक्ती आहे.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**प्रथमेश रणजीत दळवी**

बी.ए.भाग–२

# ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ
# डॉ. माधव गाडगीळ

**(व्यक्तिचित्रणपर लेख)**

दि. २४ मे १९४२ रोजी माधव धनंजय गाडगीळ यांचा जन्म पुणे शहरात झाला. माधव यांचे शालेय शिक्षण पुण्यात झाले. त्यांचे वडील धनंजयराव 'बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीचे' आजीव सदस्य होते. सलीम अलींसारखे ख्यातनाम पक्षीतज्ज्ञ त्यांचे मित्र होते. जे. बी. एस. हाल्डेन हे जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ गाडगीळांच्या वडिलांच्या परिचयाचे होते. त्यांचे घर पुण्यात जैवविविधता टिकवून ठेवलेल्या वेताळ टेकडीच्या परिसरात असल्याने, भटकंती करणाऱ्या माधवरावांना जीवशास्त्र या विषयात रस निर्माण झाला. पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि रसायनशास्त्र हे विषय घेऊन त्यांनी पदवी मिळवली. नंतर त्यांनी इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, मुंबई येथून सागरी जीवविज्ञानातील पदव्युत्तर पदवी मिळवली.

पीएच.डी.च्या अभ्यासासाठी पुढे अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात ते गेले. जीवशास्त्र विषयात गणितीय प्रतिमानांचा आधार असणारा प्रबंध सादर करणारे माधवराव हार्वर्डमधील पहिलेच विद्यार्थी होते. त्यांच्या या कामाचा संदर्भ पुढे अनेक संशोधक दीर्घ काळ देत राहिले. गाडगीळांना विल्यम बॉसर्ट यांच्या मार्गदर्शनाखाली माशांच्या वर्तनाबद्दल जीवविज्ञानातील पीएच.डी. मिळाली. त्यांच्या संशोधनासाठी हार्वर्ड कंप्युटिंग सेंटरने आय.बी.एम. शिष्यवृत्ती त्यांना दिली होती.

हार्वर्ड विद्यापीठात उपयोजित गणित संशोधन अभिछात्र पदावर त्यांनी कारकीर्दीची सुरुवात केली. नंतर त्यांनी हार्वर्ड विद्यापीठात जीवशास्त्र व्याख्याता, स्टॅन्फर्ड विद्यापीठात मानवी जीवशास्त्राचे अतिथी प्राध्यापक व्याख्याता, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्कलीत सन्माननीय भारतीय अमेरिकन व्याख्याता अशी पदे भूषविली. पुढे माधव गाडगीळ भारतात परतले. त्यांनी पुण्यात दोन वर्षे 'महाराष्ट्र असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्समध्ये वैज्ञानिक अधिकारी म्हणून काम पाहिले.

भारता बाहेरील प्रतिष्ठित विद्यापीठांत अतिथी प्राध्यापक, व्याख्याता इत्यादी पदांवर संलग्न असताना सन. १९७३ ते २००४ दरम्यान 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' बंगळूरू हे त्यांनी आपल्या कामाचे केंद्र ठेवले. तेथे आधी सहाय्यक, सहयोगी प्राध्यापक, नंतर प्राध्यापक आणि शेवटी त्यांनी तेथेच 'सेंटर फॉर इकॉलॉजिकल सायन्सेस' ही संस्था स्थापन केली व तिचे ते अध्यक्ष होते. 'सेंटर फॉर इकॉलॉजिकल सायन्सेस'चे वैशिष्ट्य म्हणजे देशभरातील संशोधक, शिक्षक, प्राध्यापक, धोरणकर्ते, शेतकरी, स्वयंसेवी संस्थेतील कार्यकर्ते आणि अधिकारी एकत्र येऊन काम करत. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही संस्थेने जैवविविधता संरक्षण आणि संवर्धन उपक्रमांत जोडून घेतले. गाडगीळांच्या प्रभावामुळे संस्थेच्या पर्यावरण विषयक सर्व प्रकल्पांत प्राण्यांचे वर्तन देखील सातत्याने अचूक आकडेवारीत नोंदण्याचे धोरण ठेवले गेले. विज्ञानात अशा संख्यात्मक नोंदींचे विश्लेषण करणे महत्त्वाचे ठरते. माणूस हा देखील जैवविविधतेतील एकात्म पर्यावरणीय घटक आहे. तो पर्यावरणातून वगळून चालणार नाही, अशी विचारसरणी गाडगीळांनी ठेवल्यामुळे जैवविविधता संरक्षण, संवर्धनात स्थानिक

लोकांच्या विरोधाची धार बोथट झाली.

गाडगीळ केंद्र शासनाच्या स्वतंत्र पर्यावरण विभाग स्थापन करण्यासाठीच्या समितीचे सदस्य होते. त्यांनी त्याचा आराखडा बनवून स्वतंत्र पर्यावरण विभाग साकारला. जीवावरण संवर्धनासाठी 'निलगिरी' टेकड्या संरक्षित क्षेत्रासाठीचा प्रकल्प आराखडा गाडगीळांनी तयार केला. भारतातील हा पहिलाच प्रयत्न होता. सन. १९८६ ते १९९० या काळात ते भारताच्या पंतप्रधानांच्या विज्ञान तंत्रज्ञान सल्लागार मंडळाचे सदस्य राहिले. जैवविविधता परिषदेच्या सल्लागार समितीचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले. पंतप्रधानांच्या पुढाकाराने वाघांचे संरक्षण, व संवर्धन करण्याच्या हेतूने स्थापलेल्या विशेष कार्यगटाच्या पाच निष्णात सदस्यांपैकी ते एक होते.

गाडगीळ सैद्धांतिक अभ्यास व चिंतन यांना दऱ्याखोऱ्या, नद्या, वने, अशा क्षेत्रांत हिंडून प्रत्यक्ष अनुभवाची जोड देत असत. भारतातील पश्चिम घाट, राजस्थान, हिमालय आणि विदेशांतील उत्तर दक्षिण अमेरिका जोडणारा पनामा, उत्तर–पूर्व अमेरिकेतील न्यू इंग्लंड, ॲरिझोना, पूर्व आफ्रिका येथे गाडगीळांनी अभ्यासासाठी प्रवास केला.

सत्तावीस विज्ञान महाविद्यालये, अनेक विज्ञान संस्था आणि विभाग, स्थानिक लोक आणि स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने सहा राज्यांतील दीड लाख चौ. किमी एवढ्या विस्तृत पश्चिम घाटाच्या जैवविविधतेचा अभ्यास करण्यात त्यांचे प्रशासकीय कौशल्यही दिसले.

गाडगीळांनी आयुष्यात अनेक पारितोषिके, पुरस्कार, सन्मान मिळविले. त्यातील काही महत्त्वाचे नागरी पुरस्कार म्हणजे भारतीय राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री आणि पद्मभूषण, आय.सी.एस.एस.आर. तर्फे विक्रम साराभाई पुरस्कार आणि पर्यावरण संरक्षणासाठी दिला जाणारा 'प्यू विद्वत्ता' पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

'द एनर्जी अँड रिसोर्सेस इंस्टिट्यूटने' प्रमुख म्हणून माधव गाडगीळांना आणि त्यांच्या पश्चिम घाट परिस्थितिकी तज्ज्ञ समिती सदस्यांना पुरस्कार दिला. तो निकोलस रोजन यांच्या स्मरणार्थ पर्यावरणाबद्दल जीवअर्थशास्त्रासंबधी चाकोरीबाह्य विचार व कृती करणाऱ्या आणि आपल्या भूमिकेवर ठाम असणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांसाठी असतो. सदर्न अमेरिकन युनिव्हर्सिटीने माधव गाडगीळांना पर्यावरणशास्त्रातील कामगिरीसाठी 'टायलर' पुरस्कार दिला. त्यासाठी झालेल्या त्यांच्या नामांकन शिफारसपत्रात गाडगीळांनी भारतात पर्यावरण क्षेत्रात केले तेवढे कार्य अन्य कोणी केलेले नाही असे नोंदले आहे.

माधव गाडगीळांनी जीवशास्त्र, पारिस्थितीकी, उत्क्रांतीशास्त्र अशा क्षेत्रांतील अभ्यासकांसाठी २२५ पेक्षा अधिक शोधनिबंध लिहिले आहेत. सहा इंग्रजी पुस्तकांचे ते लेखक आहेत. सामान्यांसाठी मराठी, कानडी आणि इंग्रजी भाषांतून विपुल लेखन आणि भाषणे केली आहेत.



❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. निशा विनोद गुंजवटे**
बी.कॉम.भाग–२

# पर्यावरण म्हणजे काय

(माहितीपर लेख)

पर्यावरण म्हणजे आपल्या आजूबाजूचे वातावरण. पर्यावरण आणि मानव यांचे नाते खूप जवळचे आहे. माणसाच्या भौतिक गरजा पर्यावरणामुळे भागतात. आपल्याला पाणी, हवा इत्यादी घटक पर्यावरणातून मिळतात. शिवाय, पर्यावरण त्याच्या कार्यप्रणालीवर बारकाईने नियंत्रण ठेवते, ते इकोसिस्टमसाठी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण प्रणालींचे नियमन करते. याशिवाय, ते पृथ्वीवरील सजीव आणि जीवनाची गुणवत्ता राखते. पर्यावरण दररोज घडणाऱ्या विविध नैसर्गिक चक्रांचे नियमन करते. ही चक्रे सजीव आणि पर्यावरण यांच्यातील नैसर्गिक संतुलन राखण्यात मदत करतात. या गोष्टींमध्ये काही गडबड झाल्यास शेवटी मानव आणि इतर सजीवांच्या जीवनचक्रावर परिणाम करू शकतो.

### पर्यावरणाचे महत्त्व

प्रत्येकाच्या जीवनासाठी पर्यावरण हे खूप महत्त्वाचे आहे, कारण पृथ्वीवरील जीवन पर्यावरणा–मुळेच शक्य आहे. सर्व मानव, प्राणी, नैसर्गिक वनस्पती, हवामान हे सर्व पर्यावरणामध्ये सामावलेले आहे. पर्यावरण केवळ हवामानाचा समतोल राखण्यासाठीच नाही तर जीवनासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी देखील प्रदान करते. लोकांना पर्यावरणाचे महत्त्व समजावे आणि त्याबाबत जनजागृती व्हावी यासाठी ५ जून रोजी 'जागतिक पर्यावरण दिन' साजरा केला जातो. पहिला पर्यावरण दिन ५ जून १९७३ रोजी साजरा करण्यात आला. पर्यावरणाने आपल्याला आणि इतर सजीवांना हजारो वर्षांपासून वाढण्यास मदत केली आहे. पर्यावरण आपल्याला सुपीक जमीन, पाणी, हवा, पशुधन आणि जगण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक गोष्टी पुरविते.

### पर्यावरणाचे फायदे

आपल्याला पर्यावरणातून शुद्ध हवा मिळते. पर्यावरण हा आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. पर्यावरणामध्ये सेंद्रिय, अजैविक, नैसर्गिक आणि मानवनिर्मित गोष्टींचा समावेश होतो. नैसर्गिक वातावरणात झाडे, झुडपे, नद्या, पाणी, सूर्यप्रकाश, प्राणी, हवा इत्यादींचा समावेश होतो. आपण प्रत्येक क्षणी श्वास घेत असलेली हवा, पाणी सोडून आपण जगू शकत नाही आणि जे आपण आपल्या दैनंदिन जीवनात वापरतो. त्या सर्व नैसर्गिक गोष्टी आहेत ज्यामुळे पृथ्वीवर जीवन शक्य होते. ते वातावरणातच येतात. झाडे–वनस्पतींची हिरवळ सुद्धा मनाला एक वेगळीच शांती देते. अनेक प्रकारचे आजारही पर्यावरणामुळे बरे होतात. पर्यावरण मानव, प्राणी आणि इतर सजीवांना वाढण्यास आणि विकसित होण्यास मदत करते. मानव हा देखील पर्यावरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. आपणही पर्यावरणाचे संवर्धन केले पाहिजे. आपले हे जीवन पर्यावरणावर टिकविण्यासाठी आपल्याला पर्यावरणाचे वास्तव जपावे लागेल.

### पर्यावरणाचे नुकसान होण्याची कारणे

आजच्या युगात पर्यावरणाचे प्रदूषण झपाट्याने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. जिथे जिथे दाट झाडे आहेत, तिथे ती तोडून मोठमोठ्या इमारती उभारल्या जात आहेत. वाहनांचा धूर, कारखान्यांतील मशिनचा आवाज, या सर्वांमुळे रसायनयुक्त पाणी, वायू प्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनी प्रदूषण, माती प्रदूषण होत आहे. ही चिंतेची बाब बनली आहे, ती अत्यंत धोकादायक आहे. त्यामुळे आपल्याला अनेक प्रकारच्या आजारांना सामोरे जावे लागते. आज जिथे विज्ञान क्षेत्रात तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रसार

झाला आहे आणि जगात खूप विकास झाला आहे, तर दुसरीकडे पर्यावरण प्रदूषण वाढण्यासही ते कारणीभूत आहे. आधुनिकीकरण, तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. मानव स्वतःच्या स्वार्थापोटी झाडे तोडत आहे आणि नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट करीत आहे. त्यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे, एवढेच नाही तर काही मानवनिर्मित कारणांमुळे पृथ्वीवरील वातावरण, जलस्त्रोत इत्यादींवर परिणाम होत आहे. तापमान वाढत आहे आणि ग्लोबल वार्मिंगची समस्या निर्माण होत आहे, मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे.

**पर्यावरणाची काळजी घेण्याची गरज**

पर्यावरण हे आपल्यासाठी एक प्रकारची देणगी आहे. या वातावरणाला चांगले ठेवणे हे खूप महत्त्वाचे आहे. पर्यावरणाची काळजी घेणे आणि त्याचे सौंदर्य वाढविण्यासाठी आपण स्वच्छतेचीही खूप काळजी घेतली पाहिजे. झाडांचे महत्त्व समजून जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजेत. घनदाट झाडे वातावरण शुद्ध ठेवतात आणि सावली देतात. घनदाट झाडे हे प्राणी आणि पक्ष्यांचे अधिवासही आहेत. म्हणूनच जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजेत. पर्यावरण आणि माणूस एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत, म्हणजेच माणूस पूर्णपणे पर्यावरणावर अवलंबून आहे. आज विज्ञानाने खूप प्रगती केली असली तरीही पर्यावरणाशिवाय माणूस आपल्या जीवनाची कल्पनाही करू शकत नाही. पण निसर्गाने आपल्याला जे उपलब्ध करून दिले आहे त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. म्हणूनच मानवाने भौतिक सुखाच्या प्राप्तीसाठी निसर्गाचे शोषण टाळले पाहिजे. विज्ञानाच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे माणसाचे जीवन खूप सोपे झाले आहे, यात शंका नाही, वेळेची बचत तर झालीच पण माणसाने खूप प्रगतीही केली आहे. परंतू विज्ञानाने असे अनेक शोध लावले आहेत, ज्याचा परिणाम आपल्या पर्यावरणावर होत आहे आणि ज्याचा मानवी आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

पर्यावरणाची काळजी कशी घ्यावी

उद्योगातील दूषित पदार्थ आणि सांडपाणी यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली पाहिजे. घनदाट झाडे वातावरण शुद्ध ठेवतात आणि सावली देतात. घनदाट झाडे हे प्राणी आणि पक्ष्यांचे अधिवासही आहेत. म्हणूनच जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजेत. बेसुमार वृक्षतोड थांबली पाहिजे. अत्यंत गरजेच्या वेळीच वाहनांचा वापर करावा. दूषित आणि विषारी पदार्थांच्या विल्हेवाटीसाठी कठोर कायदे केले पाहिजेत. पर्यावरणाचे महत्त्व समजण्यासाठी लोकांनी जनजागृती केली पाहिजे. आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियान सुरू केले. पर्यावरण संतुलनासाठी तयार केलेला हा उपक्रम आहे.

अशा प्रकारे आपण आपले पर्यावरण वाचविले पाहिजे. लोकांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. शांत आणि निरोगी जीवन जगण्यासाठी स्वच्छ वातावरण अत्यंत आवश्यक आहे. आपण सर्वांनी पर्यावरणाबाबत जागरुक असणे गरजेचे आहे. वृक्षतोडीवर शासनाने कठोर कायदे केले पाहिजेत. यासोबतच पर्यावरण स्वच्छ ठेवणे हे आपले कर्तव्य मानले पाहिजे कारण स्वच्छ वातावरणात राहूनच मानवाचे आरोग्य निर्माण आणि विकास होऊ शकतो.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. नम्रता सतिश कांबळे**
बी.ए.भाग–१

# निसर्ग निरिक्षण : एक शास्त्र व कला

**(माहितीपर लेख)**

निसर्ग मानवाला शिस्तप्रिय बनवून शास्त्रीय विचार करायला शिकवितो. सकाळी लवकर उठून रानात जावून निरिक्षण व नोंदी करायला लावत असतो. त्यासाठी आवड व शिस्त दोन्ही गोष्टी असाव्या लागतात. तासन्तास पायपीठ करून किंवा एका जागी शांत बसून अभ्यास करणं ही एक प्रकारची तपश्चर्याच आहे. सोबत एखादा संदर्भ ग्रंथ, दूर्बिण व चांगला कॅमेरा असला तर, रंजक व शास्त्रशुद्ध अभ्यास होऊ शकतो. जीपीएस व गुगल सारख्या साधनांच्या मदतीने विविध पशूपक्षी व वनस्पतीच्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करता येतो. घरी आल्यावर निसर्ग निरिक्षण या विषयावरील वाचन हवचं.

निसर्ग निरिक्षणाचा पाया विविध प्रजाती व जातींच्या शास्त्रीय वर्गीकरणावर आधारलेला असतो. प्राणी व वनस्पतींच्या जाती ओळखण्यासाठी काही मापदंड ठरविलेले असतात. नियमित पद्धतशीर निरिक्षणतून प्राणी व वनस्तींचे एकमेंकाना मदत करणारे सहजीवन, निरनिराळ्या ऋतूनुसार त्यांच्यात होणारे बदल परिस्थितीशी जुळवून घेताना झालेली उत्क्रांती, अन्न मिळविण्याच्या पद्धती व विविध अधिवास या सर्वांचा अभ्यास खूपच माहिती पूर्ण बनतो. जीव शास्त्रज्ञ, निसर्ग पर्यटन व्यावसायिक, पर्यावरण शिक्षक, परिसर व्यवस्थापन , वन्यजीव छायाचित्रण व पर्यावरण कायदेतज्ज्ञ अशा अनेक करिअरच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. शिवाय अभ्यासावर आधारित शास्त्रीय लेख लिहून मिळालेली माहिती इतरांपर्यंत पोहोचविता येते.

निसर्ग आणि कला यांचाही खूप जवळचा संबंध आहे. निसर्ग निरिक्षणावर आधारित सर्वसामान्य वाचकांना आवडतील असे ललित लेख म्हणजे कलेचा एक सुंदर आविष्कार असतो. निसर्गाच्या सान्निध्यात राहून आपली सौंदर्यसृष्टी विकसित होते. रोजच्या निसर्गदृश्यातील लावण्य जाणवायला लागतं. प्राणी, वनस्पती, नद्या, डोंगर व जंगल इत्यादी घटकामुळे आपण संवेदनशील बनतो. काहीच्या मनात काव्यात्मक विचार डोकावू लागतात, तर काहीना निसर्गचित्र किंवा निसर्ग शिल्प यांसारख्या कलाकृती स्फुरायला लागतात.

विराट पर्वतरांगा, अथांग समुद्र, धीरगंभीर अरण्य व स्फटिकासारखे शुभ्र जलप्रताप पाहून देवाने घडविलेल्या भव्य सृष्टीची जाणीव होते. आपण किती छोटे आहोत हे लक्षात येते. मन शुद्ध व पवित्र होऊन खरी शांती व आनंद यांचा निरंतर अनुभव मिळत राहतो.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. कोमल चनाप्पा कागर**
बी.कॉम.भाग–२



# महाराष्ट्रातील समाजसुधारक व अंधश्रद्धा निर्मूलन

**(माहितीपर लेख)**

अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य महाराष्ट्रात फार प्रभावीपणे समाज सुधारकांच्याकडून करण्यात आले. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, प्रबोधकार ठाकरे, महात्मा जोतीराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, संत गाडगे महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत तुकडोजी महाराज अशी परंपरा आहे. या समाजसुधारकांनी देशबांधवाची स्थिती, शिक्षण, शेती, अस्पृश्यता निर्मूलन याबाबत. अत्यंत मूलगामी विचार मांडले आहेत. मात्र या बरोबरच त्या सर्वांच्या मांडणीत वैज्ञानिक दृष्टीकोन होता. आणि त्याला माणुसकीची जोड होती.

भारतीय राज्यघटनेतील मुलभूत कर्तव्यानुसार मानवतावाद व सुधारणावाद यात सुधारणा करणे याचा उल्लेख आहे. स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक न्याय, यांबाबत काही वाटचाल या समाजसुधारकांच्या मांडणीच्या दिशेने झाली आहे मात्र वैज्ञानिक दृष्टीकोणावर आधारित विचार व आचार याबाबत फारच संत गतीने समाजसुधारकांचा वारसा सांभाळला जात आहे. काही वेळा प्रवास उलटाच चालू आहे की काय अशी भिती वाटते. हा वारसा नीटपणे समजून घ्यावयास हवा.

अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्यच असे आहे की, त्यातून हितसंबंध दुखावतात, त्याला तर विरोध होतोच आजही हा अनुभव असेल तर शतकापूर्वीचे वास्तव किती बिकट असेल याची कल्पना येते. आगरकर म्हणाले, ध्यानात ठेवा, ज्ञान-विज्ञान. विचार-अविचार आंधळेपणा-डोळसपणा यांच्या झगडयात अखेरीस तुमच्या सारख्यांची विटंबना होते. पराभव आणि निराशा होते. वेळच्यावेळी शुध्दित आला तर फजिती न पावता जगातून आनंदाने निघून जाल... म्हणून वेडा हट्ट सोडून द्या, बदलत्या समाजाशी जुळवून घेण्याचे प्रयत्न करा.

विश्वातील इतर सर्व पशुपक्ष्यांप्रमाणे मानव प्राण्यांचे वेगळेपण कशात असेल तर ते त्याच्या सारासार विचार करण्याच्या क्षमतेत आहे. हे महात्मा फुले यांनी आवर्जून सांगितले आहे. माणसाच्या प्रगतीची सारी घौडदौड ही किमया मानवाच्या बुद्धिसामर्थ्याची आहे. माणसाने आपल्या या अमूल्य पवित्र बुद्धीचे पुरेसे सार्थक केलेले नाही. बुद्धीच्या निकषावर तपासून न पाहताच माणसाने असंख्य गोष्टीवर विश्वास ठेवल्यामुळे तो मानसिक गुलामीत सापडला आहे.

लोकहितवादींच्या मते, 'ईश्वराने मनुष्यास ज्ञान देवून इतर प्राण्यापेक्षा वेगळे केले आहे.' मनुष्यास विचार शक्ती आहे. वाचा आहे, तो बऱ्या-वाईटात फरक करू शकतो. म्हणून सार कोणते व असार कोणते हे त्याने ओळखले पाहीजे असे जर झाले तर जुन्या वाईट चालीरिती मागे पडतील, त्यांची निरर्थकता जाणवेल. ' ज्ञान हाच पराक्रम ' असा सिद्धांत त्याने मांडला.

सर्वच समाजसुधारकांची मांडणी माणसाचे हित साधण्याचे एक प्रधान साधन म्हणून मानली तर बुद्धीवरील विश्वास दिसून येतो.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. गौरी जयवंत जाधव**
बी.कॉम.भाग-२

# भारतीय राज्यघटनेची ओळख

(माहितीपर लेख)

### राज्यघटना

राज्यघटना म्हणजे लिखीत नियमांचा समुच्चय होय. ज्या नियमांद्वारे शासन व जनता यांचे परस्पर संबंध निश्चित झालेले असतात.

लोकशाही शासन व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग म्हणजे राज्यघटना होय. राज्यघटनेत नागरिकांच्या इच्छा आकाक्षांचे प्रतिबिंब असावे लागते. तसेच राज्यघटना नागरिकांना माहित असावी लागते. म्हणून भारतीय राज्यघटनेची ओळख या लेखातून करून दिली जात आहे.

दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपली राज्यघटना मंजूर झाली व दि. २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाली. यासाठी २ वर्ष ११ महिने व १८ दिवस एवढा कालावधी लागला. आपल्या देशाच्या राज्यघटनेत नागरिकांचा प्राधान्याने विचार केलेला दिसतो. घटनेने आपल्याला पुढील गोष्टी दिलेल्या आहेत. ज्यामुळे आपण लोकशाही जीवन व लोकशाहीतील स्वातंत्र्य उपभोगत आहोत.

### अ. मूलभूत अधिकार

१. समतेचा किंवा समानतेचा अधिकार
२. स्वातंत्र्याचा अधिकार
३. शोषण विरोधाचा अधिकार
४. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार
५. सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार
६. घटनात्मक उपाययोजनांचा अधिकार

### ब. मूलभूत कर्तव्ये

१. राज्यघटनेचे पालन करणे, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे. आपल्या देशाविषयी आत्मियता बाळगणे.

२. ज्या गोष्टींमुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढयाला स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्याचे पालन करणे.

३. भारताची सार्वभौमता, एकता आणि एकात्मता यांचा सन्मान करून त्यांचे संरक्षण करणे.

४. आवाहन केले जाईल तेव्हा आपल्या राष्ट्रांचे संरक्षण करणे आणि राष्ट्रीय सेवा बजावणे.

५. धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेद न मानता सर्व भारतीय जनतेत ऐक्याची व बंधुभावाची भावना वाढीला लागावी यासाठी प्रयत्नशील राहणे. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणाऱ्या प्रथा सोडून देणे.

६. आपल्या संमिश्र संस्कृतीचा वारसा मौल्यवान मानून तो जतन करणे.

७. जंगले, सरोवरे, नद्या, वन्य जीवसृष्टी इत्यादी नैसर्गिक संपत्तीचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे.

८. शास्त्रीय दृष्टिकोन, मानवतावाद, शोधक बुध्दी आणि सुधारणावाद यांचा विकास करणे.

९. सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे आणि हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

१०. राष्ट्र यशाच्या व प्रगतीच्या शिखराकडे सतत वाटचाल करील अशा प्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश मिळवण्यासाठी प्रयत्न करणे.

### क. राज्याच्या धोरणांची मार्गदर्शक तत्वे :-

स्त्री व पुरूष नागरिकाना उपजिवीकेचे पुरेसे साधन मिळण्याचा समान अधिकार असावा. पुरूष व स्त्रिया या दोघांनाही समान कामासाठी समान वेतन मिळावे. आधुनिक व शास्त्रीय पद्धतीने शेती व पशुसंवर्धन यासाठी योग्य प्रकारे शासनस्तरावर नियोजन करणे. मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची योजना अंमलात आणण्याचा प्रयत्न होईल. ग्रामपंचायती स्थापन करणे. भारतातील सर्व नागरिकांकरीता समान नागरीक कायदा असावा या मार्गदर्शक तत्वांचा समावेश करण्यात आला आहे.

❑ ❑ ❑ ❑ ❑

कु. प्रणाली विठ्ठल शिंदे
बी.कॉम.भाग-३

# जागतिक महिला दिन

**(माहितीपर लेख)**

दि. २८ फेब्रुवारी १९०९ रोजी न्यूयॉर्क शहरातील सोशलिस्ट पार्टी ऑफ अमेरिकाने आयोजित केलेला ''महिला दिन'' हा सर्वात पहिला दिवस होता. यामुळे सन १९१० च्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत जर्मन प्रतिनिधींना ''एक विशेष महिला दिन'' दरवर्षी आयोजित करण्याचा प्रस्ताव ठेवण्यास प्रेरित केले, पण यावेळी कोणतीही निश्चित तारीख ठरली नाही. पुढील वर्षी संपूर्ण युरोपमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा झाला. सन १९१७ मध्ये रशियन क्रांतीनंतर दि. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त राष्ट्रीय सुट्टी देण्यात आली. त्यानंतर समाजवादी चळवळ आणि कम्युनिस्ट देशांनी त्या तारखेला तो दिवस साजरा केला. सन १९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात जागतिक स्त्रीवादी चळवळीने त्याचा स्वीकार होईपर्यंत ही सुट्टी डाव्या चळवळी आणि सरकारांशी संबंधित होती. सन १९७७ मध्ये संयुक्त राष्ट्राने केलेल्या जाहिरातीनंतर जागतिक महिला दिन ही मुख्य प्रवाहातील जागतिक सुट्टी बनली.

## पहिली आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद

अमेरिका आणि युरोपसह जगातील स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता. पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्री-पुरुष विषमतेचे हे एक ढळढळीत उदाहरण होते. या अन्यायाविरुद्ध स्त्रिया आपापल्या परीने संघर्ष करीत होत्या. सन १८९० मध्ये अमेरिकेत मतदानाच्या हक्कासंदर्भात द नॅशनल अमेरिकन सफ्रेजिस्ट असोसिएशन स्थापन झाली. परंतू ही असोसिएशनसुद्धा वर्णद्वेषी आणि स्थलांतरितांविषयी पूर्वग्रह असणारी होती.

स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळायलाच हवा, अशा प्रकारचे आवाहन जगभरातील स्त्रियांकडून केले जात होते. अर्थात या मर्यादित हक्कांना बहुसंख्य कृष्णवर्णीय लोकांनी आणि कामगार स्त्रियांनी जोरदार विरोध केला आणि क्रांतिकारी मार्क्सवाद्यांनी केलेल्या सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या हक्कांच्या मागणीला पाठिंबा दिला. सन १९०७ साली स्टुटगार्ड येथे पहिली आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद भरली.

## दि. ८ मार्च हा जागतिक महिला दिन

त्यामध्ये 'क्लारा झेटकिन' या कम्युनिस्ट कार्यकर्तीने सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करणे हे समाजवादी स्त्रियांचे कर्तव्य आहे अशी घोषणा केली. दि. ८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री-कामगारांनी रुटगर्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता ह्या मागण्या केल्या. या दोन मागण्यांबरोबरच लिंग, वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमीनिरपेक्ष सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशी मागणीही जोरकसपणे केली.

अमेरिकन कामगार स्त्रियांच्या या व्यापक कृतीने क्लारा झेटकिन अतिशय प्रभावित झाली. सन १९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्टीय समाजवादी महिला परिषदेत, दि. ८ मार्च १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री-कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ, दि. ८ मार्च हा जागतिक महिला-दिन म्हणून स्वीकारावा असा जो ठराव क्लाराने मांडला, तो पास झाला. यानंतर युरोप, अमेरिका वगैरे देशात सार्वत्रिक मतदानाच्या हक्कासाठी मोहिमा उघडल्या गेल्या. त्यांचा परिणाम म्हणून सन १९१८ साली इंग्लंडमध्ये

व सन १९१९ साली अमेरिकेत या मागण्यांना यश मिळाले.

## संयुक्त राष्ट्र संघटनेकडून घोषणा

आपल्या देशातील पहिला महिला दिवस दि. ८ मार्च १९४३ रोजी मुंबई येथे साजरा करण्यात आला. दि. ८ मार्च १९७१ रोजी पुण्यात एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता. पुढे सन १९७५ हे वर्ष युनोने जागतिक महिला वर्ष म्हणून जाहीर केले. त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या. स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली. बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले तशा महिला संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. सार्वजनिक, शासकीय, निमशासकीय ठिकाणी ८ मार्च हा दिवस उत्साहाने साजरा केला जातो.

सन १९७५ या जागतिक महिला वर्षाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे ठरविले. सन १९७७ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या समितीने विविध सदस्यांना आमंत्रित करून दि. ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांचे अधिकार आणि जागतिक शांतता या हेतून साजरा करवा यासाठी आवाहन केले.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. साक्षी संजय गिरीगोसावी**
बी.ए.भाग–२



# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**(व्यक्तिचित्रणपर लेख)**

रत्नागिरी जिल्हात मंडणगडजवळ असलेले आंबडवे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव. त्यांचे वडील रामजी सकपाळ हे लष्करात सुभेदार मेजर होते. ते महू येथे असताना आंबेडकरांचा जन्म झाला. आंबेडकर सहा वर्षांचे असतानाच त्यांची आई भीमाबाई मरण पावली. आंबेडकरांचे पुढील सर्व पालनपोषण रामजी व त्यांची बहीण मीराबाई ह्यांनी केले. रामजी लष्करातून निवृत्त झाल्यावर कुटुंबासह नोकरीसाठी सातारा येथे आले. त्यामुळे आंबेडकरांचे प्राथमिक शिक्षण सातारा येथे झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे माध्यमिक व विश्वविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूल व कॉलेजमध्ये झाले. पदवी घेतल्यानंतर त्यांना बडोदे संस्थानची शिष्यवृत्ती मिळाली. १९१३ मध्ये ते उच्च शिक्षणासाठी अमेरिकेस गेले. तेथील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी अर्थशास्त्र विषयात एम.ए. व पीएच. डी. ह्या पदव्या मिळविल्या.

भारतात परत आल्यानंतर त्यांनी बडोदे संस्थानात नोकरी स्वीकारली. बडोदे येथील वास्तव्यात त्यांना अस्पृश्य म्हणून जे अत्यंत कटू अनुभव आले, त्यांमुळे त्यांनी ती नोकरी सोडली व मुंबई येथे सिडनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी पत्करली. तोपर्यंत अस्पृश्य म्हणून पदोपदी त्यांची जी मानखंडना झाली तिचा परिणाम त्यांच्या मनावर झाला. त्यानंतर त्यांनी अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी अस्पृश्य वर्गातील कार्यकर्त्यांची संघटना उभारण्यास सुरूवात केली. मुंबई येथे दि. ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' नावाचे पाक्षिक सुरु केले. त्या वर्षी कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्यांची माणगाव येथे परिषद घेतली. स्पृश्य–अस्पृश्यांच्या सहभोजनांचे कार्यक्रम घडवून आणले. नागपूर येथे मे १९२० मध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी अखिल भारतीय परिषद बोलाविली. अस्पृश्यांचे प्रतिनिधी विधिमंडळाने नेमावेत या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या 'डिप्रेस्ड क्लास मिशन' च्या धोरणाचा या परिषदेत निषेध करण्यात आला. त्यांनी हाती घेतलेल्या ह्या प्राथमिक कार्यातच त्यांचे नेतृत्वाचे गुण दिसून आले.

हे लोकजागृतीचे कार्य चालू असताना स्वतःचे अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याकरिता ते राजर्षी शाहू महाराज यांच्या मदतीने इंग्लंडला गेले. त्यांनी लंडन विद्यापीठाची डी. एस्सी. ही पदवी सन १९२३ साली संपादन केली. ते बॅरिस्टरही झाले. मायदेशी परततात मुंबई येथे त्यांनी वकीली सुरू केली. काही काळ सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापकाचे व प्राचार्यांचेही काम केले. त्याबरोबर त्यांनी अस्पृश्यांच्या हिताचे कार्य चालूच ठेवले होते सन. १९२४ मध्ये त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी' ही संस्था स्थापन केली. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे या संस्थेचे ब्रीदवाक्य होते. सन १९२६ साली सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर येथे भरलेल्या महार परिषदेत त्यांनी अस्पृश्य बंधूंना वतनदारी व गावकीचे हक्क सोडून देण्याचा संदेश दिला. त्यामुळे शेकडो महार बांधवांनी गावकीची कामे सोडून इतर कामे करण्यास सुरुवात केली. सन १९२७ मध्ये कुलाबा जिल्ह्यातील महाडच्या चवदार तळ्यावर अस्पृश्यांना इतरांप्रमाणे पाणी भरता यावे म्हणून त्यांनी आपल्या हजारो अनुयायांसह सत्याग्रह केला. यावेळी अस्पृश्यतेचा पुरस्कार करणारी मनुस्मृति जाळली. त्यांच्या काही अनुयायांसह त्यांच्यावर सनातन्यांनी खटला भरला. खटला जिद्दीने लढवून त्यांनी स्वतःची व आपल्या सहकाऱ्यांची निर्दोष सुटका केली व चवदार तळ्यावर पाणी भरण्याचा अस्पृश्यांचा हक्क प्रस्थापित केला. सन. १९२८ साली भारतात आलेल्या सायमन आयोगावर इतरांनी बहिष्कार घातला होता पण अस्पृश्य बांधवांचे हित लक्षात घेऊन आंबेडकरांनी त्या मंडळासमोर साक्ष नोंदवून अस्पृश्यांसाठी सरकारने काय करावयास पाहिजे हे सांगितले. अस्पृश्यांना इतरांप्रमाणे देवाचे दर्शन घेता यावे म्हणून त्यांनी आपल्या अनुयायांसह सन.१९३० साली नाशिक येथे काळराम

मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला त्यावेळी त्यांना व त्यांच्या अनुयायांना मार खावा लागला. पण पूर्वीच्याच जिद्दीने त्यांचे कार्य चालू राहिले. त्यांनी 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'समता', इ.वर्तमानपत्रांद्वारे त्याचप्रमाणे 'बहिष्कृत हितकारिणी' व इतर संस्थांद्वारे अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाविरूध्द आवाज उठविला. त्यांच्यात आत्मविश्वास, अन्यायाविरूध्द लढण्याची जिद्द, वाईट चालीरीती सोडून देण्याची प्रवृत्ती, शिक्षणाची व स्वच्छतेची आवड निर्माण करून त्यांचा स्वाभिमान जागृत केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन. १९३० मध्ये गोलमेज परिषदांसाठी इंग्लंडला गेले. तिन्ही परिषदांना ते उपस्थित राहिले. तेथे त्यांनी अस्पृश्यांची बाजू मांडली आणि अस्पृश्यांच्या इतर हक्काबरोबर स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. ती मागणी पंतप्रधान मॅक्डॉनल्ड ह्यांनी मंजूरही केली. त्यातूनच महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात वैचारिक मतभेद निर्माण झाले. म. गांधीना हा अस्पृश्यांचा स्वतंत्र मतदारसंघ मान्य नव्हता. तो रद्द व्हावा म्हणून त्यांनी पुणे येथे येरवड्याच्या तुरूंगात प्राणांतिक उपोषण केले. त्या वेळी म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात राखीव जागांच्या संख्येबाबत आणि राखीव जागा ठेवण्यासंबंधी घ्यावयाच्या जननिर्देशाच्या मुदतीविषयी चर्चा होऊन दि. २४ सप्टेंबर १९३२ रोजी सुप्रसिध्द 'पुणे करार' झाला. त्या अन्वये पाच वर्षानंतर जननिर्देश घेण्यात यावा असे ठरले. या घटनेनंतर तीन वर्षानी त्यांच्या पत्नी रमाबाई यांचे निधन झाले.

सन. १९३६ साली त्यांनी स्वतंत्र मजूरपक्षाची स्थापना केली त्यावेळी ते प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकीत प्रचंड मतांनी निवडून आले. सन. १९३९ साली येऊ घातलेल्या संघराज्य पध्दतीला त्यांनी विरोध केला दारुबंदीच्या धोरणावर टीका केली. सन. १९४२ साली त्यांनी 'ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशन' नावाचा पक्ष स्थापन केला. या पक्षातर्फे अस्पृश्यांकरिता त्यांनी अनेक लढे दिले. सन. १९४२ पासून १९४६ पर्यंत ते व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात मजूरमंत्री होते. या काळात त्यांनी अस्पृश्यांची शैक्षणिक व आर्थिक उन्नती करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' स्थापन केली व मुंबईस सिध्दार्थ महाविद्यालय सुरू केले. याच संस्थेने पुढे औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. भारत स्वतंत्र झाल्यावर ते केंद्रिय मंत्रिमंडळात विधिमंत्री म्हणून आले व स्वतंत्र भारताच्या संविधान समितीचे ते सभासद झाले. पुढे ते संविधान लेखन समितीचे अध्यक्षही झाले. अस्पृश्यता नामशेष करणारा संविधानातील ११ वा अनुच्छेद हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजयच आहे. सतत परिश्रम घेऊन, चर्चा करून त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने साधारण तीन वर्षांत संविधानाचा मसुदा तयार केला. ह्या महत्त्वाच्या कामगिरीबरोबरच त्यांनी 'हिंदु कोड बिल' लोकसभेला सादर करण्याचा बहुमान मिळविला. हिंदुधर्म जातीसंस्थेमुळे पोखरला गेला आहे, अशी त्यांची ठाम समजूत होती. स्पृश्यांकडून अस्पृश्यांवर होत असलेला अन्याय धर्मांतरावाचून दूर होणार नाही, या त्यांच्या दृढ श्रध्देनुसार त्यांनी दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे मोठ्या समारंभाने अनेक अनुयायांसह बौध्द धर्म स्वीकारला. यानंतर त्यांनी बौध्द धर्माच्या प्रसाराचे कार्य हाती घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाचनाचा अतिशय छंद होता. विद्यार्थीदशेत त्यांना संस्कृतचे अध्ययन करता आले नाही. पुढे ते चिकाटीने संस्कृत शिकले. ग्रंथांशिवाय आपण जगूच शकणार नाही, असे त्यांना वाटे. मृत्यूसमयी त्यांच्या ग्रंथालयात जवळपास २५,००० दुर्मिळ ग्रंथ होते.

हिंदुस्थानची आणि काश्मिरची फाळणी या भारताच्या प्रगतीच्या दृष्टीने अटळ गोष्टी आहेत असे त्यांना वाटे . भारताच्या तत्कालीन परराष्ट्रीय धोरणामुळे भारतास एकही सच्चा मित्र राहणार नाही, अशी त्यांची भूमिका होती. देवनागरी लिपीतील हिंदी ही राष्ट्रभाषा असावी व ती पूर्णपणे अंमलात येईपर्यंत इंग्रजी भाषा असावी असे त्यांना वाटे. त्याचप्रमाणे छोटी राज्ये हाच एकमेव राज्यपुनर्रचनेचा मार्ग आहे असे त्यांचे मत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथरूप लेखन इंग्रजी भाषेतीलच आहे. त्यांनी एम.ए. पदवीकरिता लिहिलेल्या प्रबंधाचा विषय 'प्राचीन भारतातील व्यापार' (एन्शंट इंडियन कॉमर्स) हा होता. 'भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा : एक ऐतिहासिक पृथक्करणात्मक अध्ययन' या विषयावरील त्यांचा प्रबंध पुढे 'द

इव्होल्यूशन ऑफ प्रॉव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' या नावाने प्रकाशित झाला. प्रस्तुत प्रबंधात त्यांनी ब्रिटिश सरकारचे आर्थिक धोरण ब्रिटनमधील उद्योगधंद्याच्या हिताच्या दृष्टीने आखले जाते हे सिध्द केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थशास्त्रविषयक दुसरा प्रबंध म्हणजे 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी' हा होय. रूपयाचे पौंड या चलणाशी प्रमाण बसवून इंग्रजी राज्यकर्त्यांनी केवळ इंग्रजी व्यापाऱ्यांचेच हित साधून भारताचे कसे नुकसान केले यावर त्यांनी प्रस्तुत प्रबंधात प्रकाश टाकला आहे.




धर्म आणि जातिसंस्था यांसंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार क्रांतिकारक होते. सन. १९३६ साली लाहोर येथील जातपात-तोडक मंडळाच्या वार्षिक संमेलनातील अध्यक्षीय भाषण 'Annihilation of Caste' या पुस्तकात त्यांनी प्रसिध्द केले. जातिव्यवस्था ही श्रमिकांच्या अनैसर्गिक विभागणीस व हिंदू समाजाच्या ऐतिहासिक पराभवास, नैतिक अधोगतीस तसेच त्याच्या दुबळेपणास कारणीभूत आहे. जातिव्यवस्थेचा मुख्य आधार म्हणजे हिंदूचा धर्मभोळेपणा असून तो नष्ट करून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांच्या तात्विक अधिष्ठानावर हिंदू समाजाची पुनर्रचना करावी यासारखी प्रेरक विचारसरणी आंबेडकरानी प्रस्तुत पुस्तकात मांडली आहे. 'What Congress and Gandhi Have Done to the Untouchables' या ग्रंथात त्यांनी काँग्रेसच्या अस्पृश्योद्वाराच्या कार्यक्रमाच्या मर्यादा आणि अपयश यांची चर्चा केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यासंगाचे व संशोधनकुशलतेचे प्रतिक असलेला ग्रंथ म्हणजे 'Who were the Shudras?' हा होय. विद्यमान शूद्र म्हणजे पूर्वकालीन क्षत्रिय होत. ब्राम्हणांशी संघर्ष झाल्यामुळे त्यांना शूद्रत्व प्राप्त झाले असा निष्कर्ष त्यांनी या ग्रंथात काढला आहे. 'द अन्टचेबल्स' या नावाचे त्यांचे पुस्तकही या संदर्भात उल्लेखनीय आहे. 'बुध्द अँड हिज धम्म' हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ त्यांच्या मरणोत्तर प्रसिध्द झाला. धर्माच्या रूढ कल्पनांहून बौध्द धर्माची कल्पना वेगळी असून ती समाजाच्या पुनर्रचनेशी अधिक निगडित आहे. त्यामुळे सामाजिक व नैतिक मूल्ये हेच बौध्द धर्माचे खरे अधिष्ठान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धर्माचे कालोचित रहस्य या भाष्यग्रंथात विशद केले आहे.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. भारती रविंद्र लोंढे**
बी.ए.भाग-१



# पुसेगाव परिसरातील कृषी उत्पादने आणि शेतकरी एक सखोल अभ्यास

**(संशोधनपर लेख)**

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी शेतीच्या माध्यमातून अन्नधान्य, भाजीपाला आणि नगदी पीकांचे उत्पादन करून समाजाच्या जीवनचक्राला गती देतो. महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्ह्यातील 'पुसेगाव' परिसर हा कृषी उत्पादनाच्या दृष्टीने महत्त्वाचा भौगोलिक प्रदेश मानला जातो. या भागातील सुपीक जमीन, मध्यम हवामान, उपलब्ध पाणी आणि मेहनती शेतकरी यांच्या जोरावर कांदा, बटाटा, आले आणि हळद या पीकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. या पीकांमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत बदल घडून आला असून स्थानिक बाजारपेठांनाही चालना मिळाली आहे.पुसेगाव परिसरातील शेती केवळ उदरनिर्वाहाचे साधन नसून ती सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. बदलत्या हवामानाचा परिणाम, बाजारपेठेतील चढ–उतार, उत्पादन खर्च वाढ आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या सर्व घटकांचा परिणाम शेती व्यवस्थेवर होताना दिसतो. या पार्श्वभूमीवर कांदा, बटाटा, आले आणि हळद या पीकांच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या जीवनाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.पुसेगाव परिसराची कृषी पार्श्वभूमी पुसेगाव परिसरात काळी व तांबडी माती मोठ्या प्रमाणावर आढळते. या जमिनी पाण्याचा योग्य साठा ठेवतात. परिसरात पावसाचे प्रमाण मध्यम असून विहिरी, बोअरवेल आणि शेततळे यांच्या साहाय्याने सिंचन व्यवस्था विकसित झाली आहे. त्यामुळे नगदी पीकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढलेला दिसतो.

या भागातील बहुतांश शेतकरी लहान व मध्यम भूधारक आहेत. पारंपरिक शेतीबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. ठिबक सिंचन, सेंद्रिय खते, सुधारित बी–बियाणे आणि कृषी मार्गदर्शन यामुळे शेती अधिक उत्पादनक्षम होत आहे.

**कांद्याचे महत्त्व** कांदा हे महाराष्ट्रातील प्रमुख नगदी पीक मानले जाते. प्रत्येक घरातील दैनंदिन आहारात कांद्याचा वापर केला जात असल्याने त्याला कायम बाजारपेठ उपलब्ध असते. पुसेगाव परिसरातील हवामान कांदा उत्पादनासाठी अनुकूल आहे.

**लागवड पद्धती** कांद्याची लागवड मुख्यतः खरीप आणि रब्बी हंगामात केली जाते. शेतकरी प्रथम रोपवाटिका तयार करतात आणि नंतर योग्य अंतर ठेवून रोपांची लागवड करतात. ठिबक सिंचनामुळे पाण्याची बचत होत असून उत्पादनात वाढ होत आहे.

**आर्थिक महत्त्व** कांदा हे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे नगदी पीक आहे. योग्य बाजारभाव मिळाल्यास मोठा आर्थिक फायदा होतो. अनेक शेतकरी कांद्याच्या उत्पन्नावर कुटुंबाचा संपूर्ण खर्च भागवितात. शिक्षण, घरबांधणी आणि शेतीसाठी लागणारी साधने खरेदी करण्यासाठी कांद्याचे उत्पन्न उपयोगी पडते.

**समस्या** कांद्याच्या दरात मोठ्या प्रमाणात चढ–उतार होत असतात. काही वेळा उत्पादन जास्त झाल्यास भाव कोसळतात. साठवणुकीच्या सुविधांचा अभाव असल्यामुळे कांदा खराब होण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागतो.

**बटाटा उत्पादन बटाट्याचे स्थान** बटाटा हे

सर्वसामान्य लोकांचे प्रमुख खाद्यपीक आहे. पुसेगाव परिसरातील थंड हवामान आणि सुपीक जमीन बटाटा उत्पादनासाठी योग्य ठरते.उत्पादन पद्धती

बटाट्याची लागवड सुधारित बियाण्यांपासून केली जाते. जमिनीची मशागत करून खतांचा वापर केला जातो. वेळोवेळी पाणी व कीड नियंत्रण केल्यास चांगले उत्पादन मिळते.

**उपयोग** बटाट्याचा वापर घरगुती स्वयंपाक, वेफर्स उद्योग, फास्ट फूड आणि प्रक्रिया उद्योगात मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे बाजारपेठ कायम उपलब्ध राहते.

**अडचणी** बटाटा पीकावर रोग व कीटकांचा मोठा प्रादुर्भाव होतो. उत्पादन खर्चही जास्त असतो. खतांचे दर, बि-बियाणे आणि औषधांचा खर्च वाढल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक ताण निर्माण होतो.

**आले उत्पादन** आले हे मसाल्याचे आणि औषधी गुणधर्म असलेले महत्त्वाचे पीक आहे. सर्दी, खोकला आणि पचनासंबंधी विकारांमध्ये आल्याचा उपयोग होतो. त्यामुळे देशांतर्गत तसेच परदेशातही त्याला मागणी आहे.

**शेती पद्धती** आल्यासाठी सेंद्रिय खतयुक्त भुसभुशीत जमीन आवश्यक असते. पावसाळ्याच्या सुरुवातीला लागवड केली जाते. आल्याला वेळोवेळी खत आणि पाणी देणे आवश्यक असते.

**आर्थिक लाभ** आले हे जास्त नफा देणारे पीक मानले जाते. योग्य दर्जाचे उत्पादन झाल्यास बाजारात चांगला भाव मिळतो. अनेक शेतकरी पारंपरिक पिकांऐवजी आल्याकडे वळताना दिसतात.

**अडथळे** आले पीकावर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो. पावसाचे अनियमित प्रमाण आणि बाजारातील अस्थिरता यामुळे उत्पादनावर परिणाम होतो.

**हळद उत्पादन** हळदीचे सांस्कृतिक व औषधी महत्त्व आहे. हळद हे भारतीय संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचे पीक आहे. धार्मिक कार्य, औषधनिर्मिती आणि सौंदर्यप्रसाधनांमध्ये हळदीचा वापर केला जातो.

**उत्पादन प्रक्रिया** हळदीची लागवड पावसाळ्यात केली जाते. या पीकासाठी उबदार हवामान आवश्यक असते. हळद काढल्यानंतर उकळणे, वाळविणे आणि पॉलिश करणे या प्रक्रिया केल्या जातात.

**बाजारपेठ** हळदीला देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारात मोठी मागणी आहे. मसाला उद्योग, आयुर्वेदिक औषधे आणि सौंदर्यप्रसाधन उद्योगात हळदीचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो.

**समस्या** हळदीचा उत्पादन खर्च अधिक असतो. योग्य प्रक्रिया आणि साठवण सुविधा नसल्यास दर्जावर परिणाम होतो. बाजारातील दलालांमुळे शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत नाही.

**शेतकऱ्यांचे जीवन आणि संघर्ष**

पुसेगाव परिसरातील शेतकरी मेहनती आणि जिद्दी आहेत. दिवस-रात्र कष्ट करून ते शेतीची मशागत करतात. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि बाजारातील अस्थिरता यांचा सामना करूनही ते शेती टिकवून ठेवत आहेत.

**आर्थिक समस्या** अल्पभूधारक शेतकऱ्यांना उत्पादन खर्च भागविण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. बी-बियाणे, खते, औषधे आणि मजुरीचा खर्च वाढल्यामुळे आर्थिक अडचणी निर्माण होतात. हवामान बदलामुळे पावसाचे प्रमाण अनियमित झाले आहे. काही वेळा अतिवृष्टी तर काही वेळा दुष्काळ यामुळे उत्पादनात घट येते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आज अनेक शेतकरी ठिबक सिंचन, यांत्रिकीकरण आणि सेंद्रिय शेतीचा वापर करत आहेत. कृषी विभागाच्या मार्गदर्शनामुळे नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याचे प्रमाण वाढले आहे.

**महिला सहभाग** शेतीकामात महिलांचा मोठा सहभाग आहे. रोप लावणे, तण काढणे, काढणी आणि प्रक्रिया या सर्व कामांमध्ये महिला महत्त्वाची भूमिका बजावितात.

**कृषी उत्पादनांचा सामाजिक आणि आर्थिक**

**परिणाम** कांदा, बटाटा, आले आणि हळद या पीकांमुळे पुसेगाव परिसरातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळाली आहे. बाजारपेठा, वाहतूक व्यवसाय, मजूर वर्ग आणि प्रक्रिया उद्योग यांना रोजगार उपलब्ध झाला आहे. शेतीमुळे ग्रामीण भागातील लाकांचे जीवनमान सुधारण्यास मदत झाली आहे. शिक्षण, आरोग्य आणि आधुनिक सुविधा यांचा लाभ शेतकरी कुटुंबांना मिळू लागला आहे.

## शासनाच्या योजना आणि मदत

शेतकऱ्यांसाठी शासन विविध योजना राबवित आहे. पीकविमा योजना, अनुदान, सिंचन योजना आणि कृषी मार्गदर्शन यांचा शेतकऱ्यांना फायदा होत आहे. कृषी विज्ञान केंद्र आणि सहकारी संस्था शेतकऱ्यांना प्रशिक्षण देतात.

तसेच शेतीमालाला हमीभाव, साठवण सुविधा आणि थेट बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिक मजबूत होऊ शकते.

पुसेगाव परिसरातील कांदा, बटाटा, आले आणि हळद ही पीके केवळ कृषी उत्पादने नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहेत. मेहनती शेतकऱ्यांच्या कष्टामुळे या भागाने कृषी क्षेत्रात विशेष ओळख निर्माण केली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, योग्य बाजारपेठ, साठवण सुविधा आणि शासनाचे प्रभावी सहकार्य मिळाल्यास या परिसरातील शेती अधिकच प्रगत होऊ शकते.

शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याच्या कष्टामुळे समाजाचे जीवन सुरळीत चालते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही समाज आणि शासनाची सामूहिक जबाबदारी आहे. पुसेगाव परिसरातील कृषी विकास हा ग्रामीण प्रगतीचा आदर्श नमुना ठरू शकतो.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. सानिका आनंदराव शिंदे**
बी.कॉम.भाग–२






# कर्मचक्र

## (पुस्तक परीक्षण)

कर्मचक्र ही कादंबरी मारुती वाघ यांनी लिहिलेली असून ती सप्टेंबर, २०२५ मध्ये प्रकाशीत झाली आहे. या कादंबरीत मानवी जीवनातील कर्म, नियती आणि त्यांचे परस्परसंबंध यांचे सखोल दर्शन घडविते. ही कादंबरी वाचकाला केवळ कथा सांगत नाही, तर जीवनाचा अर्थ समजावून सांगण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे ''कर्मचक्र'' ही केवळ मनोरंजनात्मक साहित्यकृती नसून ती एक विचारप्रवर्तक आणि तत्त्वज्ञानप्रधान कादंबरी आहे. या कादंबरीचे प्रकाशन महाराष्ट्र शासनाच्या साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या मार्फत झाले आहे.

कादंबरीचा मुख्य आशय ''कर्म'' या संकल्पनेभोवती फिरतो. माणूस आपल्या कृतीनीच आपले भविष्य घडवतो, हा विचार लेखकाने अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. कादंबरीतील प्रमुख पात्र सुनील हा एक सामान्य माणूस आहे, जो आपल्या आयुष्यातील चढ–उतारांमधून जात असताना अनेक संकटांना सामोरा जातो. सुरुवातीला त्याचा व्यवसाय अयशस्वी होतो, कुटुंबात तणाव निर्माण होतो आणि तो मानसिकदृष्ट्या खचतो. या सगळ्या घटनांमुळे तो स्वतःला अपयशी समजू लागतो आणि नशिबाला दोष देतो. मात्र, कादंबरी पुढे सरकत असताना वाचकाला हे जाणवते की, सुनीलच्या आयुष्यात घडणाऱ्या या घटना अचानक किंवा केवळ नशिबामुळे घडलेल्या नाहीत. त्याच्या आणि त्याच्या कुटुंबाच्या भूतकाळातील कृतींचा त्यावर परिणाम झालेला असतो. विशेषतः त्याच्या वडिलांच्या आयुष्यातील निर्णय, त्यांच्या कृती आणि त्यातून निर्माण झालेले परिणाम हे सगळे सुनीलच्या वर्तमानावर परिणाम करतात. यामुळे ''कर्मचक्र'' ही संकल्पना स्पष्ट होते  प्रत्येक कृतीचे परिणाम अनिवार्य असतात आणि ते एका चक्राप्रमाणे परत येतात.

कादंबरीत सुनीलच्या मानसिक संघर्षाचे चित्रण अत्यंत प्रभावीपणे केले आहे. त्याच्या मनातील द्वंद्व, आत्मविश्वासाचा अभाव, आणि परिस्थितीशी लढण्याची त्याची धडपड हे सर्व वाचकाला भावते. त्याचबरोबर, त्याच्या पत्नीचे पात्रही महत्त्वाचे आहे. ती वास्तववादी विचारांची असून सुनीलला योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न करते. तिच्या संवादांमधून आणि कृतीतून कुटुंबातील नातेसंबंधांची जाणीव होते. लेखकाची लेखनशैली साधी, सरळ आणि प्रभावी आहे. त्यांनी अवघड तत्त्वज्ञान अतिशय सोप्या भाषेत मांडले आहे. संवादप्रधान शैलीमुळे कथा अधिक जिवंत आणि वास्तववादी वाटते. प्रत्येक प्रसंग वाचकाला विचार करायला लावतो आणि त्यातून काहीतरी शिकायला मिळते. विशेषतः ''निसर्ग'' किंवा ''अदृश्य शक्ती'' यांचा उल्लेख करून लेखकाने कर्मसिद्धांत अधिक ठळकपणे मांडला आहे.

या कादंबरीत एकूण आठ वेगवेगळ्या कथांचे वर्णन केले आहे. या कथा जरी सुरवातीस वाचताना वेगवेगळ्या वाटत असल्या तरी प्रत्येक कथेती एखादा प्रसंग पुढच्या नवीन कथेला कसा जन्म देतो, याची वाचकाला उत्सुकता लागून राहते. या सर्व कथा अशा प्रकारे एकमेकांत गुंफल्या आहेत की, त्याचा उलगडा होताना वाचक आश्चर्यचकीत होतो. कोणता प्रसंग पुढच्या कथेला जन्म देणार आहे आणि तो प्रसंग किती त्रासदायक असणार आहे, याची थोडीशी भीतीही वाचकाच्या मनात निर्माण होते.

या कादंबरीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिचा संदेश. ''जसे कर्म तसे फळ'' हा साधा पण अत्यंत महत्त्वाचा विचार लेखकाने संपूर्ण कथानकामधून

स्पष्ट केला आहे. आजच्या काळात अनेकजण आपल्या अपयशासाठी नशिबाला दोष देतात, पण ही कादंबरी सांगते की, आपले जीवन आपणच घडवितो. आपल्या कृतींचे परिणाम आपल्यालाच भोगावे लागतात, त्यामुळे योग्य मार्गावर चालणे अत्यंत आवश्यक आहे. तथापि, कादंबरीतील काही भाग थोडे संथ वाटतात. काही ठिकाणी तत्त्वज्ञान अधिक असल्यामुळे कथा थोडी जड वाटू शकते. पण हा दोष फारसा महत्त्वाचा वाटत नाही, कारण कादंबरीचा मुख्य उद्देश वाचकाला विचार करायला लावणे हा आहे, आणि त्यात ती पूर्णपणे यशस्वी ठरते.

एकंदरीत, ''कर्मचक्र'' ही कादंबरी वाचकाला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडते. ती जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलते आणि योग्य कृती करण्याची प्रेरणा देते. विशेषतः तरुण पिढीसाठी ही कादंबरी मार्गदर्शक ठरू शकते. जीवनातील यश-अपयश, नातेसंबंध, आणि नैतिक मूल्ये यांचे सुंदर चित्रण या कादंबरीत आढळते. शेवटी असे म्हणता येईल की, ''कर्मचक्र'' ही केवळ एक कादंबरी नसून ती मानवी जीवनाचा आरसा आहे. ती वाचकाला स्वतःच्या कृतींचा विचार करायला लावते आणि योग्य मार्ग निवडण्याची प्रेरणा देते. त्यामुळे ही कादंबरी प्रत्येकाने एकदा तरी वाचावी अशी आहे.




❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. गौरी मनोहर पोतेकर**
एम.कॉम.भाग-२

आलेल्या अपयशातून काहीतरी धडा घेणं हे यशापेक्षाही जास्त महत्वाचं असतं.

स्वतःच्या फायद्यासाठी अनेक जण आपल्या फांद्या तोडतील. तुटलेल्या जागेवरून नवी पालवी घेऊन पुन्हा नव्याने बहरता यायला हवं.

स्पर्धा स्वतःच्या अपयशाशी करावी, दुसऱ्यांच्या यशाशी नाही.

माणूस ओंजळभर देतोय की, मुठभर याला महत्त्व नाही. त्याच्याजवळ त्याच्यापुरतंही नसताना तो एखादी गोष्ट देतोय याला महत्त्व आहे.

कधीकधी एखाद्याला आपलंसं करण्यासाठी थोडा वेळ जाऊ द्यावा लागतो.

किनाऱ्यावर उभं राहिलं की, भरतीच्या लाटा स्वतःहून भेटायला येतात.

योग्य वेळी सावरणारा हात असला की, माणूस आयुष्याच्या प्रवासात सहसा भरकटत नाही.

स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास असला की, मग 'लोक काय म्हणतील?' याचा काहीच फरक पडत नाही

**संकलन : कु. गौरी मनोहर पोतेकर**
एम.कॉम.भाग-२

# प्रसारमाध्यमे आणि लोकशाही

(संशोधनपर लेख)

''माहिती लोकशाहीचा प्राण आहे'' असे म्हटले जाते. लोकशाही व्यवस्थेत नागरिकांना योग्य आणि अचूक माहिती मिळणे अत्यंत आवश्यक असते. ही माहिती जनतेपर्यंत पाहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य प्रसारमाध्यमे करतात. त्यामुळेच प्रसारमाध्यमांना लोकशहीचा ''चौथा स्तंभ'' असे म्हटले जाते.

लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांसाठी आणि लोकांद्वारे चालणारे शासन. या व्यवस्थेत नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असतो. नागरिकांना शासनाच्या धोरणांची, निर्णयांची आणि समाजातील घडामोडींची माहिती मिळाली तसच ते योग्य निर्णय घेऊ शकतात. ही माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रसारमाध्यमे करतात.

प्रसारमाध्यमांमध्ये वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन आणि आजच्या काळात इंटरनेट व सोशल मीडिया यांचा समावेश होतो. या माध्यमांद्वारे देशातील आणि जगातील विविध घटना, राजकीय घडामोडी, आर्थिक बदल आणि सामाजिक प्रश्न यांची माहिती जनतेपर्यंत पोहोचते. यामुळे नागरिक अधिक जागरूक बनतात. जागरूक नागरिक हेच लोकशाहीचे खरे बळ असते. प्रसारमाध्यमांचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे सरकारच्या कामकाजावर लक्ष ठेवणे. शासनाने घेतलेल्या निर्णयांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविणे आणि त्या निर्णयांवर चर्चा घडवून आणणे हे प्रसारमाध्यमांचे काम असते. समाजातील अन्याय, भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहार उघडकीस आणण्यामध्येही प्रसारमाध्यमांची मोठी भूमिका असते. त्यामुळे शासन अधिक जबाबदारीने काम करण्यास प्रवृत्त होते.

निवडणुकांच्या काळात प्रसारमाध्यमांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. विविध राजकीय पक्षांचे कार्यक्रम, उमेदवारांची माहिती आणि निवडणुकीतील घडामोडी प्रसारमाध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहोचतात. यामुळे मतदारांना योग्य माहिती मिळते आणि ते विचारपूर्वक मतदान करू शकतात. अशा प्रकारे प्रसारमाध्यमे लोकशाही प्रक्रियेला बळकटी देतात.

आजच्या आधुनिक युगात सोशल मीडियाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप, युट्युब व इतर माध्यमांमुळे माहिती अतिशय वेगाने पसरते. विद्यार्थी आणि युवक या माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. त्यामुळे या माध्यमांचा योग्य आणि जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे.

कधी कधी सोशल मीडियावर चुकीची माहिती किंवा अफवा पसरविल्या जातात. अशा गोष्टींमुळे समाजात गैरसमज निर्माण होऊ शकतात. त्यामुळे प्रसारमाध्यमांनी सत्य, निष्पक्षता आणि जबाबदारी या तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे. तसेच नागरिकांनीही कोणतीही माहिती स्वीकारण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे गरजेचे आहे.

विद्यार्थी म्हणून आपण प्रसारमाध्यमांकडे केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून न पाहता ज्ञानाचे आणि जागरूकतेचे साधन म्हणून पाहिले पाहिजे. वृत्तपत्र वाचणे, बातम्या पाहणे आणि सामाजिक प्रश्नांवर विचार करणे यामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढते आणि समाजाबद्दलची जाणीव विकसित होते. प्रसारमाध्यमे आणि लोकशाही यांचे नाते अतिशय जवळचे आहे. प्रसारमाध्यमे लोकांना माहिती देतात, त्यांना जागरूक करतात आणि शासनाच्या कामकाजावर लक्ष ठेवतात. त्यामुळे लोकशाही अधिक मजबूत आणि प्रभावी बनते. जर प्रसारमाध्यमे प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने काम करत राहिली, तर भारताची लोकशाही अधिक सक्षम आणि प्रगत होईल.




**कु. पूनम गजेंद्र इंदलकर**
बी.ए.भाग–२

# जागतिक वारसा स्थळे - युनेस्को

**(माहितीपर लेख)**

**युनेस्कोने जाहीर केलेला जागतिक वारसा स्थळांमध्ये भारतातील वारसास्थळे –** नुकताच युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत भारतातील तेलंगणाचे रामप्पा मंदिर आणि गुजरातमधील धोलविरा या दोन स्थळांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानिमित्ताने युनेस्कोच्याया वारसा स्थळनिवडीच्या प्रक्रियेवर प्रकाश टाकणारा हा लेख आहे.

चीनमधील फुझौ येथे ऑनलाईन संपन्न झालेल्या एका बैठकित भारतातील दोन स्थळांची जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित करण्यात आली ही बाब निश्चितच देशाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक, आर्थिक तसेच आंतराष्ट्रीय संबंधांसाठी सुध्दा तितकीच महत्त्वपूर्ण ठरली आहे. परंतू भारताच्या इतिहासालाच योग्यतापूर्वक न मानणाऱ्यांना हे कितपत रूचेल याबाबत साशंकता आहे. कारण भारतीय परंपरा संस्कृतीच्या दोषांवर टीका करणारी ही मंडळी भारताच्या महान इतिहासाची अशी जागतिक दखल घेतली जाते. असो तर यावर्षी निवडले गेलेले तेलंगणाचे ''रामप्पा मंदिर'' आणि गुजरातमधील ''धोलवीरा'' ही दोन्ही स्थळे भारताच्या दैदिप्यमान इतिहासाचे साक्षीदार आहेत. या दोन स्थळांच्या समावेशामुळे भारताने सुपर ४० ब्राऊन यादीत स्थान पटकविले आहे. भारतातील या ४० जागतिक वारसा स्थळांमध्ये २०१४ ते २०२१ या काळात एकूण दहा वारसा स्थळांचा समावेश केला. १९८३ साली युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत भारताच्या लाल किल्याचा पहिल्यांदा समावेश करण्यात आला होता.

पूर्वीच्या काळात जर अशा अनेक ऐतिहासिक, पौराणिक स्थळांना युनेस्कोमध्ये चिकाटीने सादर केले असते तर कदाचित आज आपला देश हा वारसा स्थळांच्या क्रमवारीत प्रथम क्रमांकावर असता. याच अनुषंगाने आजघडीला भारताचे या यादीत नेमके स्थान काय? युनेस्कोच्या या यादीत वारसा स्थळांची निवड नेमकी कशी केली जाते? ही ब्राऊन यादी नक्की काय असते? या यादीत समावेश होणे का महत्त्वाचे आहे? या आणि अशाच अन्य संबंधित प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्याचा या लेखाच्या माध्यमातून प्रयत्न केला आहे. संयुक्त राष्ट्रे शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक युनेस्कोची स्थापना दि. ३ नोव्हेंबर १९४५ साली झाली होती. परंतू जागतिक वारसा स्थळ निवडीच्या अटी आणि नियमांचा प्रारंभ सन. १९७५ पासून सुरू झाला. याचे मुख्य कार्यालय फ्रान्समधील 'पॅरीस' येथे आहे. युनेस्को ही संयुक्त राष्ट्राची एक संस्था आहे. जगभरात शिक्षणाचा प्रसार करणे तसेच जगभरातील सांस्कृतिक, ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन करणे आणि त्याद्वारे मानवी इतिहास आणि मानवी मूल्यांचे संवर्धन करणे असा युनेस्कोचा उद्देश आहे.

दरवर्षी जगभरातील काही स्थळांचा युनेस्कोतर्फे जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केला जातो. ज्या देशांची एकूण वारसा स्थळांची संख्या ही ४० ते ४९ च्या दरम्यान असते त्या देशांना ब्राऊन लिस्टमध्ये मोजले जाते. ४९ ते पुढे वारसा स्थळे असलेल्या देशाची गणती ही पर्पल लिस्ट मध्ये केली जाते. उदाहरणार्थ इटली ५८ सर्वाधिक जागतिक वारसा स्थळं असणारे राष्ट्र आहे. तर त्याखालोखाल दुसरा क्रमांक लागतो तो चीनचा ५६ वारसा स्थळं आहेत. सर्वप्रथम वारसा स्थळांमध्ये समाविष्ट होऊ शकतील अशा जगभरातील स्थळांची एक तात्पुरती यादी तयार केली जाते. या यादीत प्रत्येक देश ज्या महत्त्वपूर्ण स्थळांना वारसा स्थळ म्हणून घोषित करू इच्छितो अशा सहा स्थळांची यादी जागतिक समितीकडे पाठविली जाते. अशीच एक यादी भारताच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडूनही समितीला पाठविली जाते. तत्पूर्वी तीन सल्लागार समितींच्या माध्यमातून त्या स्थळांचे रीतसर सर्व्हेक्षण केले जाते. वारसा स्थळ युनेस्कोद्वारे विहीत अटी शर्ती, निकष पूर्ण करीत असेल तरच त्या स्थळांचे नाव पुढील प्रक्रियेसाठी जागतिक वारसा समितीकडे पाठविले जाते. त्यानंतर सर्व देशाच्या प्रस्तावांची मिळून तयार झालेल्या एका यादीवर २१ देशांसमोर विचार

केला जातो. त्यातही हे २१ देश कायमस्वरुपी या समितीवर नसतात. दर चार वर्षांनी विविध देशांना समितीवर संधी दिली जाते. यंदा रामप्पा मंदिराला तब्बल १७ देशांनी वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी सहमती दर्शविली होती. त्यात रशिया व चीननेही आपल्याला पाठिंबा दर्शविला.

यूनेस्कोद्वारे या वारसा स्थळांना तीन प्रकारांत विभागले जाते.

१. सांस्कृतिक स्थळे २. नैसर्गिक स्थळे

३. समिश्रित स्थळे

भारतात आता या दोन स्थळांच्या समावेशामुळे भारतातील जागतिक वारसा स्थळांची एकूण संख्या ही ४० इतकी झाली आहे. त्यातील ३२ सांस्कृतिक स्थळे ७ नैसर्गिक स्थळे आणि एका संमिश्रित स्थळाचा समावेश आहे. सांस्कृतिक, जागतिक वारसा स्थळात समावेश होण्यासाठी नक्की कोणत्या आहेत अटी ?

१. ते स्थळ अथवा त्या वास्तूच्या निर्मितीमध्ये सर्जनशीलता हवी.

२. त्या स्थळात मानवी मूल्ये झळकली पाहिजेत.

३. त्या स्थळाच्या काळात त्या स्थळाचे सांस्कृतिक महत्त्व असले पाहिजे.

४. जर नामांकन केलेले स्थळ हे शहर असेल तर त्याचे नियोजन व तेथील पाणीपुरवठ्याचे नियोजन उत्तम हवे.

५. त्याची स्थापत्यशैली, तेथील शिलालेख, लँडस्केप डिझाईन यांचाही विचार केला जातो.

६. मानवी संस्कृतीचा इतिहास त्या स्थळाशी संबंधित असावा.

७. त्या स्थळांच्या जमिनीचा त्याच्या आजुबाजूला समुद्राचा सुयोग्य वापर.

८. जे स्थळ, वास्तू किंवा शहर त्याची देशाची मूल्ये, पंरपरा व संस्कृती दर्शविते.

भारतीय संस्कृतीच्या संवर्धनासाठी त्याचे महत्त्व आणि दैदिप्यमान भारतीय इतिहास जगाला सांगण्यासाठी अशा अनेक स्थळांना जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित करणे गरजेचे आहे तसेच जागतिक माध्यमांद्वारे आपल्या देशाचा अनमोल ठेवा जगासमोर यावा यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. सिध्दी रामदास फडतरे**
बी.ए.भाग–१





# शिखर शिंगणापूरचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व

**(माहितीपर लेख)**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेमध्ये अनेक तीर्थक्षेत्रांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात वसलेले शिखर शिंगणापूर हे असेच एक प्रसिद्ध धार्मिक व सांस्कृतिक केंद्र आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये उंच डोंगरावर वसलेले हे क्षेत्र भगवान महादेवाच्या उपासनेसाठी ओळखले जाते. महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या ठिकाणी दरवर्षी यात्रा, उत्सव आणि धार्मिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर आयोजित केले जातात. धार्मिकतेबरोबरच शिखर शिंगणापूर हे सामाजिक ऐक्य, लोकपरंपरा, सांस्कृतिक वारसा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे केंद्र म्हणूनही महत्त्वपूर्ण आहे. शिखर शिंगणापूर हे केवळ मंदिर नसून महाराष्ट्राच्या लोकजीवनातील श्रद्धा, परंपरा आणि संस्कृतीचे प्रतिक आहे. ग्रामीण समाजातील लोकांच्या जीवनशैलीवर, धार्मिक भावनांवर आणि सामाजिक संबंधांवर या

तीर्थक्षेत्राचा मोठा प्रभाव दिसून येतो.

**शिखर शिंगणापूरचा ऐतिहासिक परिचय** शिखर शिंगणापूर हे प्राचीन काळापासून शिवभक्तांचे पवित्र स्थान मानले जाते. डोंगराच्या शिखरावर असलेल्या महादेव मंदिरामुळे या गावाला ''शिखर शिंगणापूर'' हे नाव प्राप्त झाले. इतिहासकारांच्या मते यादवकालीन व बहामनी काळात या मंदिराचा विकास झाला. पुढे मराठा साम्राज्याच्या काळातही या क्षेत्राला मोठे महत्त्व प्राप्त झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनीही या देवस्थानाला भेट दिल्याच्या कथा लोकपरंपरेत प्रसिद्ध आहेत. मंदिराची वास्तुशैली प्राचीन असून दगडी बांधकाम, दीपमाळ, नंदी मंडप आणि सभामंडप यांमुळे मंदिराचे सौंदर्य अधिक खुलून दिसते.

**धार्मिक महत्त्व** शिखर शिंगणापूर हे भगवान शंकराचे प्रसिद्ध ज्योतिर्लिंगसदृश स्थान मानले जाते. येथे असलेले शिवलिंग स्वयंभू असल्याची श्रद्धा आहे. महाशिवरात्री, श्रावण महिना आणि चैत्र यात्रेदरम्यान येथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात.

**धार्मिक दृष्टिकोनातून या क्षेत्राचे महत्त्व पुढीलप्रमाणे दिसून येते**

**शिवभक्तांचे प्रमुख श्रद्धास्थान** महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा आणि आंध्रप्रदेशातून भाविक येथे येतात. भक्त डोंगर चढून महादेवाचे दर्शन घेतात. यामुळे भक्तीभाव आणि अध्यात्मिक वातावरण निर्माण होते.

**व्रत व परंपरा** अनेक भक्त नवस पूर्ण करण्यासाठी पायी यात्रा करतात. काही जण उपवास, अभिषेक, रुद्रपाठ यांसारखे धार्मिक विधी करतात. या परंपरा पिढ्यान्पिढ्या जतन झालेल्या दिसतात.

**महाशिवरात्री उत्सव** महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते. रात्री जागरण, भजन, कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या उत्सवामुळे धार्मिक एकात्मता वाढते.

**सामाजिक महत्त्व** शिखर शिंगणापूर हे सामाजिक जीवनाशी घट्ट जोडलेले केंद्र आहे. यात्रेच्या माध्यमातून ग्रामीण समाजामध्ये ऐक्य आणि सहकार्याची भावना विकसित होते.

**सामाजिक ऐक्याची भावना** यात्रेमध्ये विविध जाती, धर्म आणि समाजातील लोक सहभागी होतात. सर्वजण एकत्र येऊन देवदर्शन करतात. यामुळे बंधुभाव आणि सामाजिक समरसता वाढते.

**लोकसहभाग** यात्रा आणि उत्सव व्यवस्थाप-नामध्ये गावकरी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतात. पाणीपुरवठा, निवास, स्वच्छता आणि भोजन व्यवस्था यामध्ये स्वयंसेवक कार्यरत असतात. यामुळे सामूहिक कार्यसंस्कृती विकसित होते.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना** यात्रेदरम्यान दुकाने, हॉटेल्स, वाहतूक, फळे, फुले आणि पूजासाहित्य विक्री मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

**सामाजिक परंपरांचे जतन** भजन, कीर्तन, गोंधळ, लोकनृत्य आणि पारंपरिक वाद्ये यांद्वारे लोकसंस्कृती टिकून राहते. ग्रामीण समाजातील सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचतो.

**सांस्कृतिक महत्त्व** शिखर शिंगणापूर हे महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे. येथे धार्मिकतेसोबत लोककला, संगीत आणि परंपरांचा संगम पाहायला मिळतो.

**लोककलेचे जतन** यात्रेमध्ये भारूड, कीर्तन, जागरण-गोंधळ, लेझीम आणि ढोल-ताशा यांसारख्या लोककलांचे सादरीकरण केले जाते. त्यामुळे पारंपरिक कला जिवंत राहतात.

**लोकसंगीत आणि भक्तीपरंपरा** अभंग, ओव्या आणि भजनांच्या माध्यमातून भक्तीभाव व्यक्त केला जातो. वारकरी संप्रदायातील अनेक भक्त येथे येऊन हरिनाम सप्ताह आणि कीर्तन करतात.

**पारंपरिक पोशाख आणि जीवनशैली** यात्रेदरम्यान ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडते. पुरुषांचे धोतर-फेटे आणि महिलांच्या नऊवारी साड्या यांमधून महाराष्ट्राची पारंपरिक ओळख दिसून येते.

**सांस्कृतिक देवाणघेवाण** वेगवेगळ्या भागांतील लोक एकत्र येत असल्याने त्यांच्या भाषा, परंपरा आणि संस्कृतींची देवाणघेवाण होते. यामुळे सामाजिक सलोखा वाढतो.

**यात्रेचे महत्त्व** शिखर शिंगणापूरची यात्रा ही धार्मिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची मानली जाते. यात्रेदरम्यान लाखो भाविक उपस्थित राहतात. यात्रेमुळे ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहार वाढतात. तसेच लोकांमध्ये उत्साह आणि धार्मिक ऊर्जा निर्माण होते.

**पर्यावरणीय महत्त्व** शिखर शिंगणापूर डोंगराळ परिसरात वसलेले असल्याने पर्यावरणीय दृष्ट्याही महत्त्वाचे आहे. येथे नैसर्गिक सौंदर्य, वनसंपदा आणि जैवविविधता आढळते.

**नैसर्गिक पर्यटन** डोंगरावरील निसर्गरम्य वातावरण पर्यटकांना आकर्षित करते. पावसाळ्यात येथील हिरवळ आणि धुके मनमोहक दृश्य निर्माण करतात.

**पर्यावरण संरक्षणाची गरज** यात्रेदरम्यान वाढणारी गर्दी, प्लास्टिक कचरा आणि ध्वनीप्रदूषण यामुळे पर्यावरणावर परिणाम होतो. त्यामुळे स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता आहे.

**वृक्षसंवर्धन** स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवी संस्था वृक्षारोपण आणि स्वच्छता मोहिमा राबवत आहेत. यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करण्यास मदत होते.

आधुनिक काळातील बदल : आधुनिक तंत्रज्ञान आणि वाहतुकीमुळे शिखर शिंगणापूरचा विकास वेगाने होत आहे.

**रस्ते व वाहतूक सुविधा** डोंगरावर जाण्यासाठी रस्ते आणि पायऱ्यांची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. त्यामुळे भाविकांना सोयीस्कर प्रवास करता येतो.

**पर्यटन विकास** धार्मिक पर्यटनामुळे हॉटेल्स, लॉजिंग आणि व्यावसायिक सेवा वाढल्या आहेत. स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.

**डिजिटल प्रसिद्धी** सोशल मीडियामुळे शिखर शिंगणापूरची माहिती जगभर पोहोचत आहे. त्यामुळे पर्यटक आणि भाविकांची संख्या वाढत आहे.

**समस्या आणि आव्हाने** शिखर शिंगणापूरच्या विकासासोबत काही समस्या देखील निर्माण होत आहेत.

**गर्दी व्यवस्थापन** यात्रेदरम्यान मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने सुरक्षा आणि व्यवस्थापनाचे आव्हान निर्माण होते.

**स्वच्छतेचा अभाव** प्लास्टिक आणि कचऱ्यामुळे परिसर अस्वच्छ होतो.

**व्यापारीकरण** धार्मिक क्षेत्राचे वाढते व्यापारीकरण मूळ आध्यात्मिक वातावरणावर परिणाम करू शकते.

**पर्यावरणीय हानी** वनतोड आणि प्रदूषणामुळे नैसर्गिक सौंदर्य धोक्यात येऊ शकते.

**उपाययोजना** स्वच्छता अभियान राबविणे, प्लास्टिक बंदी लागू करणे, पर्यावरणपूरक यात्रा आयोजित करणे, स्थानिक लोकांचा सहभाग वाढविणे, पर्यटन व्यवस्थापन सुधारणा करणे, सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे

शिखर शिंगणापूर हे महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे. भगवान महादेवाच्या भक्तीबरोबरच येथे लोकसंस्कृती, सामाजिक ऐक्य आणि ग्रामीण परंपरांचे दर्शन घडते. यात्रेच्या माध्यमातून आर्थिक विकासाला चालना मिळते तसेच लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होते.आजच्या आधुनिक काळात या क्षेत्राचा विकास होत असला तरी त्याचे धार्मिक पावित्र्य, सांस्कृतिक वारसा आणि पर्यावरणीय संतुलन टिकवून ठेवणे आवश्यक आहे. शिखर शिंगणापूर हे केवळ तीर्थक्षेत्र नसून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे आणि लोकजीवनाचे जिवंत प्रतीक आहे.



❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. प्रणाली विठ्ठल शिंदे**
बी.कॉम.भाग–३

# खटाव तालुक्याचे ऐतिहासिक महत्त्व

**(संशोधनपर लेख)**

खटाव तालुका हा महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील एक ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण प्रदेश मानला जातो. सह्याद्रीच्या कुशीत वसलेला हा तालुका आपल्या प्राचीन इतिहासामुळे, धार्मिक परंपरांमुळे, संतपरंपरेमुळे आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदानामुळे विशेष ओळख निर्माण करतो. खटाव तालुक्याने केवळ राजकीय आणि सामाजिक इतिहासातच नव्हे तर कृषी, शिक्षण आणि लोकसंस्कृतीच्या संवर्धनामध्ये मोलाचे कार्य केले आहे. या प्रदेशात अनेक ऐतिहासिक मंदिरे, संतांचे वास्तव्य, पारंपरिक यात्रा आणि लोककला यांचा समृद्ध वारसा आजही जपलाजात आहे.

खटाव तालुक्याचा इतिहास हा महाराष्ट्राच्या इतिहासाशी जोडलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात या भागाला विशेष धोरणात्मक महत्त्व होते. मराठेशाहीच्या स्थापनेपासून ते पेशवाईपर्यंत अनेक राजकीय घडामोडींमध्ये या प्रदेशाचा सहभाग दिसून येतो. त्यामुळे खटाव तालुका हा इतिहासच्या अभ्यासकांसाठी संशोधनाचा एक महत्त्वपूर्ण विषय मानला जातो.

## भौगोलिक पार्श्वभूमी

खटाव तालुका सातारा जिल्ह्याच्या पूर्व भागात वसलेला आहे. या भागात डोंगराळ तसेच सपाट प्रदेश आहे. माणदेशाच्या सांस्कृतिक प्रभावामुळे येथील लोकजीवनात साधेपणा, कष्टाळूपणा आणि परंपरेचे जतन दिसून येते. दुष्काळी परिस्थिती असूनही येथील लोकांनी शेती आणि पशुपालनाच्या माध्यमातून आपले जीवन समृद्ध केले आहे.

या प्रदेशात प्राचीन काळापासून मानवी वस्ती असल्याचे पुरावे विविध ठिकाणी आढळतात. नदीकिनारी वसलेली गावे, प्राचीन विहिरी, मंदिरे आणि किल्ल्यांचे अवशेष यांमधून या भागाचा ऐतिहासिक वारसा स्पष्ट होतो.

## प्राचीन इतिहास

खटाव तालुक्याचा इतिहास अत्यंत प्राचीन आहे. सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव या राजवटींचा प्रभाव या भागावर पडलेला दिसतो. अनेक प्राचीन मंदिरांची स्थापत्यशैली पाहता या प्रदेशात मध्ययुगीन संस्कृतीचा प्रभाव स्पष्ट जाणवतो.

या भागात व्यापारमार्ग विकसित झाले होते. दक्षिण महाराष्ट्र आणि कर्नाटकाला जोडणाऱ्या मार्गांमुळे खटाव परिसराला व्यापारी दृष्टिकोनातून महत्त्व प्राप्त झाले होते. व्यापारी, संत आणि प्रवासी यांचे येणे–जाणे मोठ्या प्रमाणात होत असे. त्यामुळे येथे सांस्कृतिक देवाणघेवाण वाढली आहे.

## मराठेशाहीतील खटाव तालुक्याचे स्थान

मराठा साम्राज्य स्थापनेच्या काळात खटाव तालुक्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य उभारताना सातारा परिसरातील अनेक भागांवर नियंत्रण मिळविले. खटाव परिसर हा लष्करी हालचालींसाठी उपयुक्त मानला जात होता.या प्रदेशातील अनेक युवकांनी मराठा सैन्यात सहभाग घेतला होता. स्वराज्य रक्षणासाठी स्थानिक लोकांनी धान्य, निवारा आणि मदत पुरविली. मराठा साम्राज्याच्या विस्तारात ग्रामीण भागातील लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा होता आणि खटाव तालुक्याने ही भूमिका प्रभावीपणे पार पाडली.पेशव्यांच्या काळात देखील या भागाचे आर्थिक आणि प्रशासकीय महत्त्व टिकून राहिले. महसूल व्यवस्था, शेती आणि व्यापार यामुळे या प्रदेशाचा विकास झाला.

## संतपरंपरा आणि धार्मिक वारसा

खटाव तालुका धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरेसाठी प्रसिद्ध आहे. येथे अनेक संत, महात्मे आणि धार्मिक व्यक्तींनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. गावागावात प्राचीन मंदिरे आणि यात्रा आजही भक्तीभावाने साजऱ्या केल्या जातात.

सेवागिरी महाराज मंदिर हे या परिसरातील श्रद्धेचे प्रमुख केंद्र मानले जाते. सेवागिरी महाराजांच्या

विचारांचा प्रभाव संपूर्ण माणदेश परिसरावर पडलेला दिसतो. त्यांच्या यात्रेमुळे सामाजिक ऐक्य, भक्तीभाव आणि लोकसंस्कृतीचे जतन झाले आहे. याशिवाय खंडोबा, भैरवनाथ, मारुती, महादेव आणि देवी मंदिरांची परंपरा या भागात प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. धार्मिक सण आणि यात्रा या लोकजीवनाचा अविभाज्य भाग आहेत.

## स्वातंत्र्यलढ्यातील योगदान

भारतीय स्वातंत्र्य चळवळ काळात खटाव तालुक्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी ब्रिटिशांविरुद्ध लढा दिला. स्वदेशी आंदोलन, सत्याग्रह आणि असहकार आंदोलनात येथील युवक सहभागी झाले होते. ग्रामीण भागातील लोकांनी स्वातंत्र्यसैनिकांना मदत केली. काहींनी तुरुंगवास भोगला तर काहींनी आर्थिक सहाय्य केले. देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी कीर्तन, पोवाडे आणि सभा आयोजित केल्या जात होत्या. या चळवळीमुळे खटाव तालुक्यात सामाजिक जागृती निर्माण झाली. शिक्षणाचे महत्त्व वाढले आणि समाजसुधारणेच्या चळवळींना चालना मिळाली.

## सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा

खटाव तालुक्याची संस्कृती अत्यंत समृद्ध आहे. लोककला, लोकगीते, भारूड, तमाशा आणि पोवाडे यांची परंपरा येथे प्राचीन काळापासून टिकून आहे. ग्रामीण जीवनातील आनंद, संघर्ष आणि श्रद्धा या कलांमधून व्यक्त होतात. सण-उत्सवांना या भागात विशेष महत्त्व आहे. गणेशोत्सव, दिवाळी, होळी, गुढीपाडवा आणि यात्रांमध्ये लोक मोठ्या उत्साहाने सहभागी होतात. पारंपरिक वेशभूषा, लोकनृत्य आणि सामूहिक कार्यक्रम यांमुळे सामाजिक ऐक्य टिकून राहते. माणदेशी संस्कृतीचा प्रभाव येथील बोलीभाषा, खाद्यसंस्कृती आणि जीवनशैलीत स्पष्ट दिसतो. ज्वारीची भाकरी, पिठलं, ठेचा आणि ग्रामीण पदार्थ हे येथील वैशिष्ट्यपूर्ण अन्नसंस्कृतीचे भाग आहेत.

## कृषी आणि आर्थिक विकास

खटाव तालुका कृषिप्रधान प्रदेश म्हणून ओळखला जातो. दुष्काळी परिस्थिती असूनही शेतकऱ्यांनी मेहनतीच्या जोरावर शेती विकसित केली आहे. ज्वारी, बाजरी, गहू, ऊस, कांदा, वाटाणा आणि कडधान्यांचे उत्पादन येथे घेतले जाते.

अलीकडील काळात आधुनिक सिंचन पद्धती, ठिबक सिंचन आणि जलसंधारणामुळे कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल दिसून येत आहेत. पशुपालन आणि दुग्धव्यवसाय हे देखील ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे घटक आहेत. ग्रामीण बाजारपेठा आणि कृषी उत्पादनामुळे तालुक्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे.

## शिक्षण आणि समाजप्रबोधन

खटाव तालुक्यात शिक्षण क्षेत्रातही मोठी प्रगती झाली आहे. विविध शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्था शिक्षण प्रसारासाठी कार्यरत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध होत आहे. रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था व परिसरातील अन्य शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण शिक्षणाचा पाया मजबूत झाला. शिक्षणामुळे सामाजिक परिवर्तन घडून आले आणि नव्या पिढीला प्रगतीची दिशा मिळाली. महिलांना शिक्षण, युवक संघटना आणि सामाजिक उपक्रमांमुळे तालुक्यात जागृती निर्माण झाली आहे.

## ऐतिहासिक स्थळे आणि पर्यटन

खटाव तालुक्यात अनेक धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळे आहेत. प्राचीन मंदिरे, यात्रास्थळे, तलाव आणि नैसर्गिक सौंदर्यामुळे हा भाग पर्यटनासाठीही महत्त्वाचा आहे. नेर तलाव हा परिसरातील प्रसिद्ध जलस्रोत असून त्याचे ऐतिहासिक आणि पर्यावरणीय महत्त्व मोठे आहे. ग्रामीण पर्यटनाच्या दृष्टीने या ठिकाणाला मोठी संधी आहे. धार्मिक यात्रा आणि लोकउत्सवांमुळे बाहेरील लोक या भागाकडे आकर्षित होतात. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळकटी येते.

## आधुनिक काळातील खटाव तालुका

आजच्या काळात खटाव तालुका विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे. रस्ते, शिक्षण, पाणीपुरवठा आणि कृषी क्षेत्रात अनेक सुधारणा होत आहेत. डिजिटल तंत्रज्ञान आणि आधुनिक शिक्षणामुळे युवकांना नव्या संधी उपलब्ध होत आहेत.

तरीही दुष्काळ, बेरोजगारी आणि स्थलांतर या समस्या आजही काही प्रमाणात आहेत. या समस्यांवर मात करण्यासाठी जलसंधारण, उद्योगविकास आणि कौशल्याधारित शिक्षण यावर भर देणे आवश्यक आहे. खटाव तालुका हा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वारसा लाभलेला प्रदेश आहे. प्राचीन राजवटींपासून मराठेशाहीपर्यंत, संतपरंपरेपासून ते स्वातंत्र्यलढ्यापर्यंत आणि कृषी संस्कृतीपासून आधुनिक विकासापर्यंत या तालुक्याने महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.येथील लोकसंस्कृती, धार्मिक परंपरा, ऐतिहासिक स्थळे आणि सामाजिक ऐक्य ही खटाव तालुक्याची खरी ओळख आहे. भविष्यात या वारशाचे जतन करून पर्यटन, शिक्षण आणि कृषी विकासाला चालना दिल्यास खटाव तालुका अधिक प्रगत आणि समृद्ध होऊ शकतो.अशा प्रकारे खटाव तालुका हा केवळ भौगोलिक प्रदेश नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. समृध्दी सुभाष शिंदे**
बी.कॉम.भाग-३

# पश्चिम महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यत

**(संशोधनपर लेख)**



पश्चिम महाराष्ट्र हा कृषिप्रधान प्रदेश म्हणून ओळखला जातो. येथे शेती, पशुपालन आणि ग्रामीण संस्कृती यांचे अतूट नाते आहे. या ग्रामीण जीवनशैलीत बैलाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. बैल हा केवळ शेतीचे काम करणारा प्राणी नसून ग्रामीण संस्कृतीचा केंद्रबिंदू मानला जातो. बैलगाडा शर्यत ही पश्चिम महाराष्ट्रातील पारंपरिक लोककला, क्रीडा आणि सांस्कृतिक वारसा यांचे प्रतिक आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, सोलापूर आणि अहिल्यनगर या जिल्ह्यांत बैलगाडा शर्यती मोठ्या उत्साहात आयोजित केल्या जातात.बैलगाडा शर्यत ही ग्रामीण समाजाच्या एकात्मतेचे, परंपरेचे आणि शेतकरी जीवनातील आनंदाचे प्रतिक मानली जाते. या शर्यतींमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते तसेच स्थानिक परंपरा

जपल्या जातात. आधुनिक काळात प्राणीसंवर्धन, कायदे आणि सामाजिक बदल यांच्या प्रभावामुळे या शर्यतींमध्ये अनेक बदल झाले आहेत. प्रस्तुत संशोधन निबंधात पश्चिम महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यतींचा इतिहास, सामाजिक–सांस्कृतिक महत्त्व, आर्थिक परिणाम, आधुनिक बदल आणि भविष्यातील स्थिती यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

पश्चिम महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यतींचा इतिहास समजून घेणे.

बैलगाडा शर्यतीचे ग्रामीण समाजातील सांस्कृतिक महत्त्व अभ्यासणे.

शर्यतीमुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे.

आधुनिक काळातील बदल व कायदेशीर बाबींचा अभ्यास करणे.

बैलगाडा संस्कृतीच्या संवर्धनासाठी उपाय सुचवणे.

## बैलगाडा शर्यतीचा इतिहास

महाराष्ट्रात प्राचीन काळापासून बैलांचा उपयोग शेतीसाठी केला जातो. शेतकरी आपल्या बैलांवर कुटुंबातील सदस्यांप्रमाणे प्रेम करतात. पूर्वी पावसाळ्यानंतर किंवा यात्रांच्या काळात गावांमध्ये मनोरंजनासाठी बैलगाडा शर्यती आयोजित केल्या जात असत.

पश्चिम महाराष्ट्रातील अनेक यात्रांमध्ये बैलगाडा शर्यत हा मुख्य आकर्षणाचा भाग असतो. विशेषतः ग्रामीण भागात यात्रेच्या दिवशी हजारो लोक या शर्यती पाहण्यासाठी एकत्र येतात. या शर्यतींना ''घाट'' असेही म्हटले जाते. सातारा जिल्ह्यातील औंध, पुसेगाव, खटाव, माण तसेच सांगली आणि कोल्हापूर परिसरातील शर्यती प्रसिद्ध आहेत. पूर्वी बैलगाडा शर्यती केवळ मनोरंजनासाठी होत असत; मात्र कालांतराने त्याला स्पर्धात्मक स्वरूप प्राप्त झाले. उत्तम बैल पाळणे, त्यांना प्रशिक्षण देणे आणि शर्यतीत जिंकणे ही ग्रामीण प्रतिष्ठेची बाब बनली.

## बैलगाडा शर्यतीची रचना

बैलगाडा शर्यतीसाठी विशेष प्रकारचे घाट तयार केले जातात.घाट साधारणपणे मातीचे किंवा डांबरी रस्त्यावर असतात. बैलगाडीत दोन बैल जुंपले जातात आणि गाडीवान त्यांना नियंत्रित करतो.

शर्यतीत वेळेचे विशेष महत्त्व असते. कमी वेळात घाट पार करणाऱ्या बैलगाडीला विजेता घोषित केले जाते. शर्यतीमध्ये वेग, बैलांची ताकद, समन्वय आणि गाडीवानाचे कौशल्य महत्त्वाचे असते.

बैलांच्या जातींमध्ये खिलार, लाल कंधारी आणि डांगी या जातीप्रसिद्ध आहेत. खिलार जातीचे बैल वेगवान आणि मजबूत असल्याने शर्यतीत त्यांना अधिक पसंती दिली जाते. ग्रामीण संस्कृतीतील महत्त्व

बैलगाडा शर्यत ही पश्चिम महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा अविभाज्य भाग आहे. गावातील लोक या शर्यतीला उत्सवाप्रमाणे साजरा करतात. यात्रांच्या काळात गावात जत्रेचे वातावरण निर्माण होते.

## सामाजिक ऐक्य

शर्यतीमुळे गावातील लोक एकत्र येतात. विविध जाती–धर्मातील लोक एकाच उत्सवात सहभागी होतात. त्यामुळे सामाजिक ऐक्य वाढते.

## परंपरेचे जतन

ही शर्यत महाराष्ट्राच्या ग्रामीण परंपरेचे प्रतीक आहे. अनेक कुटुंबे पिढ्यानपिढ्या बैल पाळण्याची परंपरा जपतात.

## शेतकऱ्यांचा अभिमान

शेतकरी आपल्या बैलांना मुलांप्रमाणे जपतात. उत्तम बैल असणे ही प्रतिष्ठेची बाब मानली जाते.

## लोककला आणि मनोरंजन

शर्यतीच्या वेळी ढोल–ताशे, लेझीम, लोकगीते आणि पारंपरिक वेशभूषा यांमुळे ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडते.

## आर्थिक परिणाम

**पशुपालन व्यवसायाला चालना :** शर्यतीसाठी विशेष बैल पाळले जातात. त्यामुळे पशुखाद्य, औषधे आणि प्रशिक्षण यांचा व्यवसाय वाढतो.

**स्थानिक रोजगार** शर्यतीदरम्यान खाद्यपदार्थ, सजावटी साहित्य, वाहतूक आणि इतर व्यवसायांमधून रोजगार उपलब्ध होतो.

**पर्यटन विकास** मोठ्या शर्यती पाहण्यासाठी अनेक लोक बाहेरून येतात. त्यामुळे स्थानिक पर्यटनाला चालना मिळते.

**बाजारपेठेची वाढ** यात्रा आणि शर्यतींमुळे ग्रामीण बाजारपेठांमध्ये व्यापार वाढतो.

## बैलांचे संगोपन आणि प्रशिक्षण

शर्यतीसाठी बैलांचे विशेष संगोपन केले जाते. त्यांना पौष्टिक आहार दिला जातो. हिरवा चारा, मक्याचे दाणे, हरभरा आणि गूळ यांचा समावेश आहारात असतो.

बैलांना नियमित व्यायाम दिला जातो. सकाळ–संध्याकाळ धावण्याचा सराव करून घेतला जातो. बैलांची स्वच्छता आणि आरोग्याची विशेष काळजी घेतली जाते.काही शेतकरी बैलांच्या देखभालीवर लाखो रुपये खर्च करतात. उत्तम बैलांची किंमतही मोठ्या प्रमाणात असते.कायदेशीर आणि सामाजिक प्रश्न

काही काळ बैलगाडा शर्यतींवर बंदी घालण्यात आली होती. प्राणीमित्र संघटनांनी प्राण्यांवरील अत्याचाराचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यांच्या मते शर्यतींमध्ये बैलांना त्रास दिला जातो.यानंतर शासनाने काही नियम व अटी घालून शर्यतींना परवानगी दिली. बैलांना इजा होणार नाही याची काळजी घेणे बंधनकारक करण्यात आले.

## प्रमुख नियम

बैलांना मारहाण करता येणार नाही.

वैद्यकीय तपासणी आवश्यक आहे.

सुरक्षित घाट व्यवस्था असावी.

आयोजकांनी शासनाची परवानगी घेणे आवश्यक

## आधुनिक काळातील बदल

पारंपरिक स्वरूपातील शर्यती आज अधिक संघटित पद्धतीने घेतल्या जातात. डिजिटल माध्यमांमुळे बैलगाडा शर्यतींची लोकप्रियता वाढली आहे. आज अनेक शर्यतींचे थेट प्रक्षेपण सोशल मीडियावर केले जाते. काही ठिकाणी मोठी बक्षिसे दिली जातात. आधुनिक तंत्रज्ञानामुळे बैलांच्या आरोग्य तपासणीसाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. तरुण पिढीमध्येही बैलगाडा संस्कृतीबद्दल आकर्षण निर्माण होत आहे. अनेक युवक पारंपरिक संस्कृती जपण्यासाठी शर्यतींमध्ये सहभागी होतात.

## बैलगाडा शर्यतीसमोरील आव्हाने

**शहरीकरण** ग्रामीण भागातील शहरीकरणामुळे शेती आणि पशुपालन कमी होत आहे.

**खर्चात वाढ** बैलांचे संगोपन आणि प्रशिक्षण यासाठी मोठा खर्च येतो.

**कायदेशीर अडचणी** नियमांचे पालन न झाल्यास शर्यतींवर निर्बंध येऊ शकतात.

**तरुण पिढीचा बदलता दृष्टिकोन** काही युवक आधुनिक व्यवसायांकडे वळत असल्याने पारंपरिक संस्कृतीपासून दूर जात आहेत.

## संवर्धनासाठी उपाय

शासनाने बैलगाडा शर्यतींसाठी स्वतंत्र धोरण तयार करावे.

बैलांच्या आरोग्यासाठी पशुवैद्यकीय सुविधा उपलब्ध कराव्यात.

ग्रामीण पर्यटनाशी बैलगाडा शर्यती जोडाव्यात.

युवकांना पारंपरिक संस्कृतीचे महत्त्व पटवून द्यावे.

शर्यती सुरक्षित आणि नियमबद्ध पद्धतीने आयोजित कराव्यात.

पश्चिम महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यत ही केवळ क्रीडा नसून ग्रामीण संस्कृती, परंपरा आणि शेतकरी जीवनाचे प्रतिक आहे. या शर्यतींमुळे सामाजिक ऐक्य, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक वारसा टिकून राहतो. आधुनिक काळात अनेक आव्हाने निर्माण झाली असली तरी योग्य नियम आणि संवर्धनाच्या माध्यमातून ही परंपरा जपली जाऊ शकते. बैलगाडा शर्यतींमध्ये महाराष्ट्राच्या मातीतला उत्साह, शेतकऱ्यांचा अभिमान आणि ग्रामीण जीवनातील सांस्कृतिक समृद्धी दिसून येते. त्यामुळे या परंपरेचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**प्रतिक राजेंद्र जगताप**
बी.ए.भाग–३

# नेर ता. खटाव येथील काशी विश्वेश्वर मंदिरातील शिलालेखांचा चिकित्सक अभ्यास

**(संशोधनपर लेख)**

पुरातत्वीय पुराव्याच्या मध्ये सर्वात विश्वसनीय व समकालीन तसेच अस्सल पुरावा म्हणजे शिलालेख होय, त्या मुळेच शिलालेख हे इतिहासाचे प्रमुख अंग आहेत. शिलालेखांमुळे आपणास तत्कालीन घटनांची माहिती मिळते. शिलालेखांतून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, भौगोलिक, राजकीय, आर्थिक, माहिती मिळते. प्रस्तुत शिलालेख हा सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक माहिती देणारा आहे.

'नेर' हे गाव महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात खटाव तालुक्यात वसलेले आहे. हे गाव ऐतिहासिक आणि धार्मिक कार्यासाठी ओळखले जाते. येथील मुख्य वैशिष्ट्य म्हणजे गावातील काशी विश्वेश्वर मंदिर, काही जुने शिलालेख आणि वीरगळ, ज्यामुळे गावाचा ऐतिहासिक वारसा अधोरेखित होतो. नेर गावात सापडलेले शिलालेख व वीरगळ (नायकांच्या स्मृतीत उभारलेले दगडी स्तंभ) हे इतिहासप्रेमींसाठी महत्त्वाचे ठिकाण आहेत.शिलालेखांचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टीने मोठे महत्त्व आहे.

प्रस्तुत शिलालेख नेर, ता. खटाव, जि. सातारा येथील कशी विश्वेश्वर मंदिरातील मुख्य सभामंडपातील उजव्या बाजूच्या पहिल्या खांबावर मध्यभागी आहे व डाव्या बाजूच्या पहिल्या खांबावर मध्यभागी आहेत.

जी.पी.एस.: १७. ७२४६०३७४.२९७९ २६

मिती / वर्ष : काळ वर्ष १६ वे शतक अक्षर वळणावरून

उजव्या बाजूच्या खंबावरील शिलालेख

**वर्णन** शिलालेख स्तंभावर (ज्वाला–मुखीजन्य बेसॉल्ट दगड किंवा ग्रॅनाइट) शिळेवर कोरलेला आहे. याची लांबी ६८ इंच व रूंदी ४४ इंच एवढी आहे. अक्षराची जाडी आणि उंची एकसारखी नाही. शिलालेखात एकण १० ओळी आहेत. शिलालेखातील भाषा संस्कृत आणि मराठी आहे तर लिपी देवनागरी आहे. परंतू काही अक्षरे मोडी लिपीत आहेत. शिलालेख पद्यात लिहिला आहे. शिलालेखातील अक्षरांवर सलग रेषा मारलेल्या आहेत. शिलालेखातील काही अक्षरे अस्पष्ट झाल्यामुळे मर्यादित स्वरूपाचाच अर्थ लावता येतो. तिथे तर्काच्या आधारे शब्दार्थ समजून वाचावे लागतात. शिलालेखावर कोणत्याही काळाचा उल्लेख नाही.

## शिलालेखाचे वाचन

ओळ १– ।। स्त्री गणेसायनमा सरौत ।।
ओळ २– उदीक स्थान ब्रम्हासी हवांस्ते
ओळ ३– मुंड नदी नाम वीस्वनाथ
ओळ ४– स्छनक पुर्वे कात्ळीका पस्य
ओळ ५– मे वीनायक। उत्तरै रघुनाथ
ओळ ६– दक्षण रेणुका । भारद्वाज गो
ओळ ७– त्र्येक पुरुसी अघ्रार सहीत अ
ओळ ८– स्टाधीकार पूजे दतवसि
ओळ ९– पारपार कासीबा हरी हीरोजी
ओळ १०– मानिकराव चौवाण।

## शिलालेखाचा अर्थ

श्री गणेशाला नमस्कार. हे स्थान ब्रह्मासाठी पवित्र स्वरुपात अर्पण केले आहे. येथील मुख्य देवतेचे नाव विश्वनाथ. त्याच्या पूर्वेला श्री कालिकादेवीचे स्थान, पश्चिमेला श्री गणेश स्थान, उत्तरेला श्री रघुनाथाचे (श्रीरामाचे) स्थान आणि दक्षिणेस श्री रेणुकादेवी (भगवान परशुरामाची) चे स्थान आहे. अशा प्रकारचे हे देवालय (शिवपंचायतन) भारद्वाज गोत्र

असलेल्या एका पुरुषाने देवान उत्पन्नासह वंशपरंपरागत अग्रहार बहुधा काशीबा हरि व हिरोजी यांना दिले आणि ही गोष्ट तेथील मानिकाराव चव्हाण यांना मान्य झाली.

डाव्या बाजूच्या खंबावरील शिलालेख

शिलालेख स्तंभावर (ज्वालामुखीजन्य बेसॉल्ट दगड किंवा ग्रॅनाइट) शिळेवर कोरलेला आहे. अक्षराची जाडी आणि उंची एकसारखी नाही. शिलालेखात एकण ६ ओळी आहेत. शिलालेखातील भाषा संस्कृत आणि मराठी आहे तर लिपी देवनागरी आहे. परंतू काही अक्षरे मोडी लिपीत आहेत. शिलालेख पद्यात लिहिला आहे. शिलालेखातील अक्षरांवर सलग रेषा मारलेल्या आहेत. शिलालेखातील काही अक्षरे अस्पष्ट झाल्यामुळे मर्यादित स्वरूपाचाच अर्थ लावता येतो. शिलालेखावर कोणत्याही काळाचा उल्लेख नाही.

## शिलालेखाचे वाचन

१. श्रीगणेसायेनमाः स्रीदोहरीत (?) आदिजे

२. हरी भारद्वाज गोत्री अथर्ववेद पाड

३.ळा देसासा नेर ईसापुर पुसेग्राम जो

४. तिष कुळकरण अस्टाधीकारी सूक

५. पुरुसी अमावसी जपार्तपार मंत्र सर

६. महत मांहासांती ब्रम्हा आताहा

## शिलालेखाचा अर्थ

भारद्वाज गोत्री ब्राह्मण हरि, पाडळीचा रहिवासी असून नेर, विसापूर, पुसेगाव इ. गावांचे अष्टाधिकार तसेच ज्योतिष, कुळकर्ण आणि सुंक (शुल्क) गोळा करण्याचे अधिकार असणाऱ्या या पुरुषाने अमावस्येस जपतप आदि करवून घेऊन महाशांती केली.

## निष्कर्ष

हे मंदिर हेमाडपंथी स्थापत्या चे उदाहरण आहे. त्यामुळे हे मंदिर यादव काळात इ.स. १२ व्या ते १३ व्या शतकातील असावे. शिलालेखातील काही अक्षरे अस्पष्ट झाली आहेत. हा शिलालेख नेर या गावातील धार्मिक व समाजिक स्थिती दर्शविणारा आहे. शिलालेख नेर गावातील बहुधा तेथील वंशपरंपरागत अग्रहाराच्या निवाड्याशी संबंधित (अग्रहार –विद्वान ब्राह्मणाला दिलेले दान) च्या संदर्भात आहे. या मध्ये गणपती, ब्रह्मा, शिव, कालिका, रेणुका आणि श्री राम या देवतांचा उल्लेख आलेला आहे. या शिलालेखात पुढील व्यक्तीनामे येतात– काशीबा हरी, हिरोजी, माणिकाराव चव्हाण, पिंगळे

हा पुरुष भारद्वाज गोत्रातील ब्राह्मण होता आणि पाडळीचा रहिवासी म्हणून त्याचा परिसरातील धार्मिक, प्रशासकीय आणि आर्थिक व्यवहारांवर प्रभाव होता. नेर, विसापूर, पुसेगाव यांसारख्या गावांवर त्याला अष्टाधिकार, ज्योतिष, कुळकर्णी आणि सुंक गोळा करण्याचे हक्क मिळाले होते. यावरून तो त्या काळातील स्थानिक व्यवस्थेत मान्यताप्राप्त अधिकारी होता. अमावस्येला त्याने जप, तप आणि महाशांती करून घेतल्याचा उल्लेख त्याच्या धार्मिक कर्तव्यनिष्ठेचा पुरावा देतो. एकूणच त्याचे व्यक्तित्व धार्मिक, प्रशासकीय आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या प्रभावी व्यक्तीचे होते.

## संदर्भ

१. भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिक, वर्ष १०, अंक ३ रा, पृष्ठ १३३–३४.

२. शिलालेखाच्या विश्वात: महेश तेंडूलकर, शिलालेखाचे वाचक: डॉ. ग. ह. खरे, पृष्ठ–४३७–३८

३. दुसरा शिलालेख श्री. अनिल किसन दुधाणे, अथर्व पिंगळे

❑ ❑ ❑ ❑ ❑

**तेजस श्रीकांत घाडगे**
बी.ए.भाग–३

# इतिहासाचे पुनर्लेखन : एक वैचारिक आणि सामाजिक आव्हान

**(संशोधनपर लेख)**

इतिहास हा केवळ भूतकाळातील घटनांचा निर्जीव संग्रह नसून तो एक सतत चालणारा संवाद आहे. प्रत्येक युग, प्रत्येक समाज आणि प्रत्येक विचारधारा त्याच्या भुतकालाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन घेऊन येते. याच संदर्भात इतिहासाचे पुनर्लेखन ही संकल्पना निर्माण झाली. ही केवळ नवीन तथ्ये शोधण्याची प्रक्रिया नसून, तर विद्यमान ऐतिहासिक कथनांची पुनर्व्याख्या, पूनर्मूल्यांकन आणि कधीकधी पूर्णपणे बदलण्याची एक गतिमान प्रक्रिया आहे.

## पुनर्लेखनाची गरज का ?

इतिहासाचे पुनर्लेखन हे अनेक कारणांमुळे अपरिहार्य ठरते:

**नवीन पुरावे आणि संशोधन** पुरातत्व, आर्काइव्हस, नवीन दस्तऐवज इत्यादींमधून सतत नवीन माहिती उपलब्ध होत राहते. त्यामुळे जुनी माहिती किंवा समजूत चुकीची ठरु शकते किंवा त्यात नवीन परिमाणे येतात. उदा., हडप्पा लिपीचा शोध किंवा नवीन शिलालेख सापडल्यास तत्कालीन समाजाच्या समजुती बदलू शकतात.

## दृष्टिकोनातील बदल

प्रत्येक इतिहासकार एका विशिष्ट सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक संदर्भात लिहितो. औपनिवेशिक इतिहाकारांनी लिहिलेला भारतीय इतिहास आणि स्वातंत्र्योत्तर भारतीय इतिहाकारांचा दृष्टिकोन यात मोठा फरक दिसून येतो. पूर्वी बर्बर आक्रमण म्हणून वर्णन केलेली घटना आता सांस्कृतिक संघर्ष आणि समन्वय या दृष्टिकोनातून पाहिली जाऊ शकते.

## वंचितांचा आवाज उठवणे

पारंपरिक इतिहास लेखनात राजे, महाराजे, सेनापती यांच्यापुरते मर्यादित होते. पुनर्लेखनाद्वारे सामान्य जनता, स्त्रिया, दलित, आदिवासी यांच्या अनुभवांना, योगदानाला आणि संघर्षाला स्थान मिळू शकते. यालाच खालच्या दिशेने इतिहास (History from Below) असे म्हणतात.

## वर्तमानाचे आव्हान आणि गरजा

प्रत्येक वर्तमानकाळ त्याच्या भूतकाळाशी नवीन प्रश्न विचारतो. आजच्या लैंगिक समतेच्या, पर्यावरणच्या किंवा राष्ट्रवादाच्या चर्चेतून भूतकाळातील घटनांचे नवे अर्थ उलगडतात.

## पुन्हा का लिहावे लागते ?

कारण नवीन माहिती सापडते. कधी शेतात खोदताना एखादा शिलालेख मिळतो, कधी जुन्या पुस्तकात वेगळी माहिती वाचायला मिळते, कधी एखाद्या पुरातत्व उत्खननात नवी वस्तू सापडते. मग आपल्याला जुने समज बदलावे लागतात. उदा. आधी वाटत होतं की एखादं गाव एवढंच जुने आहे. पण नवीन पुरावा सांगतो की ते गाव आणखी जुने आहे. मग इतिहासात बदल करावा लागतो.

## पुनर्लेखन कसे केले जाते ?

इतिहास पुन्हा लिहिताना फक्त गोष्ट बदलून चालत नाही. इतिहासकार खूप अभ्यास करतात. त्यांना नवीन आणि जुने असे सर्व पुरावे पाहावे लागतात. कोणता पुरावा खरा आहे आणि कोणता नाही हे तपासावे लागते. इतर इतिहासकारांनी काय लिहिले आहे तेही ते पाहतात. मग सगळी माहिती एकत्र करून ते नवा निष्कर्ष काढतात. अशा पद्धतीने इतिहासात आवश्यक बदल केले जातात.

**यात अडचणी काय येतात ?**

इतिहास बदलावं लागलं की, अनेक वेळा लोकांना ते पटत नाही. काही वेळा पुरावे पूर्ण मिळत नाहीत. काही गोष्टी परंपरेत असतात, पण त्यांना पुराव्यांचा आधार नसतो. नवीन माहिती लोकांनी स्वीकारायला वेळही लागतो. त्यामुळे इतिहासाचे पुनर्लेखन करताना खूप काळजी घ्यावी लागते.

**पुनर्लेखन का महत्वाचे आहे ?**

इतिहासाचे पुनर्लेखन केले तर आपल्याला अचूक माहिती मिळते. अनेकदा विसरलेली नावे, घटना किंवा तत्कालीन कार्य पुन्हा समोर येते. नवीन पिढीला भूतकाळातील घटनांची माहिती स्पष्ट मिळते. म्हणून इतिहासाचे पुनर्लेखन समाजासाठी खूप महत्त्वाचे आहे.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. सरिता नानासो शिंदे**
बी.ए.भाग–२

# ऑलवेज ऑनलाईन राहण्याचे व्यसन

**(वैचारिक लेख)**

काय सारखं फोनवर टुकटुक. शेजारी बसलेला माणूस जिवंत आहे की मेलाय हे तरी बघा. प्रत्येक गोष्ट ऑनलाईन करा, ऑनलाईन जेवायला मिळतय का बघा. असे टोमणे हल्लीच्या तरूण मुलां–मुलींना येता जाता ऐकावे लागतात. पण तरूण मुलं हे सहज मान्य करत नाहीत. उलट त्यांना असं वाटतं की, प्रत्यक्षात थेट संवाद होत नसला तरी, अवतीभोवतीच्या माणसांच काय चाललंय हे तरी ऑनलाईन कळतच ना. ऑनलाईन सगळं कळू शकते मग अजून संपर्क असा वेगळा काय असतो ?

तिथल्या तिथे ऑनलाईन कोणाला वाढदिवसाला शुभेच्छा दिल्या काय, नी कुणाला श्रद्धांजली वाहिली काय. आपला ना वेळ खर्च होतो ना फार इमोशनल गुंता होतो. असं अनेकांच मत आहे. एका सर्वेक्षणानं यावर शिक्कामोर्तब केले आहे. त्यांचं अस म्हणणं आहे की, वयाच्या पस्तीशीच्या आत असलेल्या अनेक तरूण मुलामुलींना आता प्रत्यक्षात सोशलायझिंगपेक्षा 'ऑनलाईन सोशलायझिंगच' जास्त सोयींच वाटतं. या साऱ्यांमुळे आपणच आपल्या समाजापासून दूर जातोय का? असं विचारल्यावर संमिश्र मतं येतात. ज्यांच्याशी संपर्कात राहायचं त्यांच्याशी आम्ही संपर्कात आहोत. मग बाकीचं सारंच माहिती पाहिजे असा आग्रह कशाला ? काहींना मात्र असं वाटते की, वरवरच्या या टेक्निकल संवादामुळे अनेकदा नातं कोरडं होत जातं पण तो आता नव्या काळाचा भाग झाला आहे.

**इंटरनेट ॲडिकक्शन म्हणजे काय ?** अनेकांना इंटरनेट वापरलं नाही तर प्रचंड अस्वस्थता येते. म्हणूनच मनोविकार तज्ज्ञांनी अधिकृतपणे त्याला इंटरनेट ॲडिक्शन डीस ऑर्डर म्हणजे इंटरनेट वापराचं व्यसनं असं म्हटले आहे.

**ॲडिक्शनची लक्षणे** रात्री उशीरापर्यंत जागत नेटसर्फिंग करत बसणे. समक्ष संवादाऐवजी आभासी दुनियेतच रमणे. संवाद साधणं ही त्या व्यसनाची प्राथमिक लक्षणं आहेत. आता या क्षणी मी काय करतोय हे दुनियेला दाखविणे, फोटो काढून फेसबुकवर टाकण्याची प्रचंड इर्षा वाढते आहे. या तंत्रज्ञानाचा उद्देश नाती जोडण्याचा आहे. परंतू अनेकदा विपरित घटना घडत आहेत. समईच्या ज्योतीवर पतंगाने आकर्षणाने झेप घ्यावी आणि जळून खाक व्हावे, त्याच प्रकारचे नवे तंत्रज्ञान आपणास आकर्षित करत आहे. तंत्रज्ञानाचा वापर करावा परंतू या आकर्षणाच्या गर्तेत स्वत:ला जाऊ न देण्याचा प्रत्येक वापरकर्त्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. सोशल मिडियाव्दारे सोशल होण्याचा सोर्स आपल्याला कुठपर्यंत आणि काय सोसायला भाग पाडेल याचा विचारही वेळीच व्हायला हवा.

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. समृध्दी सुभाष शिंदे**
बी.कॉम.भाग–३

# रोजगारी

पहाटेच्या धूसर प्रकाशात,
डोळ्यांत अजून स्वप्नांची रेष,
उठतो तो कामाच्या वाटेवर,
मनात मात्र काळजीची पेश ।

हातात डबा, खिशात आशा,
पावलांत थोडीशी घाई,
घरासाठी, लेकरांसाठी,
तो रोज स्वतःला विसरून जाई ।

घामाच्या थेंबांत भिजलेलं आयुष्य,
कष्टांच्या ओझ्याखाली वाकलेली पाठ,
हसत राहतो सगळ्यांसमोर,
मनात मात्र असतात हजारो आघात ।

पगाराच्या दिवसाची वाट बघत,
महिनाभर करतो तो संघर्ष,
हिशेब जुळवत जगताना,
कधी हरतो, कधी करतो विजयाचा स्पर्श ।

स्वतःच्या इच्छा ठेवून मागे,
दुसऱ्यांसाठी करतो त्याग,
त्याच्या या शांत वेदनेत,
लपलेला असतो आयुष्याचा खरा भाग ।

संध्याकाळी थकलेला चेहरा,
तरीही ओठांवर हसू,
कारण त्याच्या दुःखापेक्षा मोठं,
घरच्यांचं सुख असतं खासू ।
सा हा रोजगार करणारा माणूस,
दुःखातही शोधतो आनंद,
त्याच्या कष्टांच्या कहानीत,
दडलेला असतो जीवनाचा खरा छंद ।

**तुषार कैलास साठे**
बी.ए. भाग–३ (मराठी)

# बेरोजगारी

रिकाम्या हातांनी स्वप्नं मोठी,
डोळ्यांत मात्र आशा दाटी,
दरवाज्यावर ठोका देतो,
नोकरीची वाट पाहतो ।

रोज सकाळी नवी उमेद,
रेझ्युमे घेऊन करतो धावपळ,
''आम्ही कळवू'' हेच उत्तर,
मनात मात्र वाढते खळबळ ।

आईच्या डोळ्यांत प्रश्न उभा,
बापाच्या कपाळी चिंता रेषा,
स्वप्नांच्या ओझ्याखाली दडलेला,
युवक शोधतो स्वतःचा देशा ।

मित्र सारे पुढे गेले,
कोणी नोकरी, कोणी व्यवसाय,
तो मात्र वाटेवर थांबलेला,
पण हार मानणं नाही त्याचा स्वभाव खास ।

अपयशाच्या धक्क्यांनी,
मन कधी कधी खचून जाते,
पण जिद्दीचा दिवा पेटवून,
तो पुन्हा नव्याने उभा राहतो ।

संघर्ष हा त्याचा साथी,
आशा त्याची खरी ताकद,
एक दिवस येईल नक्की,
यश देईल त्याला नवी ओळख ।

बेरोजगारीची काळी रात्र,
जरी लांब वाटत असे,
उद्याचा सूर्य उगवणारच,
युवक नव्या मार्गावर चालत असे ।

**कु. हर्षदा रामचंद्र रेणुसे**
बी. ए. भाग–२

# भ्रष्टाचार

भारताच्या मातीत स्वप्नांची बीजं रुजली,
पण भ्रष्टाचाराच्या वादळाने ती उध्वस्त झाली....
रस्ते झाले खड्डयांचे घर, योजना कागदात अडकल्या,
नेत्यांच्या भाषणांत आश्वासनं, पण जनतेच्या आशा मावळल्या...

गरीबाच्या ताटात भाकरी नाही,
आणि वरती सत्ता पैशातच राही...
न्याय मिळवायला वर्षे सरतात,
सत्य मात्र कागदातच हरवतात....

शेतकरी रडतो पावसासाठी,
कामगार झिजतो रोजीरोटीसाठी,
पण कुठेतरी फाईल हलवायला,
लाच हातातच द्यावी लागते....

शाळा, रुग्णालये अपुरीच राहिली,
कारण निधी कुठेतरी वळतात
जनतेच्या नावावर योजना बनतात,
पण खिशात काहींच्याच जातात...

असा हा देश, वेदनेत जगतो,
सत्याचा आवाज मात्र दाबला जातो....
पण आशा अजूनही जिवंत आहे,
जनतेचा आवाजच बदल घडवणार आहे....

**कु. ऋतुजा दत्तात्रय सावंत**
बी.ए. भाग-३ (मराठी)

# सरी पावसांच्या

पावसाच्या सरींनी नभाला स्पर्श केला,
वादळाच्या झंझावाताने मनाला हलवून टाकलं ।

धडधडत्या ढगांतून विजांचा खेळ सुरू झाला,
गर्जनांच्या तालावर निसर्गच जणू नाचू लागला ।

पावसाच्या थेंबांनी धरतीला आलिंगन दिलं,
ओल्या मातीच्या सुगंधाने सगळं जग भरून गेलं ।

वादळाने झाडांची परीक्षा घेतली कठीण,
पण त्यांच्या मुळांनी दाखवली ताकद अफाट महान ।

एकीकडे कोमल पाऊस, दुसरीकडे रौद्र वादळ,
निसर्गाच्या या दोन रूपांत दडलेलं गुढ सुंदर ।

शेवटी शांतता पसरली, नभ निरभ्र झाले,
वादळ-पावसाच्या खेळानंतर जग नव्याने फुलले ।

**कु. सानिया मंगेश खवळे**
बी. ए. भाग-२

# संत विचार

ज्ञानदीप तेवत राहिला, संतांच्या ओव्यातून
ज्ञानेश्वर म्हणती प्रेमाचा मार्ग, भक्तीच्या भावातून

नामवाणी ओठी ठेवुनी, अंतरी शुध्द विचार
तुकाराम सांगती सकळांना, समतेचा तो आधार

कर्म करावे नि:स्वार्थ, दया ठेवावी मनी
एकनाथ सांगतात जनांना, सेवा करा सर्वांशी

वर्ण-जात भेद नाही, माणुसकीचा धर्म खरा
नामदेव म्हणती विठ्ठल सर्वत्र, अंतरीच देव स्मरा

साधी वाणी, उंच विचार, हेच संतांचे ध्येय
अंधारात प्रकाश देणे, हेच त्यांचे कार्य होय

संत विचारांचा झरा, अखंड वाहत राहो
मानवतेच्या मार्गाने, प्रत्येक जीव चालत राहो

**कु. प्रणाली प्रमोद सुतार**
बी. ए. भाग-२

# संसार

संसाराच्या वाटेवर चालताना,
तूच झालीस माझी सावली,
उन्हात-वादळात उभी राहून,
दिलीस साथ तू अविरत खरी ।

हास्यात तू, अश्रूंमध्येही तू,
माझ्या प्रत्येक श्वासात तू,
जगण्याच्या या कठीण वाटेवर,
माझी शक्ती, माझं बख तू ।

कधी आईसारखी जपणारी,
कधी मैत्रीण बनून हसणारी,
पत्नी म्हणून खंबीर उभी,
माझं विश्व तू सजवणारी ।

स्वप्नांना पंख देणारी तू,
आशांना अर्थ देणारी तू,
माझ्या प्रत्येक यशामागे,
नि:शब्द उभी असणारी तू ।

संसार हा केवळ नातं नाही,
तो विश्वासाचा धागा आहे,
आणि त्या धाग्याला मजबूत ठेवणारी,
माझी खरी, माझी पत्नी तूच आहे ।

**शिवाजी सुनिल बिरलिंगे**
बी.ए. भाग-१

# शिक्षक

ओल्या मातीला देतो संस्काराचा आकार
तोच खरा शिक्षक साकार.....
विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास हिच माझी साधना,
घडवेन त्यांना बलवान, हीच सरस्वतीकडे आराधना
उघडतो ज्ञानाची कवाडे, देऊनी अनुभवाचे धडे,
देती विद्यार्थी कृतीला वाव,
ई-लर्निंगचा अध्यापणात वापर करती राव....
देती पंखांना बळकटी, घडवून आणती परिसर भेटी,
करा निसर्गावर प्रेम, हिच खरी आपली आण
जागवी वैज्ञानिक दृष्टी, देई क्रिडा, कलागुणांना पुष्टी,
जपावा भारतीय संस्कृतीचा वारसा,
उत्तम नागरिक बनुन उमटवेल तो वेगळा ठसा

**कु. प्राजक्ता जालिंदर पवार**
बी. कॉम. भाग-१

# पाहिले मी देवा तुला

देवा पाहिले मी तुला वेगवेगळ्या रुपात,
तुझीच ही प्रतिमूर्ती आहे वेगळ्या मापात,

आई-वडिलांची रुपं ही तुझीच रे देवा,
मुलांना घडवण्यासाठी करती रात्रंदिवस कष्ट सेवा,

अपेक्षा फक्त त्यांची मुलांनी घडावे,
वार्धक्यात त्यांना आहाराचे दान पडावे,

संकटसमयी जेव्हा अडखळतो मार्ग
दाही दिशा अंधार शोधु कसे मी मर्म,

सुचत नाही काही चालू कसा रस्ता
मानव रुपात पाठी तू उभा राहसी मुकुंदा

आहे तुझा मी बाप करु नको चिंता
सरळ मार्ग चाल तू नाम मुखी सदा कांता

स्वार्थाने भरलेल्या दुनियेत विश्वास उघडतो जेव्हा
धीर सोडु नको तू, तुझ्या पाठीशी आहे मी,
विविध रुपात मार्ग दाखवी तु तेव्हा

**कु. सिध्दी रामदास फडतरे**
बी.ए. भाग-१

# वसुंधरा

अन्न वस्त्र निवारा, तुझ्यामुळेच जलधारा
जीवनावश्यक वारा, देतेस ही वसुंधरा
तुझ्यामुळेच हे जीवन, तुझ्यामुळेच हे कवण
जे जे काही असे पावन, तुझ्यातच हे वसुंधरा

असो जन्म माझा वा, असो मृत्यू माझा
तुझ्याविना असंभव, नमो नम: वसुंधरा
वसुंधरा हिरवी झाली, वरुण आला
पाऊस पडला, चार चार ओल थेंबांनी
मातीचा श्वास, मोकळा झाला

झाडं हसली, फुलं डोलली निसर्ग गाणं गात राहिला
पावसात भिजली धरती जीव पुन्हा बहरुन आला

वसुंधरेच्या कुशीत हिरवी स्वप्नं दाटली,
वरुण आला, अन तहानलेली माती हसली
चार ओल्या थेंबांनी सकाळ न्हाली
आशेची नवी पालवी पुन्हा फुटून आली

वसुंधरेच्या मुक उरात, वरुणाचे शब्द उतरले
मेघांच्या सावल्यांतून, अर्थ नवे फुलले...

चार चार ओल थेंबांनी, वेळेचे कपाळ लिहिले
थांबलेल्या स्वप्नांना, पुन्हा चालायला शिकविले

मातीच्या आठवणींना पावसाने आवाज दिला
कोरड्या श्वासांमध्ये जीवनाचा मंत्र भरला

वसुंधरा स्थिर उभी, वरुण वाहता भाव,
या दोन टोकांत अडकून मानव शोधतो अर्थाचा ठाव
वसुंधरा म्हणजे केवळ जमीन नाही
ती सहनशिलतेची अखंड कथा आहे

पायाखाली तुडवली जाते तरीही
तीच अन्न, सावली श्वास देते आहे

जखमा पोटात दडवूनही, ती हिरवळ पसरवत राहते
मानवाच्या लोभाला उत्तर, ती शांत ऋतूनींच देते

वरुण येतो, जातो, ऋतु बदलतात, काळ फिरतो
वसुंधरा मात्र स्थिर उभी सर्वांचे ओझे वाहत राहतो

तिच्या कुशीत जन्म घेतो मानव
आणि विसरतो तिचे उपकार,
तरीही वसुंधरा आईसारखी
क्षमेनं पुसते सारे आघात- वार

वसुंधरा बोलत नाही, आपण तिला दुर्बल समजतो;
खरं तर ती शांततेतूनच
आपल्या अस्तित्वाला आधार देते

तिच्या छातीत खोल रुजलेली
झाडांची मुळे म्हणजे इतिहास
आपण क्षणासाठी जगतो, ती युगांसाठी श्वास देते

रक्तासारख्या वाहणाऱ्या नद्या,
तिच्या नसानसात फिरतात
डोंगर तिचे स्थिर विचार
वादळंही जिथं थकून थांबतात

आपण ओरखडे देतो रोज,
ती मात्र पीक देत राहते
माणसाच्या कृतज्ञतेची वाट
वसुंधरा अजूनही पाहते.

**कु. प्राजक्ता जालिंदर पवार**
बी.कॉम. भाग-१

# हिंदी विभाग

"समय सबसे बड़ा शिक्षक है।" -
हर अनुभव कुछ सिखाता है। "बड़ा सोचो, बड़ा करो।" -
सफलता विचार से शुरू होता है। "गलतियाँ वही करते हैं
जो कुछ करने की कोशिश करते हैं।" -
असफलता भी सीखें। "दूसरों के लिए वही करो
जो तुम चाहते हो।" - यही सच्चा मानवतावादी है।

**- ए.पी.जे.अब्दुल कलाम**

**विभागीय संपादक**

***प्रा.डॉ.भोसले आर.पी.***

***प्रा. श्रीमती आर. के. मुल्ला***

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| अ.क्र. | लेख का नाम | विद्यार्थी का नाम | कक्षा |
|---|---|---|---|
| 1. | विवेक से जीवन बनता है | कु. अमृता प्रकाश बागल | एम.ए. भाग – 1 |
| 2. | मोहनदास – उदय प्रकाश | कु. सानिका राजेंद्र जाधव | बी.ए. भाग – 3 |
| 3. | भारतीय राजनीति | कु. अनुष्का सुनील गोसावी | बी.ए. भाग – 1 |
| 4. | आज की युवा पीढी | कु. परिणिता संतोष चुनाडे | बी.कॉम.भाग – 1 |
| 5. | मेरी यात्रा | कु. समिक्षा जितेंद्र मचिंदर | बी.ए. भाग – 1 |
| 6. | कृत्रिम बुध्दिमत्ता | कु. ज्ञानेश्वरी प्रशांत बोराटे | बी.कॉम.भाग – 1 |
| 7. | डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम | कु.मयुरी ब्रह्मदेव कोपनर | बी.ए. भाग – 3 |
| 8. | भगत की गत | कु. अमृता प्रकाश बागल | एम.ए. भाग – 1 |
| 9. | व्यंगकार : शंकर पुणतांबेकर | कु. अनुष्का सुनील गोसावी | बी.ए. भाग – 1 |


## पद्य विभाग


| अ.क्र. | कविता का नाव | विद्यार्थी का नाम | कक्षा |
|---|---|---|---|
| 1. | संघर्ष | कु.अमृता प्रकाश बागल | एम.ए.भाग – 1 |
| 2. | भारतमाता | कु. सानिका राजेंद्र जाधव | बी.ए. भाग – 3 |
| 3. | फुल | कु. मयुरी ब्रम्हदेव कोपनर | बी.ए. भाग – 3 |
| 4. | चिडिया रानी | शिवानंद जाधव | बी.ए. भाग – 3 |
| 5. | रहीम के दोहे | कु. मयुरी ब्रम्हदेव कोपनर | बी.ए. भाग – 3 |
| 6. | सूरदास के पद | कु. सानिका राजेंद्र जाधव | बी.ए. भाग – 3 |

# विवेक से जीवन बनता है

**(वैचारिक लेख)**

विचारों का प्रभाव हमारे जीवन के कई पहलुओं पर गहरा होता है, जिसमें शामिल है मानसिक स्वास्थ्य नकारात्मक विचार चिंता, अवसाद और तनाव जैसी मानसिक स्वास्थ्य समस्याओं को जन्म दे सकते है। दूसरी ओर सकारात्मक विचार खुशी आशावाद और लचीलेपन को बढावा दे सकते है शारीरिक स्वास्थ्य विचार हमारे शारीरिक स्वास्थ्य को भी प्रभावित कर सकते है। उदाहरण के लिए तनाव से रक्तचाप और हृदय गति बढ सकती है।जिससे हृदयरोग और सकारात्मक समस्याएँ हो सकती है। दूसरी ओर सकारात्मक विचार प्रतिक्षा प्रणाली को मजबूत कर सकते है। और दर्द को कम कर सकते है। हमारे विचार व्यवहार को भी प्रभावित करते है। यदि हम मानते है कि हम किसी कार्य को सफलतापूर्वक पूरा कर सकते है, तो हम से करने की अधिक संभावना रखते है। दूसरी ओर, यदि हम मानते है कि हम असफल हो जाएंगे तो हम कोशिश करने की संभावना कम रखते है। हमारे विचार रिश्तों को भी प्रभावित करते है। यदि हम दूसरों के बारे में नकारात्मक विचार रखते है, तो उनके साथ हमारे नकारात्मक संबंध होने की संभावना है। दूसरी ओर यदि हम दूसरों के बारे में सकारात्मक विचार रखते है तो उनके साथ हमारे सकारात्मक संबंध होने की संभावना है। लक्ष्य प्राप्त हमारे विचार लक्ष्यों को प्राप्त करने की क्षमता को भी प्रभावित करते है। यदि हम मानते है कि हम अपने लक्ष्यों को प्राप्त कर सकते है, तो हम उन्हें प्राप्त करने तथा लक्ष्यों को प्राप्त कर सकते है, तो हम उन्हें प्राप्त करने की अधिक संभावना रखते है।

दूसरी ओर मानते हैं कि हम अपने लक्ष्यों को प्राप्त करनें मे असमर्थ है, तो हम हार मानने की अधिक संभावना रखते है। यह ध्यान रखना महत्त्वपूर्ण है कि हमारे विचार हमेशा नियंत्रण मे नही होते है। हालाकिं, हम अपने विचार को चुनने और उन्हें अधिक सकारात्मक बनाने के लिए काम कर सकते है। ऐसे करने से, हम अपने जीवन के कई पहलुओं में सुधार कर सकते है।

कवि अज्ञेय जी ने विदित किया है ''दुःख सबको माजता है यह पूर्णतः सत्य है। जब दुःख गहराने लगता है, तो हम एक चिंतक की भांति यह सोचने लगते है कि जीवन क्या है? जीवन का उद्देश्य क्या है? हम इस संसार में क्या करने आये है? इस तरह के अनेक विचार हमारे मन और हृदय में उमडने-घुमडने लगते है। मनुष्य के जीवन की दिशा और दशा उसके विचारों से निर्धारित होती है। विचार ही वह मूल तत्त्व है।''

जो किसी व्यक्ति को महानता की ओर ले जाते है या पतन के गर्त में धकेल देते है, इतिहास इस बात का साक्षी है कि जिन्होंने उच्च विचारों को अपनाया, वे समाज के लिए प्रेरणा बने, जबकि संकीर्ण या नकारात्मक विचारों ने व्यक्ति और समाज को विनाश की ओर धकेला। इस प्रकार विचार ही जीवन का आधार है, क्योंकि वे हमारे कर्मों को दिशा प्रदान करते है और हमारे व्यक्तित्व का निर्माण करते हैं। विचारों की शक्ति अद्भूत होती है। वे न केवल मनुष्य के आचरण और व्यक्तित्व को गढते है, बल्कि समाज ओर सभ्यता की प्रगति में भी महत्त्वपूर्ण भूमिका निभाते है।

महात्मा गांधी का अहिंसा का विचार पूरे स्वतंत्रता संग्राम में प्रेरणा स्त्रोत बना और भारत को अंग्रेजी हुकूमत से मुक्ति दिलाने का मार्ग प्रशस्त किया। दूसरी ओर हिटलर के विध्वंसकारी विचारों ने विश्व को द्वितीय विश्व युध्द की भयावहता में झोक दिया। इससे स्पष्ट होता है कि सकारात्मक और नकारात्मक विचार का प्रभाव कितना व्यापक हो सकता है।

इतिहास को खंगाले तो हमें हर कालखंड में ऐसे व्यक्ति मिलते हैं जिन्होंने अपने विचारों के बल पर दुनिया को नई दिशा दी। गौतम बुध्द ने जीवन और दुखों

के विषय में गहराई से विचार किया और अपना जीवन बौध्द धर्म के प्रचार –प्रसार में लगा दिया। उनके विचार आज भी लाखों–करोडो लोगों के लिए प्रेरणा स्त्रोत हैं।

न्यूटन और आईनस्टाईन जैसे वैज्ञानिकों के मौलिक विचारों ने विज्ञान की दुनिया में क्रांति ला दी। स्वामी विवेकानंद के विचारों ने युवाओं को जागृत किया और उनमें आत्मविश्वास और आत्मनिर्भरता की भावना विकसित की। व्यक्ति के विचार उसके जीवन की दिशा तय करते है। एक सकारात्मक विचारशील व्यक्ति न केवल अपने लिए बल्कि समाज के लिए भी उपयोगी सिध्द होता है।

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ने वैज्ञानिक अनुसंधानो में योगदान देकर भारत को अंतरराष्ट्रीय स्तर पर नई पहचान दिलाई। दूसरी ओर असत्य, छल और कपट से भरे विचार रखने वाले व्यक्ति समाज के लिए घातक सिध्द होते है। डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम के विचार 'विचार विचारात्मक चिंतन' पर केंद्रित थे, जो सपनों को हकीकत बनाने, सकारात्मक सोच, कडी मेहनत, आत्मनिर्भरता और राष्ट्र निर्माण करता है।

उनका मानना था कि विज्ञान और नैतिकता का सामंजस्य हो, शिक्षा आजीवन चले और युवा अपने आज का बलिदान देकर बच्चो का बेहतर कल बनाएँ जिससे वे नौकरी माँगने वाले नहीं बल्कि नौकरी देने वाले बनें और समाज में बदलाव ला सकें। भारत को एक विकसित राष्ट्र बनाने के लिए युवाओं को अपना क्षमताओं का उपयोग करना होगा ।

शिक्षा और नैतिकता, शिक्षा का उद्देश्य केवल ज्ञान प्राप्त करना नहीं, बल्कि मानवता, शांति और सच्चाई की खोज करना होना चाहिए । शिक्षा को आधुनिक तकनीक और नैतिकता से जोडना चाहिए, ताकि युवा आजीवन मानवता और शांति सीखते रहे। युध्द किसी समस्या का हल  नहीं है। विज्ञान को मानवता की भलाई के लिए उपयोग करना चाहिए न कि उसे बिगाड़ना चाहिए । धर्म के नाम पर हिंसा का विरोध किया आत्मनिर्भरता और नेतृत्त्व उन्होंने आत्मसम्मान और आत्मनिर्भरता पर ज़ोर दिया। रचनात्मक नेतृत्व और अपने मिशन के प्रति निष्ठा को, सफलता के लिए जरूरी माना। सपने और लक्ष्य 'सपने वो नहीं है जो आपको सोते समय देखते है, बल्कि वो हैं जो आपको सोने नहीं देते। उन्होंने युवाओं को बड़े सपने देखने और उन्हें पूरा करने के लिए दृढता से काम करने के लिए प्रेरित किया है। महात्मा फुले जी के विचार शिक्षा, समानता और सामाजिक न्याय पर केंद्रित थे। जिसमें उन्होंने जाति आधारित भेदभाव को खत्म करने, महिलाओं और दलितों के लिए, सशक्तिकरण के लिए 'सत्यशोधक समाज' की स्थापना की। 'गुलामगिरी' जैसे ग्रंथों से सामाजिक बुराइयों को उजागर किया और शिक्षा को सामाजिक परिवर्तन का सबसे बडा हथियार माना, जिसमें हर व्यक्ति खासकर महिलाओं और शिक्षा पर जोर दिया गया। महात्मा फुले जी ने जाति विरोधी संघर्ष, जाति व्यवस्था और ब्राम्हणवादी वर्चस्व का विरोध किया।

उन्होंने 'गुलामगिरी' में जातिगत उत्पीडन  की तुलना हमारी दास्तां को व्यक्त करता है और सत्यशोधक समाज (1873) की स्थापना की ताकि सच की खोज हो और निम्न जातियों को मुक्ति मिले। धार्मिक रुढियों पर प्रहारः कर उन्होंने ब्राम्हणों द्वारा रचित धर्म ग्रंथों और रीतिरिवाजों पर सवाल उठाए, जो समाज में विषमता पैदा करते थे। उनका मानना था कि यह धर्म शुद्रों और स्त्रियों के जीवन को कठिन  बनाता है।

छत्रपति शिवाजी महाराज जी के विचारधारा राजस्व, राष्ट्रभक्ति, जनकल्याण, न्यायव्यवस्था, स्त्री–सन्मान तथा दृढनिश्चयता आदि पर निर्भर थी । इसमें अपनी इच्छाशक्ति के बल शत्रू को पराजित करना, नैतिकता का पतन करना तथा धर्मनिरपेक्षता आदि मूल्य समाहित हैं। उनकी दृष्टि में राष्ट्रभक्ति आद्यकर्तव्यनिष्ठा थी।  सामाजिक समता, धार्मिक समानता, जातियता का विरोध तथा सामाजिक न्याय के वे दूत थे। राष्ट्र उनके लिए देवता के समान पूजनीय था। इसलिए

जनकल्याण तथा स्वराज्य के प्रति उनके मन में असीम भक्ति थी। इनके मौलिक विचारों के बारें में यदि कथन किया जाए । तो वे इसप्रकार थे, जैसे कि एक छोटा सा कदम अपना लक्ष्य हासिल कर देता है। जब हमारे हौसले बुलंद हो तो पहाड भी मिट्टी के ढेर में बदल जाता है। आत्मबल, परिश्रम, संयम तथा कर्तव्य की पराकाष्ठा में तो हमारी जीत निश्चित है। इसप्रकार छत्रपति शिवाजी महाराज के विचार हमें आज भी एक सामर्थ्य, आत्मबल और स्थिरता प्रदान करते हैं।

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. अमृता प्रकाश बागल**
एम. ए. भाग–1

# मोहनदास - उदय प्रकाश

**(समीक्षात्मक लेख)**

उदय प्रकाश द्वारा लिखित कहानी 'मोहनदास' लंबी कहानी है, जो हिंदी की विख्यात साहित्य पत्रिका हंस में अगस्त सन 2005 में प्रकाशित हुई थी। इसका विधिवत प्रकाशन वर्ष सन 2006 में वाणी प्रकाशन, नई दिल्ली से हुआ है।

उदय प्रकाश की इस महाकाव्यात्मक कहानी को वर्ष सन 2010 में साहित्य अकादमी से पुरस्कृत किया जा चुका है। सिर्फ एक कहानी के लिए किसी रचनाकार को साहित्य अकादमी पुरस्कार देने की हिंदी साहित्य जगत की यह पहली घटना है। 'मोहनदास' इस लंबी कहानी का अब तक नौ से अधिक भारतीय भाषाओं के साथ प्रमुख विदेशी भाषाओं में भी बनाई गई है। 'मोहनदास' यह कहानी बेरोजगार युवक मोहनदास की जीवन कथा है। कहानीकार उदय प्रकाश जी ने इस कहानी के नायक मोहनदास की जीवन कथा है। कहानीकार उदय प्रकाश जी ने इस कहानी के नायक मोहनदास यह कहानीकार अनेक पाचों के नाम हिंदी साहित्य जगत की चर्चित हस्तियों के नाम पर रखकर उदय प्रकाश जी ने मिथकिय चेतना का सुंदर प्रयोग इस कहानी में किया है।

मोहनदास यह पुरबनरा गाँव में रहने वाले बेरोजगार युवक मोहनदास की दीर्घ कथा है। भले ही यह एक कहानी है लेकिन इसकी कथावस्तु में उपन्यास 'मोहनदास' की गहराई एवं कथा का अनोंखा सौंदर्य विद्यमान है। मोहनदास एक चरित्रप्रधान पात्र है जो कहानी के कथावस्तु को विकसित करने तथा उद्देश्य को सफल बना देता है।

**कथावस्तु के महत्त्वपूर्ण पहेलू** 1) मोहनदास उनकी लंबी कहानी है, जो हिंदी की विख्यात साहित्य पत्रिका हंस में अगस्त 2005 में प्रकाशित हुई ।

2) मोहनदास यह कहानी बेरोजगार युवक मोहनदास की कहानी है। नायक मोहनदास नीचली जाति का एक पढा–लिखा होनहार ग्रामीण युवक है। लेकिन जातियता एवं भ्रष्टाचार के चलते वह बेरोजगार रहता है।

3) मोहनदास अपनी अपनी जाति बिरादरी का पहला बी.ए. पास लडका है। लेकिन गाँव के उच्च जाति के विश्वनाथ पाण्डेय उर्फ बिसनाथ जलसाजी करके उसकी नौकरी को हडप लेता है।

4) मोहनदास प्रशासन का भ्रष्टाचार और सिफारिशबाजी से थक जाता है। अपनी पुश्तैनी काम और खेती–बाडी करने लगता है। कुछ महीने बाद उसे पता चलता है। बिसनाथ का पर्दापाश करने और अपनी अस्तित्व की लडाई लडता है।

5) मोहनदास विश्वनाथ पाण्डेय उर्फ बिसनाथ का पर्दाफाश करने और अपनी नौकरी पाने की लडाई लडता है। लेकिन हर जगह भ्रष्टाचार और रिश्वतखोरी के कारण एक शोषित पात्र चित्रित किया हुआ है।

6) मोहनदास का यह अंतिम वाक्य हमारे पूरे लोकतांत्रिक और प्रशासकीय के मुँह पर करारा तमाचा जडता है। जो मोहनदास अपनी नौकरी और पहचान वापस पाने के लिए संघर्षरत था वहीं स्वयं के लिए संघर्षरत था वहीं स्वयं के मुँह से मैं मोहनदास नहीं हूँ कहने के लिए विश्वसनीय बन जाता है।

## पात्रों और विषयों का विश्लेषण:–

मोहनदास कहानी में लेखक ने उत्कृष्ट संवादों का प्रयोग किया है। पात्रानुकूल, सरल, सहज, छोटे, गतिशील, जिज्ञासू, संवाद प्रस्तुत है। उनकी कहानी में पात्रानुकूल उद्देष्यपूर्ण संवादों के कारण कहानी के कथानक में गतिशीलता आ गई है। कहानी मोहनदासजी ने बी.ए. करने के बाद पिता काबा दास और माँ पुतलीबाई में नई उम्मीद जगी थी। बेटे को अब अच्छी नौकरी मिलेगी और उनकी गरीबी दूर होगी। मोहनदास की शादी कटकोना गाँव के बिरजू सुंदर की बेटी कस्तुरीबाई से हुई है। बी.ए. पढाई के लिए मदद करती है। बी.ए. करने वाले लडको को नौकरी मिल रही थी।

कस्तुरी उसे साहस बँधाती है कि सरकारी नही तो निजी क्षेत्र में उसे नौकरी मिलेगी या फिर बेरोजगारों के लिए सरकार की ओर से कुकुट पालन, मोमबत्ती, अगरबत्ती क्षेत्र में काम मिलेगा ऐसा जताया जाता है पर उन्हे हासिल कुछ नहीं होता है।

मोहनदास कहानी में देशकाल का वातावरण का चित्रण प्रसंगी, पाचों की मनोदशा वर्णन तथा घटनाओं का अंकन मूल कथन से किया गया है। इस कारण कहानी पाठकों को प्रभावित कर उनकी जिज्ञासा बढाती है। इस संकलन कारण यह कहानी हमें स्वाभाविक अर्थवत लगती है।

मोहनदास कहानी शिल्प की दृष्टि से एक अनुठी कहानी है। साथ ही भाषा की दृष्टि से इस की भाषा सहज, सरल और संप्रेषणीय, प्रभावपूर्ण है। इस के साथ ही इसकी भाषा में भावानुकूलता, प्रसंगानुकूलता, पात्रानुकूलता, गतिशीलता, व्यंग्यात्मकथा, काव्यात्मता आदि विशेषताएँ पायी जाती है। साथ ही विभिन्न भाषा की शब्दावली प्रादेशिक बोली भाषा का प्रयोग, कहावतें और मुहावरे आदि का प्रयोग भी कहानी की भाषा में किया गया है।

इसकी कहानी शैली भी अनोंखी है । इसमें मोहनदास के जीवन संघर्ष की त्रासदी का चित्रण है। प्रधान रुप से किस्सागोई, विवरणात्मक, विश्लेषणात्मक, संस्मरणात्मक, व्यंग्यात्मक, चित्रात्मक शैलियों का प्रयोग किया है।

**निष्कर्ष:–** इस कहानी का मूल उद्देश्य निम्नवर्गीय दलित युवक के संघर्ष के यथार्थ को प्रस्तुत करते है। साथ ही भ्रष्टाचार, सामाजिक, असमानता, भाईभतीजावाद, जातिभेद, तानाशाही, आदि को उजागर करने का प्रयास किया है।

मोहनदास कहानी एक समस्या प्रधान कहानी है। इस में व्यक्तिगत असंतोष, दलित, अन्याय–अत्याचार, दलित शोषण, जातिगत व्देष , भ्रष्टाचार, सामाजिक न्याय व्यवस्था, सामाजिक असमानता भ्रष्ट प्रशासन एवं पुलिस व्यवस्था, नारी सूरक्षा आम आदमी के हक्क और अधिकार की, समस्या उच्चवर्ग की तानाशाही युवाओं के अस्तित्व बोध की समस्यांए आदि समस्याओं का यथार्थ चित्रण हुआ है।

प्रस्तुत कहानी में कहानीकार उदय प्रकाश जी ने मनुष्य की दुनिया की शाश्वत समस्या पर प्रकाश डाला है। अंततः आदमी के जीवन की यथार्थता इस कहानी के माध्यम से लक्षित होती है।

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. सानिका राजेंद्र जाधव**
बी.ए.भाग–3

# भारतीय राजनीति

**(वैचारिक समीक्षात्मक लेख)**

भारतीय राजनीति वह प्रक्रिया है जिसके माध्यम से भारतीय समाज के प्रत्येक सदस्य पर लागू होने वाले निर्णय लिए जाते हैं। इसमें सरकार की गतिविधियाँ, चुनावो में भागीदारी, नीतिनिर्माण और नागरिक सहभागिता शामिल है। भारत, विश्व का सबसे बडा लोकतंत्र, एक अद्वितीय और जीवत राजनीतिक व्यवस्था का उदाहरण है। भारतीय सरकार तीन शाखाओं के माध्यम से कार्य करती है। प्रधानमंत्रि के नेतृत्त्व में राज्य सरकारें और पंचायतें एवं नगरपालिकाएं जैसे स्थानीय निकाय।

राष्ट्रीय एवं क्षेत्रीय दोनों प्रकार के राजनीतिक दल बहुदलीय प्रणाली के अंतर्गत नियमित चुनावों में भाग लेते है। संसद में लोकसभा और राज्यसभा शामिल हैं, जो राष्ट्रीय कानून बनाती है। भारत की राजनीति संविधान के ढाँचे मे काम करती है। जहाँ पर राष्ट्रपति सरकार का मुख्य होता हैं और प्रधानमंत्रि कार्यपालिका का प्रमुख होता है। भारत एक संघीय संसदीय, लोकतांत्रिक गणतंत्र है, भारत एक द्वि–राजतंत्र का अनुसरण करता है। अर्थात, केन्द्र मे एक केन्द्रीय सत्तावाली सरकार और परिधि में राज्य सरकारों संविधान मे संसद के द्विसदनीयता का प्रावधान है, जिसमें एक उपरी सदन (राज्यसभा) जो भारतीय संघ के राज्य तथा केन्द्रशासित प्रदेश का प्रतिनिधित्व करता है, और निचला सदन (लोकसभा) जो भारतीय जनता का प्रतिनिधित्व करता है।

शासन एवं सत्ता सरकार के हाथ में होती है। संयुक्त वैधानिक बागडौर कार्यपालिका एवं संसद के दोनों सदनों, लोक सभा एवं राज्य सभा के हाथ में होती है। न्यायालय शासकीय एवं वैधानिक दोनों से स्वतंत्र होता है। संविधान के अनुसार भारत एक प्रधान, समाजवादी, धर्म–निरपेक्ष, लोकतांत्रिक राज्य है। जहाँ पर विधायक जनता के द्वारा चुनी जाती है । अमेरिका की तरह, भारत में भी संयुक्त सरकार होती है। लेकिन भारत मे केंद्र सरकार राज्य सरकारों की तुलना में अधिक शक्तिशाली है। जो कि ब्रिटेन की संसदीय प्रणाली पर आधारित है। बहुमत की स्थिति में न होने पर मुख्यमंत्रि न बना पाने की दशा में अथवा विशेष संवैधानिक परिस्थिति के अंतर्गत केंद्र सरकार राज्य सरकार को निष्कासित कर सकती है और सीधे संयुक्त शासन लागू कर सकती है । जिसे राष्ट्रपति शासन कहा जाता है। भारत की पुरी राजनीति मंत्रियों के द्वारा निर्धारित होती है। भारत एक लोकतांत्रिक, धार्मिक और सामुदायिक देश है। जहाँ युवाओं में चुनाव का बढ़ा वोट केंद्र भारतीय राजनीति में बना रहता है, यहाँ चुनाव का बढ़ा वोट केंद्र भारतीय राजनीति में बना रहता है। यहां चुनाव को लोकतांत्रिक पर्व की तरह बनाया जाता है। भारत में राजनीतिक राज्य में नीति करने की तरह है।

भारत की राजनीति जो आज के समय में लोकतंत्र के सबसे सही बादान पर है । भारत की राजनीति जिसमें सभी व्यक्ति को समानता अधिकार प्रदान करने के लिए चुनाव होता है और वही हो रहा है । भारत की राजनीति बाजार की तरह थी लेकिन वर्तमान सरकार के वजह से अत्याधिक पारदर्शिता आ गई है । भारत की राजनीति को अलग–अलग से काम नहीं हो सकता था। विशेष लोगों के लिए विशेष छुट और अन्य के लिए कोई भी प्रकार की कटौती नहीं। भारत एक लोकतंत्र देश है लेकिन इस देश में लोकतंत्र का कोई महत्व दिखाई नहीं पड रहा था । लोकतंत्र को दिखाई देने के लिए एक क्रमबध्द तरीके से लोकतंत्र चुनाव तब का समय था कि केवल अपने फायदे के लिए जनता को आगे करे जा रहे थें । राजनीति पूरी तरह से भारत में नाम मात्र का रह चुका था। राजनीति नहीं यह तो राज्य नीति है। राजनीति का सही अर्थ है राज्य की नीति को कैसे सुचारु रुप से चलाया जाए जो कि पहली बार देश में दबाने को मिल रहा है।

❑ ❑ ❑ ❑ ❑

**कु. अनुष्का सुनील गोसावी**
बी.कॉम. भाग–1

# आज की युवा पीढी

**(वैचारिक लेख)**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर विभाग कार्यरत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हिंदी विभागामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. दि. १४ सप्टेंबर 'हिंदी दिन' व १० जानेवारी 'विश्व हिंदी दिन' यानिमित्त महाविद्यालयात लेखन कार्यशाळा आयोजित केली होती यावेळी डॉ. दिलीप कसबे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना करिअर निवडताना लाभ व्हावा व अचूक निर्णय घेता यावा यासाठी विविध क्षेत्रातील कौशल्यांविषयी सविस्तर माहिती दिली. या विभागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या वक्तृत्व, निबंध, मेहंदी व रांगोळी स्पर्धा तसेच युवा महोत्सव, आविष्कार, संशोधन महोत्सव, कला महोत्सव, ट्रेड फेअर डे, जिमखाना डे यांसह विविध उपक्रमात भाग घेतला. यामुळे सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकास होण्यास मदत झाली. एम. ए. भाग दोन मधील विद्यार्थीनी कु.शिवाली घाडगे हिची नांदेड येथे झालेल्या अश्वमेध क्रीडा स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ महिला कबड्डी संघात व आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली. तिने सातारा विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत रौप्य पदक मिळविले तसेच तिची नाशिक येथे राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी सातारा जिल्हा कबड्डी संघात निवड झाली. कु. शिवाली घाडगे सातारा जिल्हा कबड्डी पंच परीक्षेतही उत्तीर्ण झाली आहे. हिंदी विभागाच्या वतीने पदव्युत्तर विभागाची संशोधन पद्धती, पीएच.डी. प्रवेश मार्गदर्शन, नेट-सेट परीक्षा मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास, भाषिक कौशल्य व सृजनात्मक लेखन या विषयावर व्याख्यान व कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या विभागातील विद्यार्थ्यांनी विविध विषयाचे प्रकल्प लेखन केले आहे. तज्ज्ञ

मार्गदर्शक म्हणून डॉ.दिलीप कुमार कसबे, डॉ.सादिक तांबोळी, डॉ.शहनाज सय्यद, डॉ.संदीप किर्दत, डॉ.सचिन निकम, प्रा.राबन मुल्ला, कु.संतोषी पवार इत्यादींची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

**प्रा.डॉ.राजेंद्र भोसले**
हिंदी विभाग प्रमुख

# Department of English

In academic year 2025-26 total 10 students were admitted to department of English. The department organizes different students centric activities throughout the year. The department has active MoU with English Language Teachers Association of India (ELTAI). The department organized One Day Workshop on Writing Skills under this MoU on 9th February 2026. Dr. Dnyandev Kale, Associate Professor from Aamdaar Shashikant Shinde Mahavidyalay Medha was the resource person for the workshop. He elaborated various forms and genres of literature with examples from Hindi Marathi and English literature. Total 59 students were present for the workshop.

The department has signed MoU with Mandeshi radio station The students of our department visited Mandeshi Radio Station, Mhaswad on16th February, 2026 under this MoU. It was a kind of hands-on-training for the students.

The students were given opportunity to present poem, story and articles on radio. The students were informed about the job opportunities in community radio stations in Satara district.

The department of English organised One Day Workshop on Literary Criticism under the Lead College scheme of Shivaji University Kolhapur. Dr. Sandhya Podtdar from D. P. Bhosle College Koregaon was the resource person for the workshop. The department runs two skill based short term courses.

The department organised one day national conference on Contribution of Hon. Padma Vibhushan Sharad Pawar to Nation Building on 25th March, 2026.

Mr. U.S.Madane
Head of Department of English

# इतिहास विभाग

दि. २८ जुलै २०२५ रोजी हिस्ट्री क्लबच्या उपक्रमांतर्गत टी स्पून या माहितीपटाचे विशेष सादरीकरण केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव, वास्तववादी दृष्टिकोन व विचारप्रवृत्तीची जाणीव झाली.

दि. ११ ऑगस्ट २०२५ रोजी 'क्रांती दिन' साजरा करण्यात आला. या वेळी माजी प्राचार्य डॉ. विजयराव नलवडे यांनी विद्यर्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्यलढ्याबद्दल आदर व देशभक्तीची

भावना वृद्धिंगत झाली.

दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी 'महाराष्ट्रातील क्रांतिकारक' या विषयावर भित्तीपत्रकाचे प्रकाशन घेण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता व ऐतिहासिक जाणीव वृद्धिंगत झाली.

दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी महात्मा गांधी यांच्या जीवन व कार्यावर आधारित 'ऑनलाइन प्रश्नमंजुषा' घेण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना गांधीवादी विचारांची ओळख झाली.

दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी किसान वीर महाविद्यालय, वाई  येथे आयोजित शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा २०२५–२०२६ मध्ये तेजस घाडगे याने 'नेर तलाव शिलालेख खटाव तालुक्याचा ऐतिहासिक दस्तावेज' या विषयावर संशोधन पोस्टर सादर केले.

दि. १ नोव्हेंबर २०२५ रोजी वर्ग सेमिनारचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण सादरीकरणाची संधी मिळून आत्मविश्वास वाढला.

दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी 'ब्रेन स्ट्रॉर्मिंग' उपक्रमा अंतर्गत इतिहास शब्द कोडे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांची विचारक्षमता, सर्जनशीलता व विषयसमज वाढली.

दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी एस. एम. जोशी कॉलेज येथे 'रयत आविष्कार संशोधन' स्पर्धेमध्ये अभय वाघमोडे याने सहभाग घेतला.

दि. १८ जानेवारी २०२६ रोजी खटाव तालुक्यातील 'वेटणे' गावात वीरगळ व मंदिर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक वारसा जतन व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली.

दि. ३० जानेवारी २०२६ रोजी हुतात्मा दिनानिमित्त महाविद्यालयात हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून देशासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना अभिवादन केले.

दि. २५/०२/२०२६ रोजी इतिहास विभाग व अग्रणी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'छत्रपती शिवाजी महाराज जयंती समारंभ' उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. प्रा. कोंडिबा शिंदे यांनी आपल्या भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेतील दूरदृष्टी, प्रशासन कौशल्य व लोककल्याणकारी धोरणांवर प्रकाश टाकला.

दि. १० मार्च २०२६ रोजी इतिहास विभागातील विद्यार्थ्यांसाठी गटचर्चा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी खटाव तालुक्यातील लष्करी इतिहास लिहिण्यासाठी माजी व आजी सैनिकांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहितीचे संकलन केले. समूहकार्य अंतर्गत बी.ए. भाग–२ च्या विद्यार्थ्यांनी वृत्तपत्रातील इतिहास विषयक बातम्यांचे संकलन केले. संशोधन उपक्रमांतर्गत बी.ए. भाग–३ च्या विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प पूर्ण केले.

अनुभवाधिस्ट शिक्षण उपक्रमांतर्गत जुनी नाणी, पुरातन वस्तू आणि पत्र व्यवहार हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. अल्पमुदत अभ्यासक्रमांतर्गत मोडीलिपीच्या वर्गांचे आयोजन करणायात आले होते. बी.ए.भाग–३ च्या विद्यार्थ्यांनी सेमिनार सादर केले.

**प्रा.डॉ.अनिल जगताप**
इतिहास विभाग प्रमुख

# वाणिज्य विभाग

Five Skill Courses were run by the department as follows -

| Sr. No. | Skill Course | Class | Beneficiaries |
|---|---|---|---|
| 1. | Artificial Intelligence | B.Com -I | 73 |
| 2. | Tally Package | B.Com -II | 49 |
| 3. | Entrepreneurship Development | B.Com -III | 48 |
| 4. | A certificate course in Direct Taxation And GST | M.Com -I | 19 |
| 5. | Stock Market | M.Com -II | 12 |

Following Activities were organized in the academic year - 2025-26

| Sr. No. | Date | Name of Activity | Resource Person |
|---|---|---|---|
| 1. | 23/01/2026 | AI Training Program | Prof. Dipali Ghatge |
| 2. | 20/01/2026 | Poster Presentation Competition | - |
| 3. | 22/01/2026 | Model Competition | - |
| 4. | 24/01/2026 | Commerce Quiz Competition | - |
| 5. | 30/01/2026 | Guest Lecture on "M.Com -Renewal of Affiliation" | Dr. M. S. Wagh |
| 6. | 31/01/2026 | Guest Lecture on Artificial Intelligence | Prin. Dr. B. T. Jadhav |
| 7. | 09/02/2026 | One day Workshop on "NET -SET Guidance Program" | Mr. S. R. Gangawane |
| 8. | 10/02/2026 | One day Workshop on "Research Methodology" | Dr. Sachin Nikam |
| 9. | 11/02/2026 | Guest lecture on "Skill and Personality Development" | Dr. Chavare D. T. |
| 10. | 12/02/2026 | Guest lecture on "Goods and Service Tax" under MoU | CA Amit Nikam |
| 11. | 13/02/2026 | Guest lecture on "Basics of Share Market" | Dr. Gond S. A. |
| 12. | 13/02/2026 | Research Poster Presentation -M.Com | - |
| 13. | 24/02/2026 | Guest lecture on "AI and Career Opportunities" | Miss. Tanvi Shah |
| 14. | 02/03/2026 | Visit to Bank Shivkrupa Patsanstha, Pusegaon | - |
| 15. | 30/03/2026 | Visit to Shri Seevagiri Bigarsheti Patsanstha , Pusegaon | - |
| 16. | 23/03/2026 | Trade Fair Day | Dr. K. M. Nalawade |
| 17. | 30/03/2026 | Farewell Function of B.Com -III | - |

**प्रा. प्रदीप गायकवाड**
वाणिज्य विभाग प्रमुख

# अर्थशास्त्र विभाग

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

दि. ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी ''उद्योजकता विकास आणि CIII ची ओळख'' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून श्री. सचिन भोंडवे आणि श्री. अतुल गोडसे उपस्थित होते. श्री. सचिन भोंडवे यांनी उद्योजकतेची संकल्पना आणि विद्यार्थांनी उद्योजक बनण्यासाठी काय प्रयत्न केले पाहिजेत तसेच शासनाकडून यासाठी कोणत्या योजना आहेत आणि त्यासाठी शासनाकडून किती अनुदान मिळते यासाठी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. श्री. अतुल गोडसे यांनीही विद्यार्थांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनात CIII ची ओळख करून दिली

दि. ०४ मार्च २०२६ रोजी ''उद्योजकता विकास आणि रोजगाराच्या संधी'' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून श्री. राहूल कोळी उपस्थित होते. श्री. राहूल कोळी यांनी ''उद्योजकता विकास आणि रोजगाराच्या संधी '' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. ०४ मार्च २०२६ रोजी भित्ती पत्रकाचे उद्घाटन श्री.राहूल कोळी यांच्या हस्ते झाले. या उपक्रमाबाबत त्यानी सकारात्मक प्रतिक्रिया दिली.

दि. ०२ मार्च २०२६ रोजी शिवकृपा सहकारी पतसंस्था, पुसेगाव या पतसंस्थेला विद्यार्थ्यांनी अभ्यास भेट दिली. या भेटी दरम्यान पतसंस्थेच्या पैसे देण्या-घेण्याचे व्यवहार, बचतीचे प्रकार, गुंतवणूक योजना इ. विषयी सखोल माहिती या संस्थेचे व्यवस्थापक व सेवकांनी दिली. या भेटीत विद्यार्थी सहभागी झालेले होते.

दि. २४ मार्च २०२६ रोजी अर्थशास्त्र विभागाच्या वतीने Trade fair Day चे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामध्ये विद्यार्थी सहभागी झाले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यानी वेगवेगळ्या खाद्य पदार्थांची विक्री करून व्यावसायिक अनुभव घेतला.

दि. ०७ मार्च २०२६ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया, पुसेगाव या राष्ट्रीयकृत बँकेस अभ्यास भेट दिली. या भेटी दरम्यान बँकेच्या पैसे देण्या-घेण्याचे व्यवहार, बचतीचे प्रकार, गुंतवणूक योजना, दत्तक गाव विकासात बँकेची भूमिका इ. विषयी चांगली माहिती बँकेच्या व्यवस्थापकांनी दिली. या भेटीत महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झालेले होते.

**प्रा.लालासाहेब पवार**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

# राज्यशास्त्र विभाग

सन २०२५–२६ मध्ये राज्यशास्त्र विभागामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

**संविधान दिन** दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे सामूहिक वाचन करण्यात आले.

**हमारा संविधान हमारा स्वाभिमान प्रश्नमंजुषा** विद्यार्थ्यांना भारतीय राज्यघटनेची ओळख व्हावी या उद्देशाने राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'हमारा संविधान हमारा स्वाभिमान' ऑनलाइन प्रश्नमंजुषा घेण्यात आली. यामध्ये ११२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहभागी विद्यार्थ्यांना इ मेल वर प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

दि. ०१ डिसेंबर २०२५ रोजी मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

**राष्ट्रीय मतदार दिन** दि. २५ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयात 'राष्ट्रीय मतदार दिन' साजरा करण्यात आला. यानिमित्त राज्यशास्त्र विभागामार्फत वक्तृत्व स्पर्धा आणि निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

वक्तृत्व स्पर्धेमध्ये कु. सूर्यवंशी सागर सोनबा याने प्रथम क्रमांक मिळविला. तर कु. साळुंखे अंकिता नवनाथ आणि कु. बोराटे ज्ञानेश्वरी प्रशांत या विद्यार्थीनींनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला.

निबंध स्पर्धेत कु. गोसावी अनुष्का सुनील हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला तर कु. शिर्के ऐश्वर्या जालिंदर आणि कु. गायकवाड प्रीती रोहिदास या विद्यार्थीनींनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त केला.

दि. ९ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी २०२६ अखेर आयोजित कला, वाणिज्य, क्रीडा महोत्सवामध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कु. कर्णे मोहिनी गोविंद आणि कु. नलवडे साक्षी या विद्यार्थीनींनी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे विजतेपद प्राप्त केले

**प्रा. सुधीर धोंगडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

# भूगोल विभाग

दि. १८ ऑगस्ट २०२५ प्रा. डॉ. प्रसन्न कुमार पाटील यांचे 'हवा आणि पाण्याचे प्रदूषण' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी हवा प्रदूषणाची विविध कारणे याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच हवा आणि पाणी याचा मानवी आरोग्यावर होणारे परिणाम व पाणी प्रदूषणातील उपाय योजना याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. भूगोल दिनानिमित्त निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

दि. १०/०२/२०२६ रोजी भूगोल विभाग आणि अग्रणी महाविद्यालय अंतर्गत 'जलसंधारण आणि मृदा संधारण व्यवस्थापन काळाची गरज' या विषयावर प्रा.डॉ.अभिमान निमसे यांचे व्याख्यान आयोजित केलेले होते. तसेच 'वसुंधरा' या भितीपत्रिकाचे उद्घाटन प्रा. डॉ.अभिमान निमसे यांच्या हस्ते करण्यात आले.

**प्रा. श्रीमती मनुजा सोनार**
भूगोल विभाग प्रमुख

# ग्रंथालय विभाग

ग्रंथालय हा अविरतपणे ज्ञानदान करणारा महाविद्यालयातील महत्त्वाचा विभाग आहे. ग्रंथांची थोरवी सांगताना कवी मंगेश पाडगावकर यांनी म्हटले आहे.

''बंध आमुचे साथी, ग्रंथ आमच्या हाती । ग्रंथ उजळती अज्ञानाच्या, अंधाराच्या राती ।।
या ग्रंथाच्या तेजामधुनी, जन्मा येती क्रांती ।। ग्रंथ शिकवती माणुसकी, अन ग्रंथ शिकवती शांती''

या काव्यपंक्तीमधील विचारधारा समोर ठेवून आमचा ग्रंथालय विभाग कार्यरत आहे.

**ग्रंथसंपदा** महाविद्यालयात समृध्द ग्रंथालयाची उभारणी करत असताना आज ग्रंथालयामध्ये २०,९०० एवढी ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. यात क्रमिक, संदर्भ व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन पुस्तके यांचा समावेश आहे. चालू शैक्षणिक वर्षामध्ये ५८९ ग्रंथ खरेदी केले असून त्यामध्ये संदर्भ ग्रंथ व क्रमिक पुस्तकांचा समावेश आहे.

**नियतकालिक विभाग** ग्रंथालयामध्ये राष्ट्रीय व राज्यस्तरावरील एकूण २८ नियतकालिके उपलब्ध आहेत. राष्ट्रीय स्तरावरील २ जर्नल्स आहेत. दररोज इंग्रजी व मराठी अशी ९ वर्तमानपत्रे व ऑनलाइन ४८ वर्तमानपत्रे वाचनासाठी उपलब्ध आहेत.

**बुक बँक योजना** महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भागातील असल्यामुळे आर्थिकदृष्ट्या गरीब आहेत. त्यांना वर्षभर सवलतीच्या दरामध्ये पुस्तके दिली जातात. जे विद्यार्थी ९०% गुणांपेक्षा जास्त गुण संपादित करतात त्यांना बुक बँकेतून मोफत पुस्तके दिली जातात, तसेच निराधार व अपंग विद्यार्थ्यांना बुक बँक योजनेतून मोफत पुस्तके दिली जातात.

**ग्रंथालय संगणकीकरण** संपूर्ण ग्रंथालय प्रक्रिया संगणीकृत केली असून ग्रंथालयामध्ये 'ओपॅक' सुविधा आहे. तसेच गेट मशीन बसविण्यात आले असून कोड सुविधा आहे. विद्यार्थी ऑनलाईन वाचनाचा आनंद घेतात

**अभ्यासिका** ग्रंथालयामध्ये विद्यार्थी, विद्यार्थीनी व प्राध्यापकांसाठी वेगळी बैठक व्यवस्था केली आहे. माजी विद्यार्थ्यांना व इतर स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी सकाळी ८:०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत अभ्यासिका उपलब्ध करुन दिली आहे. त्याचबरोबर ऑनलाइन वाचन करण्यासाठी ऑनलाइन पध्दतीने ४८ वर्तमानपत्रांची सुविधा उपलब्ध आहे. महाविद्यालयात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा केला जातो. कर्मवीर जयंती दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले जाते. याचा विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक यांनी लाभ घेतला आहे. यावर्षी महाराष्ट्र शासनाच्या वाचन संकल्प कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

**प्रा.डॉ.एन.डी. पाटील वाचन कट्टा** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना निसर्गाच्या सानिध्यात वाचन करता यावे यासाठी दि. ५ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्राचे थोर विचारवंत स्वर्गिय प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या नावाने वडाच्या झाडाखाली वाचन कट्टा आहे. त्यासाठी माजी विद्यार्थी श्री. उमेश घाडगे (L.I.C. विमा प्रतिनिधी) यांनी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी सिमेंटचे बेंचेस उपलब्ध करुन दिले आहेत. त्या ठिकाणी काही मासिकं व वर्तमान पत्रे उपलब्ध करुन दिली आहेत. याचा अनेक विद्यार्थी लाभ घेत आहेत. ग्रंथालय अभ्यासिका हॉललगत 'रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमीच्या' माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केले जाते.

**प्रा.डॉ.संजय क्षीरसागर**
ग्रंथालय विभाग प्रमुख

# जिमखाना विभाग

जिमखाना विभागामार्फत दि. २१ जून 'जागतिक योग दिवस' साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थी व शिक्षकांनी विविध योग प्रकार केले. निरोगी आरोग्य व योगाचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक फायदे याबद्दल मार्गदर्शन केले.

सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयातील खेळाडूंनी विभागीय व आंतरविभागीय मैदानी स्पर्धा तसेच कबड्डी, बॉक्सिंग, बॅडमिंटन, बुद्धिबळ व कुस्ती या स्पर्धेत सहभाग घेतला आहे.

सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात कबड्डी क्रीडा प्रकारात ऐतिहासिक कामगिरी करण्याचा दुहेरी मान महाविद्यालयाची कबड्डी खेळाडू कु. शिवाली हणमंत घाडगे हिने मिळविला. शिवाजी विद्यापीठ कबड्डी महिला संघात तिची निवड झाली व उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे नांदेड येथे होणाऱ्या 'अश्वमेध' स्पर्धेसाठी तिची शिवाजी विद्यापीठ कबड्डी महिला संघात निवड करण्यात आली. अशा प्रकारे दुहेरी मान पटकावित महाविद्यालयाची पहिली विद्यापीठ खेळाडू होण्याचा बहुमान तिला मिळाला. नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी तिची निवड झाली तसेच ती सातारा जिल्हा पंच परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. नागपूर येथे होणाऱ्या 'छ.शिवाजी महाराज शिवशाही चषक' या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी कु. शिवाली घाडगे हिची निवड झाली आहे.

महाविद्यालयाने विविध स्पर्धेत सहभाग घेऊन सांघीक व एकेरी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महाविद्यालयामध्ये ऑलिम्पिकवीर पै.खाशाबा जाधव यांचा जन्मदिन दि. १५ जानेवारी हा दिवस 'राज्य क्रीडादिन' म्हणून साजरा करण्यात आला. या दिवशी पै. खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली व मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धेतील प्राविण्यप्राप्त खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयात एक दिवसीय 'Aerobics and Zumba' व 'सेल्फ डिफेन्स' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयात ' Sports Festival' चे आयोजन करण्यात आले. या मध्ये कबड्डी, रस्सीखेच, क्रिकेट व मॅरेथॉन स्पर्धेचे जिमखाना विभागामार्फत आयोजन केले होते. यामध्ये 'ACCP मॅरेथॉन' सर्वांसाठी कौतुकाचा विषय ठरली व चालू वर्षात उत्कृष्ट जिमखाना म्हणून नावलौकिक प्राप्त केला. महाविद्यालयातील सर्व गुणवंत विद्यार्थी व प्राविण्यप्राप्त खेळाडूंचा गुणगौरव वार्षिक पारितोषिक समारंभात मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. महाविद्यलयायाचे प्राचार्य डॉ. सुनील हेळकर, माजी प्रभारी प्राचार्य डॉ. आर. पी. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा. डॉ. अनिल जगताप, प्रा. डॉ. संजय क्षीरसागर, प्रा.श्रीमती एम.बी. सोनार, प्रा. पी. व्ही. गायकवाड यांच्या सहकार्याने जिमखाना विभागाचे काम सुरळीत पार पडले.

**प्रा. गौरव जाधव**
जिमखाना विभाग प्रमुख

# सांस्कृतिक विभाग

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अंतर्गत महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दि. २६ जून २०२५ रोजी राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक, सामाजिक आणि शेती विषयक कार्य या विषयी मार्गदर्शन केले. दि. ५ सप्टेंबर २०२५ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त 'शिक्षक दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेतून अध्यापन केले. यावेळी प्रमुख पाहुणे मा. प्राचार्य शहाजी डोंगरे यांनी आपल्या व्याख्यानात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्याबद्दल मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रथमेश दळवी बी.ए. भाग-२, कु. खुपिया शेख बी.कॉम.भाग-३, कु.ज्ञानेश्वरी बोराटे बी.कॉम.भाग-१ या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. दि. २२ सप्टेंबर २०२५ रोजी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रांगोळी,पाककला, मेहंदी, वक्तृत्व, निबंध, कविता वाचन स्पर्धा, सुगम गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. बुधवार दि. २४/०९/२०२५ रोजी रांगोळी स्पर्धा, शुक्रवार दि. २६/०९/२०२५ निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा, शनिवार दि.२७/०९/२०२५ रोजी मेहंदी स्पर्धा, कविता वाचन स्पर्धा व सुगम गायन स्पर्धा, मंगळवार दि.२९/०९/२०२५ व बुधवार दि.१/१०/२०२५ रोजी चित्रकला स्पर्धा व शुक्रवार दि. ३/१०/२०२५ रोजी पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वरील सर्व स्पर्धा प्रकारातून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांची निवड करण्यात आली.

दि.०९/०९/२०२५ रोजी शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर अंतर्गत ४५ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा येथे संपन्न झाला. यावेळी मराठी, हिंदी व इंग्रजी वक्तृत्व आणि वाद विवाद स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दि. १९/९/२०२५ ते २०/०९/२०२५ मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये मेहंदी स्पर्धेत कु. ज्ञानेश्वरी बोराटे बी.कॉम. भाग-१ ही विद्यार्थिनी सहभागी झाली. सोमवार दि. २९/०९/२०२५ रोजी नवरात्र उत्सवानिमित्त गारबा आणि दांडिया स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेसाठी विद्यार्थिनींचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. पद्मविभूषण खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुण्या प्रा. श्रीमती शुभांगी पोळ, विभाग प्रमुख, प्राणीशास्त्र विभाग, राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध यांनी पद्मविभूषण खासदार शरदचंद्र पवार यांचा राजकीय प्रवास या विषयी माहिती सांगीतली. तसेच प्रा.डॉ.नवनाथ लोखंडे यांनी पद्मविभूषण खासदार शरदचंद्रजी पवार यांचे कृषी क्षेत्रातील योगदान विषयक विचार सांगितले. दि. २० डिसेंबर २०२५ रोजी श्री सेवागिरी महाराज देवस्थान ट्रस्ट, पुसेगाव आयोजित जिल्हास्तरीय खुल्या युवा महोत्सवामध्ये समूह गायन, सुगम गायन, लोकनृत्य रेकॉर्ड डान्स, लोककला लाईव्ह डान्स आणि पथनाट्य या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त दि. ५ जानेवारी २०२६ रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक प्रा.सौ उज्वला मदने यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयात पारंपरिक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा परिधान करून सादरीकरण केले. यामध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांची निवड करण्यात आली. यावेळी फनी गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. दि. १० मार्च २०२६ रोजी 'जागतिक महिला दिन आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' यांच्या पुण्यदिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री.राहुल कोळी, निवेदक आकाशवाणी, पुणे यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्रातील महाविद्यालयात प्रथमच होणारा कार्यक्रम विद्यार्थिनींच्या कौशल्य विकासाला वाव देणारा उपक्रम आदर्श विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी सर्व स्पर्धेत भाग घेऊन प्रथम क्रमांकाची मानाची पैठणी कु. समृद्धी शिंदे बी.कॉम भाग-१ या विद्यार्थिनीला मिळाली. दि. २४ मार्च २०२६ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभा निमित्त फिश पॉइंट, शेलापागोटे आणि विविध गुण दर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी माजी विद्यार्थी श्री.राहुल कोळी यांनी अनेक मराठी गीतांचे गायन केले. माजी विद्यार्थिनी कु.मयुरी पवार हिने दोन मराठी लावण्या सादर केल्या. या कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे विद्यार्थी

सहभागी झाले होते. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये सांस्कृतिक विभागांतर्गत सामाजिक, राजकीय क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या महामानवांच्या जयंती व स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. सांस्कृतिक विभागाच्या विविध उपक्रमात कु. अनुजा मदने, कु.अंकिता साळुंखे, कु.खुफिया शेख, कु.निकिता मिराशी, कु.पायल इंजे, कु.समृद्धी शिंदे, कु.प्रणाली शिंदे, कु.ज्ञानेश्वर बोराटे, कु.शोभा मिराशी, कु.भारती लोंढे, कु.नम्रता कांबळे तसेच अभिषेक कदम, सूर्यकांत देशमुख, अनमोल कर्णे या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत भाग घेतला. सांस्कृतिक विभागाच्या विविध उपक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनील हेळकर, प्रा.डॉ.राजेंद्र भोसले, प्रा.डॉ. अनिल जगताप, प्रा.डॉ.संजय क्षीरसागर आजीव सभासद, रयत शिक्षण संस्था,सातारा, प्रा. लालासाहेब पवार, प्रा. प्रदीप गायकवाड, प्रा. मारुती वाघ, प्रा सुधीर धोंगडे, प्रा.डॉ. सौ. अश्विनी कांबळे, प्रा. संतोष कोकरे इत्यादींनी विशेष परीश्रम घेऊन सहकार्य केले. दि. २४ मार्च २०२६ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ निमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनील हेळकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले त्यांच्या या मार्गदर्शनामुळे, प्रेरणेमुळे फिश पॉइंट, शेलापागोटे आणि विविध गुणदर्शन नाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला

**प्रा.श्रीमती मनुजा सोनार**
चेअरमन, सांस्कृतिक विभाग

---

# राष्ट्रीय सेवा योजना

**आंतरराष्ट्रीय योग दिन दि. २१ जून २०२५** २१ जून २०२५ रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमातून निरोगी आरोग्य व योगाचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक फायदे याबद्दल मार्गदर्शन केले.

**स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण दि. १४ जुलै २०२५** 'स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण–२०२५' अंतर्गत स्वच्छता व पाणी व्यवस्थापनावर मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्री. राजेश इंगळे यांनी स्वच्छतेचे महत्त्व स्पष्ट केले.

**'एक पेड मा के नाम' वृक्षारोपण** दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी 'एक पेड मा के नाम' या उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

**'हर घर तिरंगा' तिरंगा यात्रा** स्वातंत्र्यदिनी 'हर घर तिरंगा' या उपक्रमांतर्गत तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. या यात्रेमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना दृढ झाली.

**'स्वच्छता ही सेवा' अभियान** 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसराची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छता व आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.

**कर्मवीर भाऊराव पाटील जयंती** दि. २२ सप्टेंबर पद्‌भूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. फलक व घोषवाक्यांद्वारे त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा संदेश देण्यात आला.

**HIV/AIDS व आरोग्य जनजागृती कार्यक्रम** दि. २४ सप्टेंबर २०२५ HIV/AIDS, लैंगिक आजार, कावीळ प्रतिबंध व जीवनकौशल्यांवर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. श्री. कल्याण बंडगर (ICTC Counselor, Vaduj)

आणि सौ. किर्ती शेडगे (ICTC, Health Worker) यांनी मार्गदर्शन केले. या तज्ञांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढली.

**पूरग्रस्तांसाठी मदत साहित्य संकलन** दि. ११/१०/२०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सोलापूर व मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी मदत साहित्य संकलन केले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण झाली.

**वाचन प्रेरणा दिन** दि. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. डॉ. एन. डी. लोखंडे व डॉ. एम. एस. वाघ यांनी सृजनशील लेखन अनुभव सांगितले आणि विद्यार्थ्यांनी संविधानाचे वाचन केले.

**'नशामुक्त भारत अभियान'** दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी 'नशामुक्त भारत' अभियानांतर्गत माहितीपटाचे विशेष प्रात्यक्षिक व व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रा. डॉ. आर. पी. भोसले यांच्या उपस्थितीत नशामुक्तीची शपथ देण्यात आली.

**संविधान दिन** दि. २६ नोव्हेंबर २०२५ संविधान दिनानिमित्त प्रा. डॉ. आर. पी. भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

**जागतिक एड्स दिन** दि. १ डिसेंबर २०२५ जागतिक एड्स दिनानिमित्त एड्स जनजागृती फेरी तसेच ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढविण्यात आली.

**वीर बाल दिवस** दि. २६ डिसेंबर २०२५ राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'वीर बाल दिवस' साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रा. डॉ. किरण कुंभार यांनी शीख धर्माचे दहावे गुरु श्री. गोविंद सिंहजी यांच्या चार सुपुत्रांच्या शौर्य व बलिदानाची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

**९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन,सातारा स्वयंसेवक सहभाग** दि. ०१ जानेवारी २०२६ ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या 'साहित्य प्रेरणा ज्योत' स्वागत उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. या उपक्रमातून सांस्कृतिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली.

**श्री सेवागिरी महाराज रथोत्सव स्वच्छता मोहीम** दि. ०३ जानेवारी २०२६ श्री सेवागिरी महाराज रथोत्सवानिमित्त यात्रा समाप्ती नंतर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत स्वच्छता व सामाजिक जबाबदारीचा संदेश देण्यात आला.

**हुतात्मा दिन** दि. ३० जानेवारी २०२६ रोजी हुतात्मा दिनानिमित्त हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आर. पी. भोसले उपस्थित होते.

**रस्ता सुरक्षा अभियान** दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले. प्रा.डॉ. के. जी. कुंभार यांनी विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा नियम, रस्ता अपघातांची कारणे आणि सुरक्षित वाहन चालवणे याबाबत मार्गदर्शन केले.

**स्वसंरक्षण कार्यशाळा** दि. ११ मार्च २०२६ आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त मुलींसाठी स्वसंरक्षण कार्यशाळा आयोजित केली. तायक्वाँदो प्रशिक्षक गौरव जाधव यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाच्या तंत्रांचे प्रशिक्षण दिले.

**प्लास्टिक मुक्त परिसर** दि. १२ मार्च २०२६ महाविद्यालयात "Say No to Plastic: Green Campus

Campaign" ic: Green Campus Campaign" या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमास प्रमुख पाहुणे मा. ए. जे. नागरगोजे ग्रामपंचायत अधिकारी, पुसेगाव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी परिसरातील प्लास्टिक कचरा गोळा करून स्वच्छता मोहीम राबवली.

**आर.आर.सी. (रेड रिबन क्लब) स्थापना** क्रांतिसिंह नाना पाटील रुग्णालय, सातारा येथे आर.आर.सी. 'रेड रिबन क्लब' ची स्थापना करण्यात आली. या उपक्रमातून आरोग्यविषयक जनजागृतीस चालना देण्यात आली.

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा** दि. ४ जुलै २०२५ डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव येथे आयोजित सातारा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत दोन राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. आपत्तीच्या काळातील जबाबदाऱ्या व उपाययोजनांचे प्रशिक्षण देण्यात आले.

**Viksit Bharat Young Leaders Dialogue (VBYLD)** दि. १७ ऑक्टोबर २०२५ MYBharat यांच्या वतीने आयोजित Viksit Bharat Young Leaders Dialogue (VBYLD) 2026 या ऑनलाइन प्रश्नमंजुषेत ३१ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सदर उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना Ministry of Youth Affairs & Sports यांच्यामार्फत सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

**'उत्कर्ष २०२५-२६'** दि. ४ ते ७ जानेवारी २०२६ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ ते ७ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा 'उत्कर्ष २०२५-२६' मध्ये कु. कांबळे नम्रता सतीश हिने स्वयंसेविका म्हणून यशस्वी सहभाग नोंदविला.

**नेतृत्व विकास शिबिर** दि. १८ ते २२ जानेवारी २०२६ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील विद्यार्थी विकास विभाग (सेंटर फॉर लीडरशिप डेव्हलपमेंट) आणि ''बहाई अकॅडमी'', पांचगणी शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८ ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत पांचगणी येथे नेतृत्व विकास शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात कु.शोभा मोहन मिराशी हिने यशस्वी सहभाग नोंदविला.

**शिव पावन प्रेरणा मोहीम** दि. २४ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२६ शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने आयोजित करण्यात येणारी पन्हाळा पावन खिंड - शिव पावन प्रेरणा मोहीम दि. २४ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित केली होती. या शिबिरात कु.शोभा मोहन मिराशी आणि गणेश नारायण जगदाळे यांनी सहभाग घेतला.

**विशेष श्रमसंस्कार शिबिर** मौजे-वेटणे, ता. खटाव, जि. सातारा मंगळवार, दि. ०६ जानेवारी २०२६ ते सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते.

वरील सर्व उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आर. पी. भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांचे सहकार्य लाभले.

**शिबिर अहवाल** रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विशेष श्रमसंस्कार

शिबिराचे आयोजन मौजे वेटणे, ता.खटाव, जि.सातारा येथे करण्यात आले होते. हे शिबिर ''जलसंधारण व्यवस्थापन व पडीक जमिनीचा विकासासाठी युवकांचा सक्रिय सहभाग'' तसेच ''स्वच्छ भारत, स्वस्थ भारत, विकसित भारत'' या संकल्पनांअंतर्गत आयोजित करण्यात आले होते.

**उद्घाटन समारंभ** शिबिराचा उद्घाटन समारंभ मंगळवार, दि. ०६ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाला. समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. संदीप पोमण ए.पी.आय., पुसेगाव पोलीस स्टेशन होते. यावेळी अध्यक्षस्थानी मा. श्री. के. के. घाटगे, सदस्य, जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था, सातारा हे होते. विशेष उपस्थितीमध्ये श्री. सुधाकर हणमंत देवकर सरपंच, ग्रामपंचायत वेटणे, श्री. महेश प्रकाश नलवडे उपसरपंच, ग्रामपंचायत वेटणे, श्री. संजय नलवडे, मा. डॉ. आर. पी. भोसले प्र. प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव हे मान्यवर उपस्थित होते. मा. के. के. घाटगे यांनी स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व विशद केले. अध्यक्षीय मनोगतात मा. श्री. संजय नलवडे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच मा. संदीप पोमण यांनी स्पर्धा परीक्षांद्वारे उज्ज्वल भविष्य घडविता येते याविषयी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. उद्घाटन सत्रानंतर स्वयंसेवकांनी मंदिर परिसर व प्राथमिक शाळेचा परिसर स्वच्छ केला. संध्याकाळच्या सत्रात स्वयंसेवकांना शिबिराबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या तसेच राजगड, वर्धनगड, तोरणा, अजिंक्यतारा व सिंहगड असे गट तयार करून प्रत्येक गटासाठी गटप्रमुखांची नियुक्ती करण्यात आली.

दि. ०७/०१/२०२६ रोजी सकाळी प्रार्थना व योगासाधना झाल्यानंतर गावामधून वृक्षसंवर्धन व जलसंवर्धन दिंडी काढण्यात आली. सकाळी १० वाजता शिबिरार्थी व ग्रामस्थांसाठी 'हिमोग्लोबिन तपासणी व आरोग्य शिबिराचे' आयोजन करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र, डिस्कळ येथील उपकेंद्र वेटणे येथील डॉ. प्रसन्न चेन्नी यांनी मार्गदर्शन केले. तसेच श्रीमती कांचन शेडगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वयंसेवक व ग्रामस्थांची हिमोग्लोबिन व रक्त तपासणी चाचणी केली. मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात आली. संध्याकाळच्या सत्रात प्रा. चंद्रकांत काळे, माजी प्राध्यापक, के.बी.पी. अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा यांनी ''स्वरविज्ञान आणि आरोग्य ही धनसंपदा'' या विषयावर मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्षीय मनोगत श्री. सुधाकर हणमंत देवकर सरपंच, वेटणे यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला.

दि. ०८/०१/२०२६ रोजी सकाळच्या सत्रात प्रार्थना व योगासाधना करण्यात आली. त्यानंतर प्लास्टिकमुक्त परिसर उपक्रमांतर्गत गावातून ११ पोती प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्र, सार्वजनिक पाणवठा व रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली. तसेच ग्राम व कुटुंब सर्वेक्षण करण्यात आले. दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांसाठी ''एक मिनिट भाषण'' हा उपक्रम राबविण्यात आला. संध्याकाळच्या सत्रात प्रा. डॉ. आर. के. देशमुख यांचे ''राष्ट्रीय सेवा योजना व स्वच्छता'' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. ०९/०१/२०२६ रोजी सकाळच्या सत्रात वडजाई मंदिर परिसर व प्राथमिक शाळेचा परिसर स्वच्छ करण्यात आला. दुपारच्या सत्रात प्रा. डॉ. हणमंत देशमुख, अध्यक्ष, ड्रीम फाउंडेशन, सातारा यांनी ''जलसंधारण : काळाची गरज'' या विषयावर मार्गदर्शन केले. संध्याकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला.

दि. १०/०१/२०२६ रोजी सकाळच्या सत्रात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करण्यात आले तसेच प्राथमिक शाळेचा परिसर स्वच्छ करण्यात आला. दुपारच्या सत्रात श्री. जाधव के. एस., सामाजिक कार्यकर्ते यांनी आर्थिक साक्षरता या विषयावर मार्गदर्शन केले. संध्याकाळच्या सत्रात मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर प्रा. कोंडीबा शिंदे, जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, सातारा शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी ''राष्ट्रनिर्मितीमध्ये युवकांचे योगदान'' या विषयावर व्याख्यान दिले. या व्याख्यानाचे अध्यक्ष डॉ. अनिल दडस, लाईफ

वर्कर, रयत शिक्षण संस्था, सातारा हे उपस्थित होते.

दि. ११/०१/२०२६ रोजी सकाळी गावातून अंधश्रद्धा निर्मूलन दिंडी काढण्यात आली. त्यानंतर स्मशानभूमी व मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच ग्राम सर्वेक्षण करण्यात आले. दुपारच्या सत्रात वेटणे येथील माजी सैनिकांचा त्यांच्या देशसेवेबद्दल सत्कार करण्यात आला. माजी सैनिकांनी त्यांच्या सेवाकाळातील अनुभव सांगून स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. संध्याकाळच्या सत्रात स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

दि. १२/०१/२०२६ रोजी समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. योगेश कदम, गटविकास अधिकारी (वर्ग–१), पंचायत समिती खटाव (वडूज) हे होते. तसेच अध्यक्ष स्थानी माजी प्राचार्य डॉ. व्ही.एन. नलावडे हे होते.

वरील सर्व उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ग्रामस्थ, स्वयंसेवक, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी स्वयंसेवक तसेच विविध संस्थांचे सहकार्य मोलाचे ठरले.

**प्रा. डॉ. किरण कुंभार**
कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना

**प्रा. डॉ. हनुमंत निमसे**
कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना

---

# परीक्षा विभाग

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये महाविद्यालयात परीक्षा विभाग कार्यरत आहे. या विभागामार्फत महाविद्यालयातील विद्यार्थांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले जातात. यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. नवीन शैक्षणिक धोरणानुसार बी. ए. भाग–१ व बी. कॉम. भाग–१ या वर्गासाठी विद्यापीठाच्या निर्देशानुसार अंतर्गत मूल्यमापनासाठी ४० गुणासाठी मिड टर्म टेस्ट Class Assignment, Home Assignment आणि quiz घेण्यात आल्या. तसेच महाविद्यालयातील सर्व वर्गाच्या दोन सराव परीक्षा नवीन शैक्षणिक धोरणानुसार घेण्यात आल्या. तसेच युनिट टेस्ट घेण्यात आल्या. शिवाजी विद्यापीठाच्या नियमांनुसार बी.ए. भाग–१, बी. कॉम. भाग–१, हिंदी भाग–१. आणि एम.कॉम. भाग–१ अंतर्गत मूल्यमापनासाठीचे गुण शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आले. तसेच बी.ए. भाग–१, बी. कॉम. भाग–१, हिंदी भाग–१. आणि एम.कॉम. भाग–१ विद्यार्थ्यांचे Academic Bank of Credits (ABC) आय डी तयार करुन घेतले आणि ते शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आले. विद्यापीठाच्या सर्व वर्गांच्या सर्व सत्रांच्या परीक्षा शांततेत आणि सुव्यवस्थित पार पडल्या. वरील सर्व कामकाजासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील हेळकर, माजी प्रभारी प्राचार्य डॉ. आर. पी. भोसले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचे व कमिटीतील सर्व सदस्य यांचे सहकार्य लाभले.

**प्रो. डॉ. संग्राम शिंदे**
चेअरमन, परीक्षा विभाग

# संशोधन व विकास कक्ष समिती

दि. १४ ते १९ मे २०२५ या कालावधीत "AI and Its Applications" या विषयावर शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रा. पी. व्ही. गायकवाड यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना, शैक्षणिक क्षेत्रातील उपयोग आणि भविष्यातील संधी या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

दि. २२ जुलै २०२५ रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विद्यार्थी विकास कक्ष आणि यशोदा टेक्निकल कॅम्पस, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आविष्कार संशोधन स्पर्धेच्या सातारा जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळेत ३ विद्यार्थी आणि प्रा. डॉ. के. जी. कुंभार सहभागी झाले.

दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी ''आविष्कार संशोधन स्पर्धेसाठी संशोधन पोस्टर कसे बनवायचे'' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि रयत शिक्षण संस्था, सातारा आयोजित आविष्कार स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर ही कार्यशाळा घेण्यात आली असून प्रा. पी. व्ही. गायकवाड आणि डॉ. के. जी. कुंभार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजी पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी "Research and Start-up" या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा. येथील C-III (Centre for Invention, Innovation and Incubation) चे प्रा. डॉ. पी. व्ही. चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आयोजित आविष्कार स्पर्धेत किसनवीर महाविद्यालय, वाई येथे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. अभिषेक कदम आणि तेजस घाटगे यांनी आपले संशोधन पोस्टर सादर केले.

दि. १४ डिसेंबर २०२५ रोजी रयत शिक्षण संस्था, सातारा आयोजित आविष्कार स्पर्धेसाठी एस.एम.जोशी महाविद्यालय, हडपसर, पुणे येथे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. अभिषेक कदम आणि अभय वाघमोडे यांनी आपले संशोधन पोस्टर सादर केले.

दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी एम.ए. व एम.कॉम. विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात संशोधन पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेसाठी प्रा.डॉ. एम. एस. वाघ आणि प्रा.डॉ. के. जी. कुंभार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

रयत शिक्षण संस्था, सातारा संशोधन धोरण बीज भांडवल अंतर्गत मेजर, मायनर शोध प्रकल्पांची छाननी मंगळवार दि. १०/०२/२०२६ रोजी अन्य महाविद्यालयातील तज्ज्ञ संशोधन छाननी समिती द्वारे प्रस्तावांची छाननी करण्यात आली. समितीच्या निर्णयानुसार मेजर रिसर्च प्रोजेक्टसाठी रु. २५,०००/- प्रमाणे तीन ३ प्रकल्पांना अनुदान मंजूर करण्यात आले आहे. तर मायनर रिसर्च प्रोजेक्टसाठी रु. १०,०००/- प्रमाणे दोन २ प्रकल्पास अनुदान मंजूर करण्यात आले.

संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट संशोधक पुरस्कार देण्यात येतो सन २०२५-२६ साठीचा हा पुरस्कार प्राप्त झाला.

दि. १४ मार्च २०२६ रोजी संशोधन व विकास कक्ष, हिंदी विभाग व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने

बौद्धिक संपदा हक्क (IPR) कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत एकूण ६८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून मा. ॲड. किसनराव खामकर यांनी विद्यार्थ्यांना बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व व कायदेशीर संरक्षण याबाबत मार्गदर्शन केले.

दि. २५ मार्च २०२६ रोजी 'पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग घेतला.

वरील सर्व उपक्रमांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील हेळकर, माजी प्रभारी प्राचार्य डॉ. आर. पी. भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवक यांचे सहकार्य लाभले.

**प्रा. डॉ. किरण कुंभार**
चेअरमन, संशोधन व विकास कक्ष

# रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी

महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र कार्यरत असून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमित मार्गदर्शन तासिका, गेस्ट लेक्चर, स्वतंत्र अभ्यासिका, विविध वर्तमानपत्रे, मासिके या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. विद्यार्थ्यांसाठी या विभागत एकूण चार संगणक उपलब्ध करून दिले असून महाविद्यालयाच्या ग्रंथालायातून विविध स्पर्धा परीक्षा विषयक पुस्तके उपलब्ध करून देण्यात येतात.

दि. १० डिसेंबर २०२५ रोजी रयत शिक्षण संस्थेच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयात रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमीची स्थापना करण्यात आली. याचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य, माजी सहसचिव माध्यमिक विभाग मा. के. के. घाटगे यांच्या हस्ते झाले. दि. २१ डिसेंबर २०२५ पासून एम.पी.एस.सी. फाऊंडेशन बॅचचे नियमित अध्यापन तासिका सुरु करण्यात आल्या. या बॅचला ३७ विध्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.

दि. २३ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यामध्ये प्रिं. डॉ. वंदना नलवडे, प्राचार्या, आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा यांनी मार्गदर्शन केले. दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध शासकीय, निमशासकीय व खाजगी क्षेत्रात यश मिळविले आहे. दि. ०१/०१/२०२५ पासून मुंबई पोलीस दलात चार विद्यार्थ्यांची निवड झाली आहे तर दोन विद्यार्थ्यांची अग्निवीर भरतीतून सैन्य दलात निवड झाली आहे. इंडियन एयर फ़ोर्स मध्ये एका विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. दोन विद्यार्थ्यांनी नेट परीक्षेमध्ये यश प्राप्त केले आहे.

विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार टी.सी.एस.च्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची गणित व बुध्दीमत्ता या विषयाची तयारी करून घेण्यात आली. या लेखी परीक्षेमध्ये चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या विद्यार्थ्यांची टी.सी.एस मध्ये निवड झाली आहे.

**प्रा. डॉ. अनिल जगताप**
चेअरमन, रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी

# शॉर्ट टर्म कोर्स

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पारंपरिक पदवी शिक्षणाबरोबर त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये शॉर्ट टर्म कोर्स सुरू करण्यात आले. केंद्र सरकारच्या स्किल डेव्हलपमेंट योजनेप्रमाणे महाविद्यालयातील पारंपारिक शिक्षण घेत असताना कौशल्या आधारित शिक्षणाची संधी उपलब्ध झाली पाहिजे हा प्रमुख उद्देश आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आजच्या स्पर्धेच्या युगात स्वतःला सिद्ध करता यावे व आत्मविश्वासाने सामोरे जाता यावे, स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी महाविद्यालयात रयत शिक्षण संस्था, सातारा कर्मवीर प्रबोधिनी या विभागाबरोबर MOU करण्यात आलेले आहे. या अंतर्गत खालीलप्रमाणे आठ कोर्सेस महाविद्यालयात चालविले जात आहे.

1) Certificate Course in Spoken English
2) Beautyful and Wellness
3) Fashion Designing and Tailoring
4) Certificate course in Journalism for Electronic Media
5) Modi Lipi
6) Entrepreneurship Development
7) Certificate Course in Direct Taxation and GST
8) Stock Market

असे एकूण आठ कोर्सेस महाविद्यालयात चालविले जात आहेत. सदर कोर्सेससाठी १५४ विद्यार्थ्यांना प्रवेश घेतला आहे. जे कोर्सेस महाविद्यालयांतर्गत चालविले जात आहेत त्यामध्ये

1. Tally Package
2. Balwadi Sevika
3. Translation and Communication Proficiency
4. Letter Writing in Hindi
5. Soft Skills Development
6. Creative Writing in Hindi
7. AI
8. Library Management.

असे एकूण आठ कोर्सेस महाविद्यालयाअंतर्गत चालविले जात आहेत. सदर कोर्सेससाठी १९१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. वरील कोर्सेस चालविण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील हेळकर, प्रा.डॉ.भोसले आर. पी. यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा.डॉ.संजय क्षीरसागर व प्रा.गायकवाड पी.व्ही तसेच सर्व कोर्सेसचे समन्वयक व सहसमन्वयक यांनी सहकार्य केले.

**प्रा. आनंदराव खाडे**

चेअरमन, शॉर्ट टर्म कोर्स कमिटी

# अग्रणी महाविद्यालय योजना

कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव लीड कॉलेज विभाग अंतर्गत महाविद्यालयात संशोधन, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले जातात. सन. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात लीड कॉलेज अंतर्गत महाविद्यालयात खालील प्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

दि. २३/०९/२०२५ रोजी हिंदी विभागाच्या वतीने एकदिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत प्रा. डॉ. सादिक तांबोळी यांनी हिंदी दिनाचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. २९/०१/२०२६ रोजी 'विश्व हिंदी दिन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत प्रा.डॉ. दिलीप कसबे यांनी विश्व हिंदी दिनांचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. ११/०२/२०२६ रोजी Literally Criticism या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत डॉ. संध्या पोतदार यांनी Literally Criticism या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. १०/०२/२०२६ रोजी 'जलसंधारण आणि मृदा संधारण व्यवस्थापन काळाची गरज' याविषयी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत प्रा.डॉ.अभिमान निमसे यांनी 'जलसंधारण आणि मृदा संधारण व्यवस्थापन काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. ०४/०३/२०२६ रोजी 'उद्योजकता आणि रोजगार संधी' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत श्री. राहुल कोळी यांनी 'उद्योजकता आणि रोजगार संधी' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. १२/०२/२०२६ रोजी 'नेट-सेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत श्री. एस. आर. गंगावणे यांनी नेट-सेट परीक्षा याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. ०१/१०/२०२५ रोजी 'उद्योजकता विकास आणि CIII ची ओळख' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत श्री. सचिन भोंडवे आणि श्री.अतुल गोडसे यांनी उद्योजकता आणि सेलची ओळख या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. २५/०२ /२०२६ रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज जयंती समारंभ' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत प्रा.के.एस. शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.१०/०२/२०२६ रोजी 'Research Methodology' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा

आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत प्रा. डॉ.सचिन निकम यांनी 'Research Methodology' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. २७/०१/२०२६ रोजी 'महिला विषयक कायदे' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत प्रमुख पाहुणे ॲड.प्रवीण देवकर यांनी 'महिला विषयक कायदे' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. २३/०१/२०२६ रोजी रोजी 'भाषा आणि व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत प्राचार्या डॉ. वंदना जाधव यांनी 'भाषा आणि व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. सुनील हेळकर, माजी प्रभारी प्राचार्य डॉ. आर.पी.भोसले व कमिटीतील सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले.

**प्रा. लालासाहेब पवार**

चेअरमन, अग्रणी महाविद्यालय योजना

# उद्योजकता विकास सेल

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयात उद्योजकता विकास सेल कार्यरत आहे. या विभागामार्फत महाविद्यालयातील विद्यार्थांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबरच व्यावसायिक शिक्षण दिले जाते. त्यामुळे विद्यार्थांमध्ये उद्योजकता विकास होण्यास मदत होते. यासाठी महाविद्यालयात तज्ज्ञ व्यक्तीकडून आणि व्यावसायिक अनुभव असणाऱ्या उद्योजकाकडून विद्यार्थांना मार्गदर्शन दिले जाते. या वर्षी विद्यार्थांमध्ये व्यावसायिक गुण विकसित व्हावा यासाठी खालील व्याख्याने आयोजित करण्यात आली.

उद्योजकता विकास सेल दि. ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी ''उद्योजकता विकास आणि CIII ची ओळख'' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत मा.श्री. सचिन भोंडवे आणि मा.श्री. अतुल गोडसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मा. श्री. सचिन भोंडवे यांनी उद्योजकतेची संकल्पना आणि विद्यार्थांनी उद्योजक बनण्यासाठी काय प्रयत्न केले पाहिजेत तसेच शासनाकडून यासाठी कोणत्या योजना आहेत आणि त्यासाठी शासनाकडून किती अनुदान मिळते यासाठी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना CIII ची ओळख करून दिली.

दि. ०४ मार्च २०२६ रोजी ''उद्योजकता विकास आणि रोजगाराच्या संधी'' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत मा. श्री. राहुल कोळी यांनी ''उद्योजकता विकास आणि रोजगाराच्या संधी '' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच उद्योजक केवळ वस्तू व सेवा निर्माण करणे व त्याची विक्री करणे एवढ्यापुरतेच मर्यादित नसतात तर इतर क्षेत्रातही उदा. गायन, अनुवादक, संगीत इत्यादी क्षेत्रातही आपले करिअर घडवू शकतो. चिकाटी, जिद्द आणि सातत्यपूर्ण काम करण्याची तयारी असेलेली व्यक्ती उद्योजक होऊ शकते आणि इतरांनाही रोजगार मिळवून देवू शकते असे महत्त्वपूर्ण विचार व्यक्त केले. या

कार्यक्रमासाठी प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक आणि ८९ विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना उद्योजक बनण्याची प्रेरणा मिळाली.

व्यावसायिक समस्येची जाणीव होण्यासाठी आणि त्यातील समस्या कमी करण्यासाठी उपाय सुचवता येतील यासाठी विद्यार्थ्यांना विविध व्यवसायांना भेटी देण्यास प्रोत्साहन दिले जाते. या अंतर्गत बी.कॉम भाग-३ च्या विद्यार्थ्यांकडून व्यावसायिक निर्मितीसाठी प्रोजेक्ट तयार करण्यात आले.

विद्यार्थ्यांना नवीन स्टार्ट अप करणे, नवीन कल्पना निर्माण करण्याचे काम उद्योजकता विकास सेल करते. तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली जाते. यासाठी विद्यार्थी चांगला प्रतिसाद देत असतात. यासाठी प्राचार्य डॉ.सुनील हेळकर, माजी प्र.प्राचार्य डॉ.राजेंद्र भोसले व कमिटीतील सर्व सदस्यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

**प्रो. डॉ. संग्राम शिंदे**
चेअरमन, उद्योजकता विकास सेल

---

# कर्मवीर विद्याप्रबोधिनी

